8. Bottomore, T. B. & Rubel, M (eds) — Karl Marx : Selected Writings in Sociology and Social Philoso phy, watts, London, 1956

9. Bramson, L. — The Political Context of Soci ology, Princeton University, Press Princeton-1961

10. Brinton, C. — Anatomy of Revolution, Prentice Hall, New Jersey - 1938

11. Buckley, W — Modern System Analysis, Prentice Hall, New Jercy, 1967

12. Castles F. G. — Pressure Groups and Political Culture, Routledge and Kegan Paul, London-1967

Anand Charitable Sanstha Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA

Department of Economics

BA III – 2021-22

Project Work

Sr. No.	Name of the Student	PRN.	Project Title
1	SHENDE USHA RAJU	2019015200310183	मराठवड्यातील अवर्षणाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणामांचा अभ्यास

HEAD
Dept of Economics
Department of Economics
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

Scanned with OKEN Scanner

आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा
ता.आष्टी,जि.बीड

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत
अर्थशास्त्र विषयातील बी.ए.तृतीय वर्षासाठी सादर करावायाचा प्रकल्प

✪ शिर्षक ✪

"मराठवाडयातील अवर्षणाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणामांचा अभ्यास "

✪संशोधक ✪

उषा राजु शेंडे (बी.ए.तृतीय वर्ष)
मो.9764280228 ई-मेल-

✪प्राचार्य✪

डॉ.एच.जी.विधाते
आनंदराव धोंडे महाविद्यालय,कडा

✪ विभाग प्रमुख ✪

डॉ.ए.बी.माळशिखरे
आनंदराव धोंडे महाविद्यालय,कडा

शैक्षणिक वर्ष
2021-22

Scanned with OKEN Scanner

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधकार्य पुर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा.डॉ.माळाशिखरे सर यांनी वेळोवेळी अमुल्य मार्गदशन केले त्यामुळेच मी प्रकल्प अहवाल पुर्ण करु शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आंनदराव धोंडे महाविद्यालय,कडा ता.आष्टी,जि.बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री.श्याम सांगळे सरांनी मला संबधित साहित्य उपलब्ध करुन देऊन जे सहकार्य केले त्याबदद्ल मी त्यांचे सदैव ऋणी राहिल.

तसेच मला सैदव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ.हरिदास विधाते सर , यांचेही मी ऋण व्यक्त करीते. वरील सर्वांनी मला मार्गदर्शन व सहकार्य केल्याबददल मी सर्वाचे पुनश्च एकदा ऋण व्यक्त करतो.

ठिकाण : कडा, ता.आष्टी **संशोधक**

दिनांक : 25/05/2022 उषा शेंडे

Scanned with OKEN Scanner

Anand Charitable Santsha's Ashti

Anandrao Dhonde Alas Babaji Mahavidyalya
Kada, Tal-Ashti, Dist-Beed 414202

CERTIFICATE

This is to certify that ***Miss. Shende Usha Raju*** *of Class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed his project work in subject of Economics entitled* **मराठवाडयातील अवर्षणाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणामांचा अभ्यास"** *as laid down in the of the regulation of Dr. Babasaheb Ambedkar Marathawad University , Aurangabad during the academic year 2021-22*

Paper No.	XII & XVI	Oral	Total
Out Of Marks	*80*	*20*	*100*
Obtained Marks	60	18	78

External Examiner

Date : 31 /5 /2022

Head of the Department
Dept of Economics
Anandrao Dhonde Alias Babaji
College, Kada, Tal. Ashti, Dist. Beed

Scanned with OKEN Scanner

प्रकरण पहिले :
'प्रास्ताविक'

Scanned with OKEN Scanner

प्रस्तावना :

या संशोधनात नवीन ज्ञान संपादन करण्याचा व जुन्या ज्ञानाचे पुनर्परिक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. हे एक सामाजिक संशोधन आहे. विश्व म्हणजे अमर्याद विस्तीर्ण असे आकाश व त्यात सर्वत्र विखुरलेले असंख्य तेजोगोल. खगोलशास्त्रज्ञांच्या मते साधारणतः १५-२०अब्ज वर्षापूर्वी एका प्रचंड विस्फोटातून विश्वाची निर्मिती झाली. प्रोटॉनचे सूक्ष्म कण परस्परावंर आदळून अनेक ग्रह, उपग्रह, तारे, दिर्घिका यांची निर्मिती झाली. सूर्याच्या स्फोटातून तप्त वायूचा प्रचंड मोठा गोळा बाहेर पडला तो गोळा म्हणजेच पृथ्वी होय. पृथ्वीची निर्मिती दोन गृहाच्या टकरीतून झाल्याचे मानले जाते. आधुनिक संशोधनाप्रमाणे एक उष्ण गोळा सावकाश शीतल झाला व पृथ्वी निर्माण झाली तिच्यावर पर्वत, समुद्र, तलाव, नद्या निर्माण झाले. वैशेषिक दर्शनाचा आद्य प्रवर्तक कनाद यांनी इ.पू. सहाव्या शतकात पृथ्वी, जल, वायू व तेज या परमाणूंच्या संयोगानं सृष्टीची निर्मिती झाली हे सांगणारा परमाणुवाद मांडला. पृथ्वी सभोवतीच्या विविध वायू आवरणास वातावरण म्हणतात. सूर्यकूलातील ग्रहमालेचा जनक सूर्य आहे. त्यापासूनच सर्वांना उष्णता व प्रकाश मिळते. 'पर्यावरण ही प्रकाश, तापमान, जमीन, पाणी इ. ची संमिश्र संकल्पना आहे.' समाज जीवनाची सुखसमृध्दी आणि पर्यावरणाचा किती निकटचा संबंध आहे हे नव्याने सांगणे नको. प्रकाशातून प्रकाश संश्लेषण घडते, पाणी हरितद्रव्य निर्मित करते. नायट्रोजन जमिनीची सुपीकता वाढवते. अन्ननिर्मितीची प्रक्रिया तापमानामूळे जलद होते. बाष्प हरितद्रव्य निर्मिती, पदार्थ विघटन किंवा कूजण्यात मदत करते. वारा जीवांचे प्रसरण, वहन, प्रजोत्पादन इत्यादीला चालना देते. जमिनीतील रासायनिक घटकामूळेच जैविक प्रक्रिया घडतात. 'पर्यावरणातील अजैविक पदार्थ जैविकाकडे, जैविकाकडून विघटकांकडे व परत पर्यावरणाकडे सजिवांमार्फत मार्गक्रम करण्याच्या या चक्राकार प्रणालीस परिसंस्था असे म्हणतात.' परिसंस्थेतील चक्राकार प्रवाहामुळेच परिसंस्था जिवंत व चिरस्थायी आहेत. पृथ्वीवर सौरउर्जा, भौतिक व रासायनिक घटक विषमतेने वितरीत आहेत. संपूर्ण पृथ्वी म्हणजे मानव, प्राणी व सुक्ष्मजीव कार्यरत असलेली परिसंस्था आहे. विविध परिसंस्था विविध क्रिया प्रक्रियातून साकारतात. मात्र त्यांच्यात विविधतेत एकता असावी. एखाद्या घटकातील परिवर्तनाचा संपूर्ण परिसंस्थेवर विपरीत परिणाम निश्चितच होतो. त्यातूनच निसर्गचक्रात बिघाड येते. परिणामी जीवघेण्या समस्याची उत्पत्ती होते. 'अवर्षण' हा त्यापैकीच एक. पृथ्वी पृष्ठभागावरील सजीव उत्क्रांतीचा शेवटचा अविष्कार म्हणजे मानव. बुध्दिमत्ता, कल्पनाशक्ती, कार्यक्षमता, निर्णयक्षमता, तंत्रकौशल्य, महत्वकांक्षा, आकलन शक्तीच्या जोरावर त्याने निसर्गावर मात करून निसर्गचक्रात व्यत्यय आणला. मानव हा पृथ्वीवरील सर्वात

Scanned with OKEN Scanner

क्रियाशील घटक असून तो निसर्गामध्ये (पर्यावरणात) व भूपृष्ठावर परिवर्तन करण्यात सतत सक्रीय व क्रियाशील असतो. मानव हा पृथ्वीचे (पर्यावरणाचे) एक कूशाग्र व अभूतपूर्व अपत्य आहे. निसर्गानुसारच त्याची संपूर्ण जडणघडण होते. हवामानाचा मानवी जीवनावर व विकासावर परिणाम होतो. सृष्टीतील अर्थव्यवस्थेनुसार सृष्टीक्रम चालते. या सृष्टीक्रमात गतिशील विक्रमी बदल मानवाने घडवले आहे. पृथ्वीवरील सजीव सृष्टीत सर्वात बुध्दिमान, हुशार, चतुर प्राणी मानव असून तो आपल्या भोवतीच्या पर्यावरणाचा मोठ्या कल्पकतेने वापर करत आहे. आदिमानव ते यंत्रयुगातील आधुनिक मानवापर्यंत स्वतःच्या अमर्याद गरजा व मर्यादीत परंतू पर्यायी उपयोगाच्या साधन सामुग्रीद्वारे मानवी गरजापूर्तीसाठी पर्यावरणात निरंतर प्रयत्न करतो. तो कार्यतत्परता, प्रामाणिकपणा, नैपुण्य, कसब इ. मुळे प्रगतीच्या शिखरावर पोहचत आहे.

इतिहासपूर्व कालीन मानव :

प्राचीन मानवी इतिहास नोंदवण्यासाठी भौतीक साधने उपलब्ध नव्हती. जी होती ती अपूरी होती अशा काळास इतिहासपूर्व काळ किंवा मानवी संस्कृतीचा आदिकाल म्हणतात व त्या काळातील मानवास आदिमानव. कांही वर्षापूर्वी पृथ्वीवर जीव जंतूंची निर्मिती होऊन त्यातून वानर व वानरापासून मानवाची निर्मिती झाली. मानवी इतिहास म्हणजे रानटी अवस्थेतून प्रगत सुसंस्कृत सभ्य मानवाचा जीवन प्रवाह. मानवी इतिहासाची सुरूवात १ लाख वर्षापेक्षा जास्त वर्षापासून झाली. शारीरिक रचनेच्या दृष्टिकोनातून मानव १८ दशलक्ष वर्षापूर्वी Hominid या प्राण्याच्या स्वरूपात होता. इ.पू. २ लाख ५० हजार वर्षापूर्वी या Hominid चे रूपांतर Homo-sapiens मध्ये झाले व या Homo-sapiens पासून आधुनिक मानवाची निर्मिती झाली.[१] स्वरक्षणासाठी पशुप्रमाणे नैसर्गिक साधन (नखे, सिंग, दात,इ.) त्याकडे नव्हती. मात्र बुध्दीच्या देणगीमुळे दगडी, लाकडी, हाडांची हत्यारे (कुदळ, कु-हाड, भाल्याची पाते इ.) बनवून जीवन संघर्षातून विकास घडवला. यासाठी पाषाणाचा उपयोग केला गेला म्हणून या काळास पाषाण युग असे म्हणतात. या काळात मानव झाडावर, गुहात, कपारीत निवास करून शत्रूपासून, उष्ण व थंड वातावरणापासून स्वरक्षण करत होता व लज्जा रक्षणासाठी झाडांची साल व पशुच्या कातडीचा उपयोग करत होता. उदर निर्वाहासाठी प्राण्यांची शिकार करत असे. मांस, कंदमुळे, फळे, वृक्षवेलीची पाने आहार म्हणून घेत होता. पशुपेक्षा मानव कुशाग्र बुध्दीची देणगी लाभलेला प्राणी आहे. मानवी उदयापासूनच ज्ञान प्रारंभ झाले. त्या बळावरच त्याने दैनंदिन व्यवहारासाठीचे कौशल्य प्राप्त करून घेतले. त्याने पर्यावरणातील नैसर्गिक साधनांच्या वापरातून व अनुभवातून ज्ञान प्राप्तीस सुरूवात केली.

Scanned with OKEN Scanner

नंतर तो भटके जीवन संपवून टोळी करून राहू लागला. केलेली शिकार संचयी ठेवू लागला. शिटी, शंख, अस्थी इ. द्वारे मनोरंजन करू लागला. रंगीबेरंगी मातीने चित्र रंगवू लागला. त्याचा रूढी परंपरा, भूताटकी, जादूटोणा, मंत्र - तंत्र इ.वर अतिविश्वास होता. अशा प्रकारे दुर्बल मानव शिकारी बनला. शिकारीसाठी पशु (कुत्रा) पालन सुरू केले. शिकार, मासेमारी नंतर जमीनीतून पीक घेण्याची कला प्राप्त करून घेतली. त्यातून तो शेती करू लागला व शेतकरी बनला. शेती बरोबर पशुपालन ही सुरू केले. यातून गावांचा उदय झाला. ग्रामीण बलूतेदारी उदयास आली. वस्तू विनीमय पध्दती रूढ झाली. पूढे 'अग्नी' व 'चाक' याचा शोध मानवास लागला व मानवी जीवनात क्रांती घडली. पदार्थ भाजणे, शिजवणे, अग्नी देवून धातूपासून अवजारे, उपकरणे बनवण्याची कला त्याने अवगत केली. यालाच धातुयुग म्हणतात. मानवी विकासाचा पूढचा टप्पा त्याने गाठला.

आधुनिक मानव :

मानवी उत्पत्ती बद्दल मतभेद आढळतात प्रारंभी सत्य युगात मानव सुधारलेला असून नंतर त्याचा - ह्रास झाला असेही एक मत आहे परंतू आधुनिक संशोधनाप्रमाणे आधुनिक मानव हा सुखी व कल्याणकारी जीवनासाठी गरजापूर्तीसाठी अव्याहत धडपडत आहे. त्यातूनच विभिन्न व्यवसायाची निर्मिती घडवली. हे व्यवसाय पर्यावरणावरच अवलंबून असून प्रदेशान्वे पर्यावरण व व्यवसायात भिन्नता आढळते. व्यवसाय पर्यावरण आणि मानवी क्षमता यांच्या परस्पर प्रक्रियांचे प्रतिक असून मानवी व्यवसायाचे बदलते स्वरूप हा मानवी संस्कृतीच्या विकासाचा आलेखच आहे. भटक्या स्थितीतील असंस्कृत मानव स्थायी स्थितीतील सुसंस्कृत मानव बनला व तो व्यवसाय शोधत राहीला त्याने ज्ञात केलेल्या व्यवसायाचे चार गटात वर्गीकरण केले जाते.

- **प्राथमिक व्यवसाय :** जे व्यवसाय निसर्गावर किंवा नैसर्गिक पर्यावरणावर अवलंबून असतात त्यास प्राथमिक आर्थिक व्यवसाय म्हणतात. निसर्गातील उपलब्ध खनिज पदार्थाचा वापर करून कमी श्रमातून अधिक प्राप्ती करण्याचा व्यवसाय यात येतो. यात नैसर्गिक घटकाशी प्रत्यक्ष संबंध येतो. नैसर्गिक अनुकूलतेनुसार त्याचे वितरण झाले आहे. उदा : नद्याच्या सुपीक खो-यातून शेती, खानकाम, जलाशयातून मासेमारी, गवताळ प्रदेशातून पशुपालन, जंगलातून फळे, शिकार, कंदमुळे, लाकूड गोळा करणे.

Scanned with OKEN Scanner

- **द्वितीय व्यवसाय :** यात मानवाकडून निसर्गदत्त कच्चामाल अधिक उपभोग्य बनवण्यासाठी प्रक्रिया केली जाते. मानवी विकासाची ही उन्नत अवस्था होय. यात उद्योगधंदे, कारखाने येतात याचे केंद्रिकरण होताना आढळते.
- **तृतीय व्यवसाय :** निर्मित मालाचे ग्राहकापर्यंत मागणीनुसार वितरण व बाजारपेठेपर्यंत पोहचवण्याचे कार्य यात होते.
- **चतुर्थक व्यवसाय :** यात उपजिविकेसाठी निर्मित पदार्थ नसून पर्यावरणाच्या कमाल लाभाची क्षमता मानवास प्राप्त होते. यात मानवी कला, कौशल्य, बुध्दीमत्ता इ. चा वापर व देवघेव होतो. यात शास्त्रज्ञ, संशोधक, प्रशासक, डॉक्टर व शिक्षक इ. घटकांमार्फत व्यवसाय होतो. थोडक्यात मानव हा आर्थिक विकासात महत्वाचा घटक असून तो साधनसंपत्तीच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे.

मानवी विकासात नानाविध नैसर्गिक साधन संपत्तीची गरज असते. त्यापैकी जलसंपदा ही महत्वाची मानली जाते. कारण मानवी मूलभूत गरजामध्ये हवे इतके महत्व जलसंपत्तीला आहे. इतिहासावरून हे सिध्द होते की नदी काठी मानवी वस्त्या, संस्कृत्या वसल्या आणि तिथूनच विकसीत झाल्या. जगातील ७५% वस्त्या, गावे, शहरे नदी काठीच विराजमान आहेत व ९८% लोकसंख्या समुद्र, नद्या, तळी, सरोवर इ. जलसाठयांच्या सान्निध्यात वास्तव्य केल्याचे आढळतात. पृथ्वीच्या एकूण क्षेत्रफळापैकी ७१% भाग पाण्याने व्यापलेला आहे. त्यामुळे पृथ्वीला पाण्याचा गृह ही म्हणतात. भूपृष्ठावरील पाण्यापैकी ९७.२% पाणी सागर महासागरात आहे. फक्त २.८% पाणी गोड किंवा स्वच्छ असते. या गोड पाण्यापैकी ०.७५% पाणी हिमाच्छादित क्षेत्रात हिमनद्या व हिमानी व्यापले आहे. शिल्लक ०.२५% भूपृष्ठभागाखाली ७५० मीटर पर्यंत असावे. गोड पाण्यापैकी ०.३% पाणी सरोवरात ०.०६% पाणी पृष्ठभागाजवळ जमिनीत आणि ०.३% पाणी नद्यात असते. म्हणजे शुध्द पाणी अतिशय दुर्मिळ किंवा अपूरे आहे.[२] पाणी जलचक्राच्या चक्रमय पध्दतीने उपलब्ध होते. पर्जन्य हेच जलाचे मुख्य स्त्रोत आहे तर दुय्यम स्त्रोत कूपनलिका, झरे, ओढे, नद्या, सरोवर, समुद्र, महासागर व विहरी हे आहेत. पाण्याचा पिण्यासाठी, घरगुती वापर, कृषी, वीजनिर्मिती, औद्योगिक क्षेत्रात, जलवाहतूक, मत्स्य व्यवसाय इ. साठी उपयोग करून घेतला जातो. पूर्वी पाणी मूबलक होते. काळ परिवर्तनाबरोबर त्यातही बदल झाला. वाढती लोकसंख्या व मर्यादित पाणी उपलब्धता यामुळे पाण्याच्या वाढत्या गरजेमुळे उपलब्ध पाणी साठ्यावर ताण वाढत आहे. पाण्याच्या उपलब्धतेवरच मानवाचा आर्थिक विकास व आरोग्य निर्भर आहे. थोडक्यात जल

Scanned with OKEN Scanner

हे जीवसृष्टीचा आधार आहे. म्हणूनच म्हटले जाते 'जल है तो कल है' आजच्या काळात पाण्याचे प्रदूषण (भूकंप, ज्वालामुखी, पूर, वादळे, मानवी हस्तक्षेपामुळे) होवून पाण्याची आम्लता, रंग, चव, गढूळपणा, पारदर्शकता बदलून ते वापरण्या अयोग्य बनले आहे. त्याच बरोबर पाण्याचा अविवेकी वापर केल्यामुळे वाढत्या लोकसंख्येला ते अपूरे पडत आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे. त्यात अवर्षणाने भर घातली आहे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न मराठवाड्याबरोबर जगात गंभीर स्वरूप धारण करीत आहे. जलसंपदा बरोबर शेती ही मानवी विकासात महत्वाची ठरते.

जगातील पहिला व सर्वात मोठा व्यवसाय शेती हाच आहे. मानव वंश शास्त्रज्ञ, पुरातत्व संशोधक, मानव विकास शास्त्रज्ञ, अर्थतज्ञ इ. च्या मते शेती हेच मानवाच्या कौशल्याचे आधार क्षेत्र असून मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. शेती व निसर्ग यात अतूट नाते आहे. जलद औद्योगिकरणाच्या युगातही उपजिवीकेचे साधन, कच्च्यामालाचा पूरवठा, राष्ट्रीय उत्पन्न प्राप्ती, रोजगार निर्मिती, निर्यातीतून परकीय चलन प्राप्ती. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा या दृष्टीने शेतीचे महत्व अधोरेखित होते.

अर्थशास्त्रीय दृष्टीने भूमीला व्यापक दृष्टीने पाहिले जाते. ती निसर्गदत्त, मर्यादित, मूलभूत साधन संपत्ती मानली जाते. मानवाच्या जीवनावश्यक गरजांची (अन्न, वस्त्र, निवारा) पूर्तता शेतीतून होते. शेतीज्ञानातून शिकारी व भटके जीवन स्थिर झाले आहे. म्हणूनच शेतीला मूलभूत, प्राथमिक आर्थिक व्यवसाय म्हणतात. पूढे शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानातून शेतीत आधुनिकता आली. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शेतीतील संशोधनास गती प्राप्त झाली. जैवतंत्रज्ञानाने शेतीत क्रांती घडवली. हवामान, बाजारपेठ, आधुनिक बी-बियाणे व इतर आदानाची माहिती घरबसल्या प्राप्त होत आहे. कृषी व्यवस्थापन, भूमी उपयोजन, पाणी वापराचे नियोजन, प्रादेशिक नियोजनास महत्व निर्माण झाले. शेतीतील संशोधन व त्यातून प्राप्त निष्कर्ष समाजाला, नियोजनकाराला उपयुक्त व मार्गदर्शक ठरू लागले आहे. शेती सर्व आर्थिक विकासाचे केंद्र आहे. मात्र आज ज्यावर शेती अवलंबून आहे ते पर्जन्य घटत जावून अवर्षण निर्माण होत आहे. त्यामूळे शेती हा कष्टाचा, धाडसाचा अशाश्वत प्रयोग ठरतो. निसर्गाची, पर्जन्याची साथ नसेल तर मानवी प्रयत्न ही कृषी उत्पादनात अपयशी ठरतात.

शेतीवरील पर्जन्याच्या प्रतिकूल परिणामामूळे ग्रामीण अर्थव्यवस्थेची इमारतच कोसळत आहे. भारतीय ग्रामीण समाजातही अमूलाग्र बदल झाला आहे. स्वायत्ता, स्वयंपूर्ण विलक्षण सामर्थ्य असलेली, वस्तु विनीमय पध्दतीवर निर्भर व स्थैर्य असलेली प्राचीन काळाची खेडी आज आस्तित्वात नाहीत. पूर्वीची

Scanned with OKEN Scanner

खेडी स्वावलंबी, स्वतंत्र, पूर्ण रोजगार असलेली, स्वयंभू होती. ब्रिटीश आगमन व त्यांचे शोषित धोरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे अधपतन झाले. हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे जाणीवपूर्वक घडवलेले विघटन होते. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पायाच उखडला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण खेड्यांचा विकास हाच भारताच्या विकासाचा कणा आहे. हा भाग पूर्वीपासून उपेक्षित आहे. त्यात अवर्षणाने रूद्र रूप धारण केले आहे त्यामुळे याचेही संशोधन होणे गरजेचे आहे.

अवर्षण :

मान्सूनचा लहरीपणा, नैसर्गिक आपत्तीचा फटका प्रामुख्याने ग्रामीण जनतेला जास्त बसतो. ग्रामीण भागात उदरनिर्वाहाची साधने मर्यादीत असतात व बहुतांशाचे जीवन मान्सूनवर निर्भर असते. त्यामूळे अवर्षण ही एक चिंतनीय बाब आहे. पर्जन्य घटल्यामुळे ग्रामीण जनतेच्या, शेतक-यांच्या, शेतमजूरांच्या, ग्रामीण व्यावसायिकांच्या जीवनातील चैतन्य हरवले आहे. अवर्षणाचा परिणाम अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर, शेतकरी, ग्रामीण व्यावसायीक इत्यादीवर होतो. अवर्षण काळात पाण्याचे दुर्भिक्ष्य, अन्नटंचाई, बेकारी, स्थलांतर, कर्जबाजारीपणा, आत्महत्या इ. समस्या निर्माण होतात. वेळेत उपाययोजना करून, शासकीय योजना राबवून, उदरनिर्वाहाची साधन उपलब्ध करून दिल्यास वरील समस्याची तीव्रता कमी करता येईल का? हे शोधण्यासाठी मराठवाड्यातील अवर्षणाचा व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार या संशोधनात केला आहे.

अवर्षण शब्द उत्पत्ती :

'अवर्षण' या शब्दात 'अ' म्हणजे नाही 'वर्षण' म्हणजे वृष्टी. अवर्षण म्हणजे वृष्टी नाही. अवर्षण म्हणजे दीर्घकाळ पर्जन्य विरहीत परिस्थिती. अवर्षण ही संज्ञा कांहीशी सापेक्ष आहे.[३] एखाद्या प्रदेशात दीर्घकाळ सातत्याने सरासरीपेक्षा खूप कमी /अजिबात पर्जन्य न होणे म्हणजे अवर्षण होय.

अवर्षणाचा अर्थ : अवर्षण या संज्ञेचा सर्वसाधारण अर्थ म्हणजे पावसाचा अभाव. अवर्षण ही एक अशी नैसर्गिक आपत्ती (निर्गातील बदलामूळे येणारी आपत्ती) आहे जी पर्यावरणातील वातावरण व हमानातील घटक परिवर्तनामूळे उद्‌भवते. हवामान बदलाचा विशेषतः अवर्षणाचा मानवी जीवनावर व विकासावर परिणाम होतो. पर्जन्याच्या दुर्भिक्षामूळे जगातील $\frac{1}{3}$ क्षेत्रात, भारतात $\frac{1}{3}$ क्षेत्रात, महाराष्ट्रात $\frac{1}{3}$ क्षेत्रात, मराठवाड्यात $\frac{1}{3}$ (३९%) क्षेत्रात अवर्षण ही कायमची आपत्ती, सजीव सृष्टीवर अचानक ओढवलेले संकट किंवा आरिष्ट बनले आहे. मानवावर, प्राण्यावर, जीवजंतूवर, सजिवावर वारंवार

Scanned with OKEN Scanner

ओढवणारी पर्यावरणीय आपत्ती म्हणजे अवर्षण होय. ही पर्यावरणीय विनाशकारी घटना आहे. त्यामूळे मानवी जीवन पध्दती बदलते. दुष्काळाचे मूलभूत कारण अवर्षण हेच आहे. कोरडवाहू शेतीवर ज्या देशाचे उत्पन्न निर्भर आहे त्याचे भयंकर नूकसान होते. मात्र त्याचा काळ, विचलीतता, आरंभ व अंत निश्चित नसतो. पर्जन्याची कमतरता म्हणजे अवर्षण असा साधा अर्थ काढला जातो. पण ती व्यापक संकल्पना आहे. पर्जन्य व बाष्पीभवन प्रक्रियावरून 'जल न्यूनता' किंवा 'जल अधिशेष' ठरविता येते. वार्षिक पर्जन्यापेक्षा बाष्पीभवन जास्त होत असल्यास अवर्षण परिस्थिती निर्माण होते. वातावरणीय शुष्क हवेचा दीर्घकालीन अविष्कार म्हणजे अवर्षण. तो परिस्थितीकीय अभिव्यक्ती व शेतीवरील प्रभावाचा ठळक निर्देशक आहे. वार्षिक, ऋतूनुसार, रात्रदिवसाचे पाऊस वितरण याची निर्भरता, गहणता, आणि पावसाच्या प्रकारांच्या आधारांवर अवर्षणाची घटना ठरवली जावू शकते. पर्जन्य कमतरतेच्या संचयी प्रभावातून अवर्षण निर्माण होते. तो नैसर्गिक संकटरूपाने कृषी, नैसर्गिक वातावरणावर प्रभाव पाडतो. त्याचा प्रभावीपणा सतत वाढत जावून दुष्काळ स्थिती उदभवते. वैज्ञानिक भाषेत 'अवर्षण कोणत्याही भूभागावर व्याप्त अशा असामान्य मौसमाच्या परिस्थितीला म्हणतात जेथे पाऊसाची शक्यता असते पण पाऊस आलेला / पडलेला नसेल'.[४] शुष्कतेमध्ये दीर्घकाळ वाढ झाल्या कारणाने अवर्षण स्थिती बनते. अवर्षणाने शेतातील माती कोरडी पडते. कोरड्या जमिनीत बाष्पोत्सर्जन आणि बाष्पीभवनास गरजेचे पाणी ही शिल्लक नसते त्यामूळे त्यामातीतून पिकांना आर्द्रता मिळणे बंद होऊन तेथील पीके नष्ट होतात.

अवर्षणाच्या व्याख्या :

अवर्षणाच्या अभ्यासकांनी संबंधित विषय तज्ञांनी अवर्षणाविषयी सखोल अध्ययन करून आपापल्या विशिष्ट प्रयोजनानुसार त्यासंबंधी व्याख्या मांडलेल्या आहेत. सामान्यपणे अवर्षणाचे विविध निकषांच्या आधारे पुढीलप्रमाणे अर्थ लावता येतात.

विविध दृष्टीकोनातून अवर्षणाच्या केलेल्या व्याख्या [५]

- **वातावरण शास्त्रज्ञाच्या दृष्टिने :** 'अवर्षण म्हणजे सामान्य वृष्टीप्रमाणापासून होणा-या वृष्टीप्रमानाचे विचलन होय'.
- **जलवैज्ञानिकांच्या मते :** 'वाहते पाणी, सरोवर, भूमिगत पाणी यांची जलपातळी कमी होणे म्हणजे अवर्षण होय'.

Scanned with OKEN Scanner

- **शहरी नागरिकांचा दृष्टीकोन :** 'अपूरा पाणी पूरवठा, पिण्याच्या पाण्याची टंचाई म्हणजे अवर्षण होय'.
- **जलसंतुलन संकल्पनेनुसार :** 'वृष्टी व मृदेतील ओलाव्यामूळे उपलब्ध होणारे पाणी बाष्पोत्सर्जनासाठी पुरेसे नसते अशी पर्यावरणीय स्थिती म्हणजे अवर्षण होय'.
- **शेतक-यांच्या दृष्टीकोनातून :** 'पीक वाढीच्या काळात जमिनीत ओलावा नसणे किंवा जमिन कोरडी पडणे म्हणजे अवर्षण होय'.
- **अर्थशास्त्रीय दृष्टीकोन :** 'दुष्काळ परिस्थिती म्हणजे अवर्षण होय'.

विविध शास्त्रज्ञांनी अवर्षणाच्या खालील व्याख्या केल्या आहेत [६]

- **थॉर्न थ्वेट :** 'जमिनीच्या पृष्ठभागावरून होणारे बाष्पीभवन व रोपांद्वारे होणारे बाष्पनिष्कासन या करिता लागणा-या पाण्याची गरज जमिनीतील पाण्याच्या उपलब्धतेपेक्षा अधिक असते तेव्हा अवर्षणाची परिस्थिती उदभवते'.
- **हवामान शास्त्रज्ञांच्या मते :** 'एखाद्या विस्तृत क्षेत्रात नेहमीच्या पाऊसमानाच्या कांही ठरावीक प्रमाणापेक्षा कमी पाऊस पडतो तेव्हा त्या परिस्थितीला अवर्षण म्हणून संबोधावे'.
- **भारतीय हवामान शास्त्रज्ञ :** 'भारतीय हवामान शास्त्रज्ञांनी असा दंडक घालून दिला आहे की नेहमीच्या वार्षिक पर्जन्यवृष्टीच्या ७५% किंवा त्याहून कमी वृष्टी एखाद्या वर्षी झाल्यास ते वर्ष अवर्षणाचे समजावे व ५०% पेक्षा ही कमी वृष्टी झाल्यास ते तीव्र अवर्षणाचे वर्ष मानावे'.
- **अर्थशास्त्रज्ञांच्या मते :** 'पाणी टंचाईमूळे जेव्हा उत्पादनामध्ये इतकी घट होते की संबंधित प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेवर तिचा विपरीत परिणाम होतो तेव्हा ती अवर्षणाची स्थिती असते'.
- **कृषि शास्त्रज्ञांच्यामते :** 'पावसाच्या कमतरतेमुळे जेव्हा पिकांच्या वाढीकरीता योग्य वेळी जमिनीमध्ये आवश्यक त्या ओलाव्याचा अभाव निर्माण होतो व त्यायोगे पिकांची हानी होते तेव्हा ते अवर्षण होय'.

Scanned with OKEN Scanner

- **सी.जी.बेटेज** [७] : 'अवर्षणाची स्थिती तेव्हा निर्माण होते जेव्हा वार्षिक पाऊस सामान्य पावसाच्या ७५% किंवा त्यापेक्षा कमी किंवा मासिक पाऊस सामान्य मासिक पावसाच्या ६०% किंवा त्यापेक्षा कमी असतो'.

  थोडक्यात अवर्षण ही एक हवामान विषयक आपत्ती आहे.

अवर्षणाची स्थिती [८] :

भारतीय मौसम विभागाने पावसाच्या दिशा व अवर्षणाच्या तीव्रतेच्या आधारावर अवर्षणाची स्थिती स्पष्ट केली आहे. ती पूढील प्रमाणे

१) सामान्यापेक्षा जास्त : +२०% किंवा मागील ७० ते १०० वर्षाच्या सरासरी पेक्षा जास्त.

२) सामान्य : +१९% ते - १९%, ७० ते १०० वर्षाच्या सरासरीच्या

३) अपूर्ण : -२०% ते - ५९% ७० ते १०० वर्षाच्या सरासरीच्या

४) अतिकमी : ६०% किंवा मागील ७० ते १०० वर्षातील सरासरी पेक्षा कमी.

अवर्षणाच्या स्थितीत जमिनीत आर्द्रता जमा करण्याची क्षमता घटते. त्यामूळे जमिनीचे उपयोग व पिक याचे भयंकर नूकसान होते.

अवर्षण निर्देशांक [९] :

व्यंकटरामन व खांबाटे या शास्त्रज्ञांनी 'ॲग्रीक्लायमॅटॉलॉजिकल ॲसिसमेंट ऑफ इंटिन्सिटी ऑफ प्रोननेस टू ॲण्ड एरियल स्प्रेड ऑफ क्रॉप ड्राऊटस' या आपल्या लेंखात 'क्रॉप ड्राऊट इंडेक्स' (अवर्षणाचा निर्देशांक) निश्चित केला आहे. पी.ई.मूल्यांच्या ०.६ ते ०.७ इतका पाऊस पडतो तेव्हा हलके अवर्षण संभवते असे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यामूळे पीई X ०.६ इतका किंवा त्याहून कमी पाऊस झाल्यास अवर्षणाची तीव्रता हलकी राहणार नाही. म्हणून पीई X ०.६ हे अवर्षण दर्शविणारे पाऊसमान गृहीत धरले आहे.

अवर्षणाचा इतिहास :

जागतिक पातळीवरील अवर्षण [१०] : अवर्षण ही संकल्पना प्राचीन काळापासून आढळते. तीचे स्वरूप विश्वव्यापी आहे. साधारणत: जगातील ६० करोड जनता या अवर्षण प्रवण क्षेत्रात राहते. जगातील

अनेक राष्ट्रात अवर्षण स्थिती निर्माण झाल्याची नोंद अनेक साहित्यातून मिळते यापैकी प्रमुख राष्ट्रातील अवर्षण स्थिती पुढील प्रमाणे

१. **आफ्रिका :** उत्तर आफ्रिकेच्या उत्तरेमध्ये सहाराच्या उष्ण व ओसाड रेगिस्तानचा भाग आणि दक्षिणेतील सवाना प्रदेशामधील पश्चिमेपासून पूर्वेकडील विस्तीर्ण क्षेत्राला सहेल प्रदेश म्हणतात. या उष्ण कटिबंधीय आफ्रिकेचा सहेल प्रदेश सतत अवर्षणाचा शिकार बनत आहे. यामध्ये अल्जिरिया, लिबीया, नामिबिया, उत्तर सुदान, उत्तर केनिया, सहारा, कालाहारी वाळवंट, नैऋत्य आफ्रिका, मारिटोनिया, सेनिगल, माली, नायजर, नायजीरिया, चाड, युगाण्डा व इथियोपिया देशाचा भाग समाविष्ट केला जातो. जगातील सर्वात जास्त अवर्षणग्रस्त क्षेत्र सहेल प्रदेश आहे जे आफ्रिका महाद्विपाच्या एका टोकापासून दुस-या टोकापर्यंत विस्तारीत आहे. तेथे १९६८ ते १९७५ पर्यंत अवर्षण होते. १९७१-७२ मध्ये त्याची तीव्रता जाणवली. परिणामी १९७४ मध्ये मानव प्रलय घडले. भूजलसाठे संपले. विहरी कोरड्या पडल्या, उच्च किमतीचे प्राणी स्वस्तात विक्री झाले. शेतकरी गुलाम बनले. भूकबळी, तहान व रोगामुळे हजारो मेले. केवळ इथोपियात ५० हजार व्यक्ती अवर्षणाचे बळी ठरले.

येथील ४०% लोकसंख्या पाण्याच्या दुर्भिक्ष्यात जगते. १९८० मध्ये दक्षिण आफ्रिकेत ग्रीष्मकालीन अवर्षणामुळे गहू पीकाला मोठा धोका झाला. इथिओपियातील १९८५ चे अवर्षण हे या शतकातील विक्रमी अतिगंभीर अवर्षण मानले जाते.

२. **ऑस्ट्रेलिया :** ऑस्ट्रेलियाही अवर्षण ग्रस्त प्रदेश आहे. येथे मरूस्थलीय परिस्थिती ७५% भागात आढळते. येथे १८९५ ते १९०२ मध्ये प्रचंड अवर्षण होते. अवर्षणाची तीव्रताच एवढी होती की १८९१ ला मेढ्यांची संख्या १०६९ लाख होती ती १९०२ ला ५४० लाखच राहीली केवळ अवर्षणामुळे. १८९५ ते १९०२, १९११ ते १९१६ व १९१९ - १९२० मध्येही प्रचंड अवर्षण होते परिणामी कृषी क्षेत्र घटले.

३. **इंग्लंड :** इंग्लंड जे की प्रगत राष्ट्र संबोधले जाते तेथेही अवर्षण होते. येथे १९७५-७६ मध्ये प्रचंड अवर्षण झाले होते. या दरम्यान तेथे सामान्यापेक्षा ४०% कमी पर्जन्य झाले होते. परिणामी पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवले. कृषि उत्पादन घटले. वेल्स प्रांतात गहू व बटाटा उत्पादन घटले. यामुळे ब्रिटिश शासनाला या अवर्षणापासून मुक्ती मिळवण्यासाठी अवर्षण / दुष्काळ मंत्री नियुक्त करावे लागले.

Scanned with OKEN Scanner

४. **अमेरिका :** आजचे सर्वात विकसीत राष्ट्र संबोधले जाणारे अमेरिकाही अवर्षणापासून मुक्त नाही. सतत पाऊस न पडल्यामुळे बराच भाग अवर्षणाच्या तडाख्यात सापडतो. या प्रदेशात पाण्याचे रेशीनिंग करावे लागले. जार्जिया व अटलांटामध्ये दीड डझनपेक्षा जास्त शहरात पाण्याचे रेशीनिंग सुरू केले होते. अवर्षणाच्या तीव्रतेने जंगलातील वाळलेले झाडे जळून खाक झाली. कोलोरेडो, न्यू मॅक्सिको व एरिजोनामध्ये वाळलेल्या जंगलातील अग्निकांडाने ३२,००,००० एकर वनक्षेत्र जळाली. कोलोरेडो, न्यू मॅक्सिको, पश्चिम मॅक्सिको, दक्षिण अमेरिकेतील ब्राझीलचा दक्षिण भाग, पेरू, एरिजोना, साऊथ डकोटा, उत्तर चिली, आटाकामा वाळवंटीप्रदेश, अटलांटा, टेक्सास, जार्जिया व डेनवर इ.ठिकाणी अवर्षण असते. कोलोरेडो विश्व विद्यालयाचे कृषि विशेषज्ञ जैफ ट्रैनेल चे म्हणणे होते की कोलोरेडोची हुरफेनो काऊंटी मध्ये जवळ जवळ २८०० गायी होत्या अवर्षणामुळे त्यात घट झाली. त्यांच्यामते १९३० ते १९५० च्या दशकातही अवर्षण काळात व अवर्षणानंतरही सर्वात भयानक स्थिती होती. लेकलिनियर व इतर जलशयाचे स्तर १२ फूटानी घटले होते. रिचे-ग्रॅड नदीत २% पाण्याची आवक झाली. या शेतकरी व गुराखी यांना शासकीय अनुदानाने रोजीरोटी व चारा यासाठी ऋण/कर्ज दिले जात होते. १९८० मध्ये संयुक्त राष्ट्रात ग्रीष्मकालीन अवर्षणामुळे गहू पिकास मोठा धोका झाला होता.

दक्षिण अमेरिकेतील अटाकामातील रेगिस्तानात सन १९८९ ते १९९४ दरम्यान आंशिक स्वरूपात पर्जन्य झाले. संयुक्त राष्ट्राचे पश्चिम भाग, चिली व दक्षिण अर्जेन्टीना मध्ये २० ते ३०% पर्जन्य परिवर्तनशिलता आढळते त्यामुळे हे क्षेत्र अवर्षणग्रस्त होतात.

५. **आशिया खंड :** भारत, सौदे अरेबिया, इराण, इराक, पाकिस्तानचा पूर्व भाग आणि पश्चिम व मध्य ऑस्ट्रेलिया हे अवर्षण प्रवण प्रदेश आशिया खंडात आढळतात.

भारतातील अवर्षण :

आशिया खंडातील विकसनशील राष्ट्र असलेल्या भारतातही अवर्षण जाणवते. भारतात १६% अवर्षण प्रवण क्षेत्र आहे. भारतीय सिंचन आयोगाच्या मते एकूण ७७ जिल्ह्यात ७५ टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडतो, यात एकूण कृषियोग्य भूमि ३४% येते. ५ जिल्ह्यात अवर्षणाची शक्यता सदैव असते. यात उत्तर पश्चिम मरूस्थलीय व अर्ध मरूस्थलीय क्षेत्र, महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशाचे पर्जन्य छायेचे प्रदेश मुख्यत: तिरूविल्लेई, कोईम्बतूर, सौराष्ट्र कच्छ, मिर्झापूर, पलामू, पश्चिम बंगाल, कालाहांडी (ओरीसा),

Scanned with OKEN Scanner

राजस्थान, कच्छ, उदयपूर, ग्वाल्हेर, माळवा, गुजरात, पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगडचा भाग, पश्चिम राजस्थान आणि कच्छचा भाग, मध्य महाराष्ट्र, मध्य कर्नाटक, रायलसीमा, दक्षिण तेलंगणा आणि तामिळनाडूचा काही भाग, उत्तर पश्चिम बिहारचा काही भाग आणि पूर्व उत्तर प्रदेशचा काही भाग (मिर्झापूर) पश्चिम बंगालच्या लगत उडीसाचा काहीभाग ही अवर्षणग्रस्त आहेत. अवर्षणाची सर्वाधिक वारंवारीता सरासरी उत्तर पश्चिम भागातील थारच्या वाळवंटात (रेगिस्तान) असते. ज्याचा प्रसार मुख्यतः राजस्थानात होतो. कर्नाटक, तामिळनाडू, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रही अत्यंत अवर्षण प्रवण राज्य आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी १०० वर्षात जवळजवळ २८ वेळा अवर्षण झाले त्यात दोन करोड तर त्याच्या पहिले १०० वर्षात जवळजवळ ४ करोड लोक मेले ज्याचे मुख्य कारण ब्रिटिश शासनाचे अवर्षणासंदर्भात दुर्लक्षित धोरण हे होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर (१९४७ नंतर) अवर्षण वारंवार पडलेले आहेत. त्याचा त्याप्रदेशावर, व्यक्तीवर परिणाम झालेला असतो. जसे १९६६ बिहार ओरीसा ५ करोड, १९६९ राजस्थान, गुजरात, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, हरियाणा, कर्नाटक, मध्यप्रदेश १.५ करोड, १९७० बिहार, राजस्थान १.७२ करोड, १९७२ राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश ५ करोड, १९७९ राजस्थान, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश २० करोड, १९८२ राजस्थान, हिमाचल प्रदेश, पंजाब १० करोड, १९८३ तामिळनाडू, पश्चिम बंगाल, केरळ, राजस्थान, कर्नाटक, बिहार, उडीसा १० करोड, १९८७ संपूर्ण उत्तर, पश्चिम आणि पूर्वोत्तर भारत ३० करोड, २००० राजस्थान, गुजरात, उडिसा, मध्यप्रदेश १० करोड, २००१ राजस्थान, गुजरात, उडीसा, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड, हिमाचलप्रदेश १७ करोड लोकावर अवर्षणाचा परिणाम झालेला जाणवला. वरील प्रमाणे त्या त्या वर्षी संबंधीत राज्यातील परिणामीत व्यक्ती होते.

मान्सुन पर्जन्याची विचलिनता, त्याचे आगमन व निर्गमनातील अनिश्चितता, असमान वितरण इ. मुळे भारतात वारंवार कोणत्या ना कोणत्या भागात अवर्षणाची स्थिती निर्माण होतेच. भारतात साधारणः ६७ जिल्हे दीर्घकालीन अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. एकूण अवर्षण क्षेत्र सुमारे ५,२६,००० चौ.कि. असून त्यापैकी ६०% क्षेत्र राजस्थान, कर्नाटक व आंध्रप्रदेश या राज्यात आहे.[११] भारतात जवळ जवळ २०% लोकसंख्या अवर्षण प्रवण क्षेत्रात राहते. भारतात १९१८-१९ मध्ये एकूण ७३% क्षेत्र अवर्षणामुळे प्रभावित झाले होते. ३२.३% अन्नधान्याचे उत्पादन घटले होते. सन १९६५-६६ मध्ये १८.८%, सन १९७२-७३ मध्ये ७.७%, सन १९७९-८० मध्ये १७% अन्नधान्य उत्पादन सरासरीने घटले होते. सन १९९९-२००० मध्ये पश्चिम राजस्थानात चारा, पाण्याअभावी हजारो प्राणी मेले व लाखो स्थलांतरीत झाले.[१२]

Scanned with OKEN Scanner

भारताचे ५१.१२% मिलियन हेक्टर क्षेत्र अवर्षण ग्रस्त आहे. देशात कुठे अवर्षण तर कुठे दुष्काळ सदृश्य स्थिती असते. सन १९७२ च्या सिंचन आयोगाच्या पाहणीनुसार एकूण लागवड क्षेत्राच्या १/३ भाग सतत अवर्षणाच्या छायेत असतो. पश्चिम राजस्थान आणि कच्छ हे विभाग तीव्र अवर्षणाचे तर गुजरात, मध्यमहाराष्ट्र, दक्षिण तेलंगणा, पश्चिम उत्तर प्रदेश, पश्चिम मध्य प्रदेश तसेच कर्नाटक, पंजाब, हरियाणा, तामिळनाडू या राज्याचा काही भाग अवर्षण प्रवण आहे.[१३] भारतीय उपखंडातील भूतकालीन अवर्षण व दुष्काळाचे कारणच ग्रीष्म मान्सूनचे अपयश आहे. पावसाच्या प्रमाणात सरासरी विचलन पिक नूकसानीचे कारण ठरते. १९६२-६४ व १९८६-८८ या वर्षी महराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, राजस्थान येथे अवर्षण होते. परिणामी सिंचन क्षेत्र घटले.

तक्ता १.१ : भारतातील अवर्षणाची राज्यनिहाय जिल्हे, तालूके व भौगोलिक क्षेत्र

अ.क्र	राज्य	जिल्ह्यांची संख्या	तालूक्यांची संख्या	भौगोलिक क्षेत्र (०००) हे.
१	२	३	४	५
१	आंध्र प्रदेश	७	६०	९७००
२	गुजरात	११	६०	७०७०
३	हरियाणा	३	४	८१०
४	मध्यप्रदेश	९	२४	४०९०
५	महाराष्ट्र	१०	४५	६२५०
६	कर्नाटक	१२	८८	१०३५०
७	राजस्थान	९	१९	७४८०
८	तामिळनाडू	७	२४	३९८०
	एकूण	**६८**	**३२४**	**४९७३०**

(स्त्रोत : घारपूरे विठ्ठल (१९९९), पर्यावरण भूगोलशास्त्र पृष्ठ.२१६)

वरील तक्त्याच्या अवलोकनातून हे स्पष्ट होते की सर्वात जास्त (१२) अवर्षण ग्रस्त जिल्हे कर्नाटक राज्यात आहेत व सर्वात कमी (३) हरियाणा राज्यात आहेत. तसेच सर्वात जास्त तालूक्यांची संख्या (८८) कर्नाटक राज्यात आहे तर सर्वात कमी (४) तालूके हरियाणा राज्यात आहेत. भौगोलिक क्षेत्र ही सर्वात जास्त (१०३५० हे.) कर्नाटक राज्यात तर सर्वात कमी (८१० हे.) हरियाणा राज्यात आहे. भारतातील एकूण लागवडी खालील क्षेत्रापैकी सुमारे १/३ क्षेत्र अवर्षण ग्रस्त आहे. सुमारे १.५५ द.लक्ष.चौ.किमी क्षेत्र अवर्षणग्रस्त आहे.

Scanned with OKEN Scanner

भारतातील अवर्षण विभाग[१४] : भारतामध्ये अवर्षणाच्या तीव्रतेवरून खालील तीन अवर्षण विभाग आढळतात.

१) **अत्यंत तीव्र अवर्षणग्रस्त विभाग :** राजस्थानच्या कच्छचा समावेश या विभागात होतो. भारताच्या अवर्षण क्षेत्राच्या ११.५४% क्षेत्र तीव्र अवर्षणाचे आहे.

२) **तीव्र अवर्षणग्रस्त विभाग :** उदयपूर, ग्वाल्हेर, माळवा पठार, पश्चिम घाटाचा पर्जन्य छायेचा प्रदेश यात रायलसीमा, तेलंगणा, इशान्य कर्नाटक या प्रदेशाचा समावेश या विभागात होतो. देशातील एकूण अवर्षण क्षेत्रापैकी ४२% तीव्र अवर्षण क्षेत्र आहे.

३) **साधारण अवर्षणग्रस्त विभाग :** कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र या राज्यातील क्षेत्र या विभागात येतात.

भारतातील भौगोलिक रचनेत आणि हवामानात विविधता आढळते. मौसमी पावसात दरवर्षी चढउतार आढळतो. त्यामुळे भारतासमोर अवर्षण हे पर्यावरणीय आपत्तीचे मोठे आव्हान आहे. सर्व साधारणपणे आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यात नेहमी कोणत्या कोणत्या भागात अवर्षण जाणवते. याशिवाय पश्चिम बंगाल, ओरीसा, आंध्र प्रदेश या राज्याच्या किनारी भागातही अवर्षणाची समस्या प्रकर्षाने जाणवते.

महाराष्ट्रातील अवर्षण : महाराष्ट्रातील एकूण जमिनीपैकी एक तृतीयांश (१/३) भाग अवर्षण ग्रस्त म्हणून ओळखला जातो.[१५] महाराष्ट्रात अवर्षण प्रवण क्षेत्रात वार्षिक सरासरी पर्जन्यमान ४०० ते ६२५ मिमी च्या आसपास असतो. १४ जिल्ह्यातील ९४ तालूके महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण आहेत. महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व खान्देशचा कांही भाग अवर्षण प्रवण म्हणून ओळखला जातो. शासन नियुक्त समित्या व अभ्यासगटाच्या अहवालानुसार केंद्र शासनाने मान्य केलेले महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यात ७४ तालूके व महाराष्ट्र शासनाने सुकथनकर समितीच्या अहवालान्वे मान्य केलेले १५ तालूके एकूण ८९ अवर्षणप्रवण तालूक्यामध्ये मराठवाड्यातील १९ तालूके आहेत. सुब्रमण्यम समितीने (१९८४) महाराष्ट्रात एकूण १४ जिल्ह्यातील ९४ तालूके अवर्षणप्रवण म्हणून शिफारस केली व नवनिश्चित केलेली ६ पैकी ५ तालूके मराठवाड्यातील आहेत.[१६]

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर अवर्षणे :

१) **१९५२-५३ चे अवर्षण :** अवर्षणामुळे या काळात तात्कालीन मुंबई राज्यातील ५,२८१ गावांत (लोकसंख्या सुमारे ५० लक्ष) टंचाईची व २,८३८ गावात (लोकसंख्या सुमारे ३० लक्ष) टंचाई सदृश्य परिस्थिती उद्‌भवली. मुख्यत्व नगर, जळगाव, धुळे, नाशिक, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर व ठाणे या जिल्ह्यांना अवर्षणाचा फटका बसला. मात्र शासनाच्या अथक प्रयत्नामुळे अवर्षणाची तीव्रता घटली व भूकबळी व गुरे दगावली नाहीत. अवर्षणग्रस्तांच्या रोजगारासाठी रस्ते, पाटबंधारे, बांध बंदिस्ती वृक्षरोपण इ. कामे सुरू केली. त्यावर ५.२८ कोटी ₹ खर्च झाले. मोठ्या कामात १.७० लक्ष व लहान कामात १.१० लक्ष मजूर उपस्थित होते. स्वस्त दराने धान्य पूरवठा, पिण्याचे पाणी, अपगांना भत्ता दिला. तसेच अशासकीय संस्थानी हातभार लावला. उत्पादक कार्य हाती घेतले.

२) **१९६५-६६ चे अवर्षण :** या काळात अवर्षणामुळे महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यापैकी २३ जिल्हयात १६,१५१ गावांत (१.३० कोटी लोकसंख्या) टंचाई जाहीर केली होती. ५,६३१ टंचाई कामे केली. ५.५१ लाखापेक्षा जास्तीना रोजगार दिला. जलसिंचन, मृदासंधारण व पाणी पूरवठा यासारखी अवर्षण विरोधी आणि उत्पादक कामे (रस्ते, खडी फोडणे,इ.) अग्रक्रमाने हाती घेतली. धान्य १४ किलो दरमहा देण्यात आले. मुले व मातांना बुकटी दिली. पिण्याचे पाणी पुरवले. यासाठी ११.७७ कोटी ₹ खर्च केला.

३) **१९७०-७३ चे अवर्षण :** या कालावधीत सतत तीन वर्षे अवर्षण पडले होते आणि १९७२-७३ ला परिस्थिती फारच गंभीर झाली. राज्यातील एकूण ३५,८०० गावापैकी २५,४८८ गावे (लोकसंख्या २.५ ते ३ कोटी) अवर्षण ग्रस्त झाली होती. अवर्षणाचा परिणाम म्हणून ५४% अन्नधान्य घटले. ३१ मे १९७३ रोजी एकूण ६४,४०६ टंचाई कामे चालू होती व दैनिक उपस्थिती ४९.४७ लक्ष होती. १९७३ पासून सुकडी देण्यात आली. टंचाई कामावर २५२.८७ कोटी ₹ खर्च केले. २१.६८ लक्ष हेक्टर क्षेत्रात बांध बंदिस्ती, १४७९ लघु सिंचन व पाझर तलावाची कामे, ५८६ कालव्यांचे खोदकाम, ५६,६८६ सामुदायिक विहरी, ७८,१८४ किमी लांब रस्त्याचे माती काम, १.७३ लक्ष वृध्द व अपंगाना २.११ कोटी ₹ भत्ता, आरोग्य सेवा, फी माफ (शैक्षणिक सवलत) इ. महत्वपुर्ण कार्य या काळात केली गेली. यासाठी २६८.३९ कोटी ₹ खर्च केला.

Scanned with OKEN Scanner

केंद्राने १०५.२५ कोटी ₹ अनुदान व ११७.२७ कोटी ₹ कर्ज एकूण २२२.५२ कोटी ₹ मदत केली.

४) **१९८४-८५ चे अवर्षण :** १९८४ पासून सतत तीन वर्षे अवर्षण होते. २३,४१० गावांत (२.८० कोटी लोकसंख्या) तीव्र टंचाईत होती. १२,००० गावांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई होती. पिण्याचे पाणी, गुरांना चारा, छावण्या उघडणे, रोजगार हमी योजनेतून एकूण ११,६१३ कामे चालू होती. रोजची मजूर उपस्थिती ८.४४ लक्ष होती.[१७] यावरून दरम्यानच्या काळाचे अवर्षण तीव्रतेचे स्वरूप जाणवते.

महाराष्ट्रातील ५०% शेती अवर्षण प्रवण भागात अनियमित पाऊसमान असलेल्या प्रदेशात मोडते. यामध्ये १२ जिल्हे, ९४ तालुके, १६,००० गावे, १८,००० वाड्यांचा समावेश होतो. येथे आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवते. कधी कधी दुष्काळही पडतो.[१८]

मराठवाड्यातील अवर्षण :

मराठवाड्यात अवर्षणाची परिस्थिती नवी नसून ती प्राचीन काळापासून आहे. महाराष्ट्रांत वारंवार येणा-या अवर्षणाची चर्चा म्हंटली की डोळ्यासमोर येणारा प्रदेश म्हणजे मराठवाडा. त्याला ऐतिहासिक पूरावा आहे. प्राचीन काळापासूनचा इतिहास आहे. मध्ययुगीन काळात अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीचा किल्ला हस्तगत केल्यानंतर अवर्षणामुळे मोठा दुष्काळ पडल्याचा उल्लेख आढळतो. १४,१७,१८,१९ व्या शतकातही अवर्षणामुळे दुष्काळ पडल्याचे पूरावे आहेत. सन १९११ ते १९३१, १९३५, १९५०, १९६५-६६, १९७१-७२, १९७४-७६, १९८३-८५, १९८६, १९८७-८८, १९९५, २००२-०३, २०१२-२०१४ या वर्षातही सरासरी पेक्षा कमी पाऊस पडल्यामुळे अवर्षणातून दुष्काळ पडल्याची नोंद आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील ६ तालूक्यात १९७५-७६ पासून 'अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम' सुरू करण्यात आला व १९८४ पासून छोट्या पाणलोट क्षेत्र विकासाची मिनी वॉटरशेड डेव्हलपमेंट योजना सुरू करण्यात आली म्हणजेच या काळात अवर्षण होते.[१९] सन १९७२ पूर्वी १० वर्षातून एकदा अवर्षण व दुष्काळ येत असे. १९५० नंतर १० वर्षातून एकदा अवर्षण, दुष्काळ यामध्ये ३ वर्ष अतिवृष्टी, ३ वर्षे चांगले हवामान व पर्जन्य पिके चांगले, ३ वर्षे चांगला पाऊस पण मध्यम पिके आणि १ वर्षे अवर्षण व दुष्काळ अशी परिस्थिती असे. सध्या मात्र आकस्मित संकटाची परिस्थिती, निसर्ग मानवाच्या काबूत न राहणे, तापमान वाढ, थंडी कमी, पावसाचे आगमन २ महिने उशिरा असे सर्व जागतीक तापमान वाढीचे परिणाम आढळतात. निसर्गचक्र

Scanned with OKEN Scanner

बदल, मान्सून परिस्थिती कालबाह्य, हवामानातील बदल, पर्जन्यमानाचे एकूण दिवस, पर्जन्यातील पाऊसमानाचा विभागलेला काळ व पडणारा पाऊस यात विसंगती उद्‌भवली आहे. जलचक्र बिघडल्यामुळे अवर्षणाचे प्रमाण वाढत आहे. त्याचा ध्रुविय तापमान, वायूभार, उच्च वातावरण, थरातील रचना, मोसमी हवामानावर परिणाम होतो. हिंदी महासागरावरून येणा-या पश्चिमी वा-याचे वर्तन बदल व वेग वाढल्यामुळे अवर्षणासारख्या हवामानातील विचित्र घटनाना सामोरे जावे लागत आहे. अवर्षण व दुष्काळ मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेला, शेती व्यवसायाला, सामाजिक विकासाला पोखरून काढत आहे. नियोजनाचा अभाव, संघटनात्मक प्रयत्नाचा अभाव, अपरिपक्वता, राजकीय नेतृत्वाचा अभाव, राजकीय उदासीनता, प्राप्त नैसर्गिक संपत्ती विषयी अनास्था इ. समस्यामूळे अवर्षण व दुष्काळ, पाणी प्रश्न इ. प्रश्न निर्माण होत आहेत.

अवर्षण प्रवण क्षेत्रामध्ये औरंगाबादचा ३१%, बीडचा ३७%, उस्मानाबादचा २४%, लातूरचा ६% तर जालन्याचा २% भूभाग मोडतो.[२०] सद्यस्थितीत हवामान बदलाचा परिणाम म्हणून पावसाचे आगमन, वितरण व निर्गमन चक्र बदलले आहे. मराठवाड्यात खरीप व रब्बी दोन्ही हंगाम आहेत मात्र कांही भागात कधी खरीप तर कधी रब्बी हंगामात अवर्षण होते. १९७२ ला दोन्ही हंगाम कोरडे गेले होते. २०१२ ला सर्वत्र अवर्षण व दुष्काळाने मराठवाडा होरपळला होता. चारा व पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य होते. मराठवाड्याचा १/३ प्रभाग (३९%) भाग अवर्षणग्रस्त व दुष्काळी आहे तर १९८१ च्या जनगणनेनुसार १ कोटी (३६%) लोकसंख्या अवर्षणग्रस्त भागात राहते.[२१] काळानुरूप त्यात वाढ होत आहे.

मराठवाड्यातील खोरे निहाय अवर्षण प्रवण क्षेत्र :

मराठवाडा विभागात एकूण ८ जिल्हे, ७६ तालूके असून त्यातील ५३ तालूके अवर्षण प्रवण क्षेत्रात येतात. यापैकी गंगापूर व वैजापूर हे दोन तालूके पूर्णतः उर्ध्वगोदावरी खो-यात (पैठण धरणाच्या वर) येतात तर औरंगाबाद, खुलताबाद व कन्नड या तालूक्याचा काही भाग उर्ध्व गोदावरीत येतो. कन्नड व वैजापूरचा काही भाग तापी खो-यात येतो. परंडा, आष्टी व तुळजापूर हा भाग कृष्णा खो-यात येतो. फार थोडा भाग गोदावरी खो-यात येतो. पाटोदा, भूम, कळंब या तालूक्याचा भाग अंशतः गोदावरी खो-यात व अंशतः मांजरा खो-यात समाविष्ट होतो.

Scanned with OKEN Scanner

तक्ता १.२ : खोरे निहाय अवर्षण क्षेत्राचा तपशिल :

अ.क्र	खो-याचे नांव	एकूण क्षेत्रफळ (चौ.किमी)	मराठवाड्यातील एकूण क्षेत्र (चौ.किमी)	अवर्षण प्रवण भागाचे क्षेत्रफळ (लक्ष हे)	शेकडेवारी %
१	२	३	४	५	६
१	गोदावरी खोरे	६९.०६	४२.२०	१५.७३	२४.३५
२	मांजरा खोरे	१०.६६	१०.५३	४.००	६.२०
३	कृष्णा खोरे	०	६.३४	४.९७	७.६९
४	तापी खोरे	०	१.५३	०.२५	०.३९
	एकूण	७९.७२	६४.६०	२४.९५	३८.३३

(स्त्रोत : अभंगे गो.वि. व कुलकर्णी सि.रा. (१९८८) मराठवाडा २००१, खंड १ ला, पृष्ठ ३-१०२.)

वरील तक्त्याच्या अवलोकनातून हे स्पष्ट होते की मराठवाड्यात एकूण ४ नदी खोरे आढळतात. त्याचे एकूण क्षेत्र ७९.७२ चौ.किमी आहे. तर मराठवाड्यातील एकूण क्षेत्र ६४.६० चौ.किमी असून सर्वात जास्त गोदावरी खो-यात(४२.२० चौ.किमी) आहे. मराठ्वाड्यातील अवर्षणप्रवण भागाचे क्षेत्रफळ २४.९५ चौ.किमी (३८.३३%) असून सर्वात जास्त गोदावरी खो-यात (२४.३५%) व सर्वात कमी तापी खो-यात (०.३९%) आहे. वरील अभ्यासावरून असा निष्कर्ष निघतो की मराठवाड्यात अवर्षण ही सामान्य घटना झाली आहे. मराठवाड्यातील अधिकांश भाग अवर्षण प्रवण आहे. १९७१-७२, १९७४-७६, १९८४-८५, १९८६, २००२-०३, २०१२-१४ या वर्षात मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात सरासरी पेक्षा कमी पाऊस पडला व अवर्षणस्थिती निर्माण झाली होती.

अवर्षणाचे स्वरूप [२२] :

अपेक्षित पर्जन्य न झाल्यास भूजल स्थितीवर व भूपृष्ठावर प्रतिकूल प्रभाव पडतो. सामान्यतः अवर्षणाचे स्वरूप पूढील प्रमाणे दिसून येते.

१) **मौसमी अवर्षण :** जेव्हा वातावरणीय परिस्थितीन्वे होणा-या पावसापेक्षा वास्तविक पाऊस कमी होतो तेव्हा मौसमी अवर्षणाची परिस्थिती निर्माण होते. भारतीय सरासरी पर्जन्यमान ११७० मिमी तर मराठवाड्याचे सरासरी पर्जन्यमान ७९९ मिमी आहे हे कोणत्याही भौगोलिक प्रदेशाकरीता पर्याप्त आहे पण यात नेहमी चढ उतार जाणवतात. त्यामुळे अवर्षण परिस्थिती निर्माण होते व पावसात अनियमितता असते.

Scanned with OKEN Scanner

२) **वातावरणीय अवर्षण :** भूपृष्ठावरील जलस्त्रोत (नदी, तलाव, झरे, इ.) मधील पाणी आटल्यानंतर जे अवर्षण प्रवृत्त होते ते वातावरणीय अवर्षण होय. भूजलाचा परिणाम त्याच्या तीव्रतेवर होतो. म्हणून त्याला दोन वर्गात विभाजीत केले जाते.

- **भूपृष्ठीय पाण्याचे अवर्षण :** मौसमी अवर्षण दीर्घकाळापर्यंत कार्यरत राहीले तर भूपृष्ठीय जलस्त्रोत आटतात. नद्या मान्सूनपूर्व आटतात. यासाठी अतिवृक्षतोड व वातावरणीय बदल हे कारणीभूत आहेत. जंगल कमतरतेमुळे संपूर्ण पावसाचे पाणी वाहून जाते. लगेच अवर्षण स्थिती उदभवते. जगातील सर्वाधिक पर्जन्य पडणा-या चेरापूंजीत सप्टेंबर मध्येच अवर्षण प्रवण स्थिती बनते कारण येथे जंगलतोड मोठ्या प्रमाणात झाली आहे. तेथे चुन्याचे दगड असल्यामुळे ते पावसाचे पाणी खोलपर्यंत शोषतात परिणामी मार्च एप्रिल मध्ये दुष्काळग्रस्त स्थिती उद्भवते. त्याबरोबर तेथे पाऊस होताच पूराची स्थिती निर्माण होते. मराठवाडयातही वृक्षतोड व वातावरणीय बदलामुळे अवर्षण उदभवते.

- **भूजल अवर्षण :** भूगर्भातील पाणी उपसण्याचा वेग तीव्र झाल्यास सामान्य पाऊस झाल्यासही भूजल अवर्षण निर्माण होते. येथे पर्जन्य प्राप्तीपेक्षा भूजल उपसा प्रमाण जास्त असते. विहिरीच्या संख्येतील वाढीमुळे व ग्रामीण विद्युतीकरणामुळे भूजल उपसावेग वाढला आहे. व्यापारी पिके घेण्याच्या स्पर्धेतून व कृषी, घरगुत्ती, औद्योगिक क्षेत्रातील पाण्याची वाढती मागणी इ. मुळे भूजलावर ताण वाढतो व भूजल अवर्षण निर्माण होते. भूजल पातळी खाली जाणे म्हणजे भूजल अवर्षण होय.

३) **कृषी अवर्षण :** कृषि संदर्भात अवर्षणाचा विचार आज महत्त्वाचा आहे. कारण हेच क्षेत्र सर्वांचा आधार आहे. जीवसृष्टीचा आधार आहे. या संदर्भात विचार केल्यास पर्जन्याद्वारे जमिनीला पाणी उपलब्ध होते. पैकी काही जमिनीत मुरते व काही वाहून जाते. जमिनीच्या पृष्ठावरून बाष्पीभवन व वनस्पतीद्वारे बाष्पनिष्कासन होऊन जमिनीतील ओलावा नष्ट होतो व हा ओलावा पिकांच्या वाढीस अपुरा पडतो तेव्हा अवर्षण स्थिती उदभवते. या संदर्भात पावसाबरोबर तापमान, वा-याचा वेग, सुर्यप्रकाश, जमिनीची जलधारण शक्ती इ. गोष्टी कडेही लक्ष द्यावे लागते. कारण पर्जन्यातून निर्मित ओलावा जमिनीत कितपत शिल्लक राहतो हे सर्व या घटकांवर निर्भर असते. स्थानिक पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेत (पेरणी, बिजाकूरण, रोपांची वाढ,

Scanned with OKEN Scanner

फूलारणे, दाणेभरणे, इ) पूरेसे पाणी व ओलावा याची आवश्यकता असते. त्यावेळी पावसात दीर्घ खंड पडल्यास अवर्षण परिस्थिती उदभवते. थोडक्यात पीक वाढीसाठी पुरेशा आर्द्रतेची कमतरता म्हणजे कृषी अवर्षण होय. जेव्हा मातीचा ओलावा व पावसाचे प्रमाण एवढे कमी होते की ते पीकाच्या वाढीस अपर्याप्त ठरते तेव्हा कृषी अवर्षण निर्माण होते. याला पाण्याचे दुर्भिक्ष्य म्हणतात. याची तीव्रता माती प्रकार व पिक प्रवृत्तीवर निर्भर असते. पारंपारिक पिके वातावरणानूसार संतूलित परिस्थितीत असत पण हरितक्रांतीनंतर गहन कृषिला व पाण्याची गरज जास्त असणा-या व्यापारी पिकांना प्राधान्य दिल्यामूळे कृषी अवर्षण वाढले. असा प्रभाव सर्वत्र आढळतो. कृषि अवर्षण म्हणजे स्थानिक पिकांच्या किमान गरजेच्या मानाने पावसाची कमतरता होय.

४) **सामाजिक - आर्थिक अवर्षण :** मौसमी, वातावरणीय व कृषी अवर्षणाच्या कारणाने पडणा-या आर्थिक व सामाजिक प्रभावाला सामाजिक - आर्थिक अवर्षण म्हणतात. प्राकृतिक घटना व कृषि विकासावरून हे अवर्षण निर्माण होते. पाण्याची पर्याप्त मात्रा उपलब्ध न झाल्याचा हा परिणाम असतो. कृषि व्यतिरिक्त सजीव व जीवजंतू, प्राणी इ. साठीही पाणी दुर्भिक्ष्य जाणवते.

५) **मृदा जनित अवर्षण :** पाण्याची कमतरता व मातीतील ओलावा एवढा कमी होतो की पिके नष्ट होऊ लागतात त्यास मृदा जनित अवर्षण म्हणतात.

६) **परिस्थितीकीय अवर्षण :** अति पर्यावरणीय विनाशामूळे जेव्हा कोणत्याही परिस्थितिकीय तंत्रात उत्पादकता घटते तेव्हा त्यास परिस्थितीकीय अवर्षण म्हणतात.

अवर्षणाचे प्रकार :

भारतीय कृषी आयोग, भारतीय मौसमी विभाग व ब्रिटीश पाऊस संघटनेने अवर्षणाचे विविध प्रकार स्पष्ट केले आहेत ते पूढील प्रमाणे :

भारतीय कृषि आयोगाने केलेले अवर्षणाचे प्रकार [२३] :

१) **वातावरणीय अवर्षण :** ज्या प्रदेशात वार्षिक पर्जन्य सरासरी पर्जन्याच्या २५% किंवा त्यापेक्षा कमी पर्जन्य झाल्यास जी अवर्षणाची स्थिती निर्माण होते त्यास वातावरणीय अवर्षण म्हणतात.

Scanned with OKEN Scanner

२) **जलीय अवर्षण :** वातारवणीय अवर्षण दीर्घकाळ राहिल्यास त्याचा परिणाम म्हणून पाणी प्रमाण घटते, जलसाठे कोरडी पडतात, भूजल पातळी घटते यालाच जलीय अवर्षण म्हणतात.

३) **कृषीविषयक अवर्षण :** पिक वाढीच्या काळात जमिनीतील बाष्प व पर्जन्याद्वारे उपलब्ध बाष्प पिकांना पूरेसे उपलब्ध न झाल्यामूळे पिकांची वाढ खुटते. पिके लवकर पक्व होतात. अन्न, चारा, पाणी इ. चे दुर्भिक्ष्य भासते यालाच कृषीविषयक अवर्षण म्हणतात.

भारतीय मौसम विभागाने केलेले अवर्षणाचे प्रकार [२४] :

१) **अवर्षण :** जेव्हा भौगोलिक क्षेत्रात सामान्य पाऊसापेक्षा वास्तविक पाऊस ७५% पेक्षा कमी पडतो त्यास अवर्षण म्हणावे.

२) **प्रचंड अवर्षण :** जेव्हा सामान्य पावसापेक्षा २६-५०% कमी पाऊस पडतो तेव्हा प्रचंड अवर्षण असते.

३) **सामान्य अवर्षण :** जेव्हा पावसाची कमतरता ५०-२५% च्या दरम्यान राहते त्यास सामान्य अवर्षण म्हणतात.

ब्रिटिश पाऊस संघटनेने (१९३६) केलेले अवर्षणाचे प्रकार :

१) **निरपेक्ष अवर्षण :** सतत १५ दिवसापर्यंत प्रतीदिन ०.०१ इंचापेक्षा कमी पाऊस होतो त्यास निरपेक्ष अवर्षण म्हणतात.

२) **आंशिक अवर्षण :** किमान २९ दिवसापर्यंत सतत सरासरी पाऊस ०.०१ इंच किंवा त्यापेक्षा अधिक झाला असेल त्यास आंशिक अवर्षण म्हणतात.

३) **शुष्कता :** निरंतर १५ दिवसापर्यत प्रतीदिन ०.०४ इंचापेक्षा कमी पाऊस होतो त्यास शुष्कता म्हणतात.

भारतीय वातावरण विज्ञान विभागाच्या व्याख्येनुसार प्रकार [२५] :

१) **तीव्र अवर्षण :** सामान्य पर्जन्याच्या ५०% पेक्षा जास्त तूट असेल तर तीव्र अवर्षण समजावे.

२) **मध्यम अवर्षण :** सामान्य पर्जन्याच्या २५ ते ५०% तूट असेल तर मध्यम अवर्षण समजावे.

थोडक्यात अपुरा, अनियमित, अवेळी आगमन, बिनभरवशाचा पाऊस हा मराठवाडयास व अवर्षण प्रवण प्रदेशास मिळालेला अभिशाप आहे. अवर्षण ही एक नैसर्गिक घटना असल्यामुळे तिच्यावर

Scanned with OKEN Scanner

अद्यापतरी मानवाने नियंत्रण मिळवलेले नाही मात्र काही उपाय करून त्याची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. जगावर अवर्षणाचे जे संकट ओढावले आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे मानवाची हव्यासी वृत्ती हे आहे. समाज व पर्यावरण कडेलोटाच्या जवळ पोहचत आहे. यासाठी मानवाची भोगलालसा, याचे चोचले पूरविण्याचे थांबवले पाहिजे. एकूण किती पाऊस पडला यापेक्षा त्यामधील सातत्य, नियमितता व कालिक वितरण महत्त्वाचे असते. शेतीतील कुंठीत अवस्थेचा व्यापक संदर्भात विचार झाला तरच अवर्षण प्रवण समस्येचे यथार्थ आकलन होते.

अवर्षण ही जरी नैसर्गिक घटना असली तरी मानवी क्रिया त्यास जास्त जबाबदार आहे. म्हणूनच अवर्षण हे आसमानी व सुलतानी म्हटले जाते. देश अनुयुगात व अवकाशयुगात वावरत असताना व ७१% पाण्यानी पृथ्वी व्यापली असताना पाण्याच्या दुर्भिक्ष्यखातीर कोट्यावधी जनता पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशा भटकते आहे. त्यावर मात करण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान व नियोजनाची प्रचंड क्षमता कारणी न लावणे यापेक्षा मोठी नामुष्की नाही. मराठवाड्याची अर्थव्यवस्था शेतीप्रधान आहे मात्र अवर्षणामुळे मराठवाड्याची परिस्थिती इथोपिया या देशासारखी होण्यास प्रारंभ झालेली आहे.

संशोधन अध्ययनाचे महत्व :

संशोधन हेच प्रगती व परिवर्तनाचे साधन आहे. समस्याची सोडवणूक आणि नविन दृष्टिने संशोधन करून प्रबोधन करणे हा सामाजिक संशोधनाचा आत्मा असतो. अवर्षणाचा मराठवाड्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा कोणत्याही प्रकारचा अभ्यास आजपर्यंत झालेला नाही जो झालेला आहे तो पुरेसा नाही. अध्ययनातील हे अंतर या संशोधनातून भरून निघेल. त्यामूळेच या मराठवाड्यावर संशोधन होणे गरजेचे होते. मराठवाड्याचा संयुक्त महाराष्ट्रात समावेश झाल्यापासून इतिहासातज्ञांचे, अर्थतज्ञाचे, साहित्यकांचे, संशोधकांचे लक्ष या मागास प्रदेशाच्या सर्वांगीण अभ्यासाकडे वळल्याचे दृश्य विलोभणीय आहे. या प्रदेशात महाराष्ट्रावर राज्य करणा-या घराण्यांच्या राजधान्या होत्या तरी पण पूर्वीही याकडे दूर्लक्ष झाले व आजही दुर्लक्ष होताना दिसते.

अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी प्रादेशिक अभ्यास करावा लागतो. नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारीत कृषि विकास, नियोजन, संबंधित घटक, (शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण व्यावसायीक व इतर घटक) यांच्या समृध्दीसाठी विकास नियोजन आखावे लागते. मराठवाड्यातील गोदावरी खोरे का अविकसीत राहिले, त्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या या सर्वांगिण दृष्टीने मराठवाड्याचा अभ्यास

Scanned with OKEN Scanner

करणे उपयुक्त ठरते. कारण या घटकांचा विकास आपोआप घडत नाही. त्यासाठी हे संशोधन हाती घेतले गेले.

कधी परमोच्च शिखरावर पोहचण्याचे सुख तर कधी विपन्नावस्थेच्या भोव-यात अडकल्याचे दुःख मराठवाड्याच्या नशिबी आले या विभागाने केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण दक्षिण भारत, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर इतिहास व संस्कृतीच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. तरी संशोधनात्मक व विकासात्मक बाबीकडे या विभागाकडे दुर्लक्ष झाले आहे ते पूर्ण करण्याचा प्रयत्न या संशोधनातून केला आहे. शेतकरी व शेतमजूर, ग्रामीण व्यावसायीक हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या घटकांच्या प्रगतीतच मराठवाड्याची प्रगती आहे. याचे पूढारी भरपूर आहेत पण कैवारी मात्र क्वचित आढळतात. आजपर्यत यांच्याकडे व त्यांच्या खडतर जीवनाकडे, त्यांच्या इतिहासाकडे दुर्लक्षच केले आहे. राष्ट्रीय एकात्मता, निःस्वार्थ राष्ट्रीय सेवा व भारतीय संस्कृती इ. ची आदर्श उदाहरणे आधुनिक पिढीच्यासमोर ठेवावयाची असतील तर शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण व्यावसायीकांवर संशोधन होणे गरजेचे आहे. या उद्देशाने हे संशोधन हाती घेतले आहे. भूमातेवर मातेप्रमाणे प्रेम करणारे, मातीशी नाळ जोडणारे, काबाडकष्ट करणारे, घाम गाळणारे, रक्ताचे पाणी करणारे, हाडाची काडे करून नवनिर्मिती करून संपत्तीत निव्वळ भर घालणारे, कमी गरजा व काटकसर करणारे, राष्ट्रीय संपत्तीचा विनाश न करणारे, किमान मोबदल्यात देशहितार्थ कमाल त्याग करणारे शेतकरी व शेतमजूरांसारखे सापडणे अशक्यच आहे. आजच्या स्थितीला शेतकरी व शेतमजूर इ चा प्रश्न गंभीर बनत आहे कारण ते अतिशोषित, पीडीत आहेत व त्यांची संघटना नाही त्यामुळे त्यांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीवर, सांस्कृतीक रचना व पातळीवर व संघटीतपणा इत्यादी वस्तूस्थितीवर प्रकाश पडला पाहिजे. या घटकांवर अवर्षणाचा कसा व किती परिणाम होत आहे या उद्देशाने अध्ययन होणे गरजेचे आहे. त्याच उद्देशाने या संशोधनात मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. हेच खरे देशाचे सेवक व आधारस्तंभ आहेत. येथील सत्ता देशी-विदेशी वंशाच्या हातात गेली मात्र शेतीवरील व ग्रामीण सत्ता बदलली नाही. शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण व्यावसायीक यांच्या सहानूभूती व सहकार्यामुळे अनेक सत्तांतर झालेत. साम्राज्य उदयाला, वैभवाला आले. स्वराज्याचा सूर्य उगवला एवढेच नव्हे तर भारतीय स्वातंत्र्यही त्यांच्यामुळेच मिळाले तसेच त्यांच्या पिळवणूकीमुळे राज्यसत्ता गमावल्याचे उदाहरणेही आहेत. यामुळेच त्यांच्या संबंधित बदलत्या परिस्थितीचा संशोधित इतिहास लिहण्याचा उद्देश या संशोधनात आहे. औद्योगिक विकासातून निर्मित भांडवलशाहीतील कामगारांच्या शोषणाचा विचार अर्थशास्त्रज्ञांनी व समाजशास्त्रज्ञांनी विस्ताराने केला व जगापूढे मांडला. मात्र विस्तीर्ण

Scanned with OKEN Scanner

अशा शेती, शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण व्यावसायीक यांच्या शोषणाचा, समस्येचा, पिळवणूकीचा, अडवणूकीचा, लूटीचा विचार केलेला अजूनही आढळत नाही. पण ज्यावर संपूर्ण जीवन निर्भर आहे त्या शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण व्यावसायीकांच्या संशोधनाकडे दुर्लक्ष केले आहे. या सर्वांची बाजू अर्थशास्त्रीय पायावर मांडण्याऐवजी निसर्गासानिध्य, यांत्रिकीकरणाला विरोध, आध्यात्मिक उन्नतीला प्राधान्य अशा नैतिकतेच्या दृष्टीने मांडले गेले. त्यामूळे त्यांच्या संशोधनासाठी हे संशोधन कार्य हाती घेतले आहे.

आज पाण्याची वाढती मागणी व घटत्या उपलब्धतेमुळे विश्वव्यापी संकट (मात्रात्मक व गुणात्मक) निर्माण झाले आहे. त्यापासून संरक्षण मिळवणे, विकासपूर्ण उपयोग करून संकट निवारण व शाश्वतता निर्मितीच्या उद्देशाने व जल साक्षरतेच्या दृष्टीने अभ्यास करण्याच्या उद्देशाने हे संशोधन हाती घेतले आहे. बदलत्या काळानुसार पर्जन्यप्रमाण व निसर्गात परिवर्तन होत आहे. जलचक्रातही बदल झाला आहे. परिणामी जलसंतूलन बिघडत आहे.

पर्जन्यप्रमाण घटत जावून व अन्य कारणाने अवर्षण होत आहे. अवर्षणाचा प्रत्यक्ष विपरीत परिणाम शेती, शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण व्यावसायीक इ. घटकावर होत आहे तर अप्रत्यक्ष विपरीत परिणाम उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य इ. वर होत आहे. या दृष्टिने भविष्यातील तीव्र जलसंकटातून भावी पिढी वाचवण्यासाठी यावर विचार होणे गरजेचे आहे. याची जाणीव व निकड लक्षात घेवून त्याचा शास्त्रीय दृष्ट्या उकल या संशोधनात केला आहे. या संशोधनाचा फायदा निश्चितच मराठवाड्यास तंर होईलच त्याचबरोबर इतर विभाग व राज्यांना व जे अवर्षणग्रस्त आहेत त्यांनाही फायदा होईल यात शंका नाही.

दिनांक / / २०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
जपकर अक्षय रावसाहेब

प्रकरण पहिले
विषय निवड आणि अभ्यास पध्दती

१.१ प्रस्तावना :-

पाणलोट क्षेत्र विकास-गरिब व श्रीमंत यांच्या उत्पन्न बदलातील दरिचा आर्थिक व सामाजिक अभ्यास हा विषय प्रबंध सादरीकरणाकरीता घेतल्याने प्रबंध बनवितांना प्रकरण क्रमांक एक मध्ये विषय निवडीची कारणीमिमांसा, उद्दिष्टये, संशोधनाचे स्वरुप, माहितीचा संकलनांच्या पध्दती व प्रकरण रचना यांचा विस्तृत अभ्यास केलेला आहे. खरे तर पाणलोट क्षेत्र विकास ही संकल्पना सर्वांगीण विकासाची संकल्पना आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासाचा प्रथमच एवढया विस्तृतपणे विचार केला गेला आहे. स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या नैसर्गिक साधनसामग्रीचा योग्य वापर म्हणजेच पाणलोट क्षेत्र होय. बऱ्याच जणांच्या म्हणण्यानुसार ही एक तांत्रिक संकल्पना आहे. पण या संकल्पनेला तांत्रिक म्हणुन आपण आपल्या विकासाची दारे बंद करित आहेत असे म्हणावेसे वाटते. या क्षेत्रात शासनाने बरेच कामे केलेले आहेत. पाणलोट क्षेत्राच्या विकासासाठी शासनाच्या अनेक विभागांची आवश्यकता असते. पण आजपर्यंत असे दिसुन आले आहे की या विभागांमध्ये सर्वच पातळयांवर समन्वय साधणारी व्यवस्था नाही जलसंवर्धन विभागाची स्थापना झाल्यामुळे हा प्रश्न थोडया प्रमाणात सुटेल अशी आशा आहे. गेल्या काही वर्षापासुन ग्रामीण भागात काम करीत असतांना असे लक्षात आले की पाणलोट क्षेत्र विकास ही संकल्पना व कार्यकर्ते म्हणजे एक हत्ती व सात आंधळे अशी परिस्थिती आहे. आजही पाणलोट क्षेत्र विकासाबदद्ल बऱ्याचशा भागामध्ये प्रसार व माहिती नसल्याचे जाणवते. तसेच पाणलोट क्षेत्र विकासात झालेले उत्पन्नाचे वितरण कशा प्रकारे आहे. यावर कुठलेही संशोधन अथवा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे या प्रबंधामध्ये अशााच एक समस्येचा विषय घेवुन त्याची सत्यता पडताळणी करण्याचे कार्य करत आहे.

१.२ विषय निवडीची कारणमिमांसा :-

भारतात दुष्काळाची समस्या वेळोवेळी अनेक भागांमधुन जाणवत आहे. सन १९९१-९२ साली महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती सर्वत्र जाणवली. जवळजवळ तीस

हजार गावांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उभा राहीला. राज्याच्या ३० टक्के लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रावर सरासरी वर्षाला एक मीटर एवढा पाऊस पडतो. या पडणाऱ्या पावसाचे पाणी कही कमी नाही. कोकण पट्टीत ५०४० मि.मी. एवढा पाऊस पडतो. तर विदयार्थात १००० मि.मी. अशी पावसाची नोंद शेकडो वर्षाची आहे. पण हा पाऊस सरसरीने जरी कती असला तरी दरवर्षी पडणा-या पावसाचे प्रमाण कमी जास्त होणे. त्याचप्रमाणे पावसाच्या कालावधीत होणारा कमी जास्तपणा यामुळे निरनिराळया भागात दुष्काळी परिस्थिती जाणवते. पावसाळयात पडणाऱ्या पावसाचे पाणी नदयांमधुन पुराद्वारे वाहुन जाते. त्याची साठवण करुन ते पाणी मोठया धरणांच्या आणि कालव्यांच्या सहाय्याने वर्षभर उपलब्ध करुन देण्याचे नियोजन स्वातंत्र्यपुर्व काळात सुरु झाले. महाराष्ट्रात आज अशा प्रवाही सिचंनाची उपलब्धता २६ लाख हेक्टर जमिनीवर आहे. एवढया मोठया प्रमाणावर नियोजन होत असतांना प्रत्यक्षात मात्र प्रवाही सिंचन आणि भुगर्भातील पाणी यामुळे फक्त १३ टक्के एवढीच जमिन आज सिंचनाखाली आहे. अशा या मोठया प्रमाणात पावसावर अवलंबुन असणा-या शेतीचे नियोजन कसे करावयाचे कोणत्या उपायांनी शेती उत्पन्नाला स्थिरता प्राप्त होईल. हे प्रश्न हाताळणीसाठी अनेक शासकीय उपयांचा अवलंब करण्याचे प्रयत्न आजपर्यंत झाले आहेत. हया पार्श्वभूमीचा अभ्यास करुन गेल्या काही वर्षात स्वयंसेवी संस्था आणि शासनाने राबविलेल्या काही प्रयोमामधून जे यश मिळाले त्या प्रयोगाला पाणलोट क्षेत्र विकास ही संकल्पना म्हटले जात आहे. पडणा-या पावसाचे नियोजन करुन जमिनीची धुप थांबविणे व भुगर्भातील पाणीसाठा वाढविणे ही या कार्यक्रमाची गुरुकिल्ली आहे. नियोजनातुन गावपातळीवरिल ३० टक्के वहीताखालची जमिन संरक्षित सिचंनाखाली आणता येवु शकते असेही याकार्यक्रमातुन सिध्द झाले आहे.

एकंदरित पाणलोट क्षेत्र विकास ही संकल्पना लोकांना फायदयाची म्हणण्यापेक्षा वरदान ठरत आहे. पाणलोट क्षेत्र विकासामुळे गावचा पाणीप्रश्न व गावातील सिंचनाचा प्रश्न सुटतो. गावचा इतर जगाशी संपर्क वाढतो. गावामधील वनीकरण वाढतो गावात माहिती व तंत्रज्ञानाची, शिक्षणाचा प्रसार वेगाने वाढतो असे अनेक लाभ पाणलोट क्षेत्र

विकासामुळे मिळतात. परंतु या लाभाचे वितरण सर्वांना कशा प्रमाणात होत आहे. याकडे कुणाचेही लक्ष जात नाही. कारण भुमिहीनांना शेतकऱ्यांच्या मानाने कमी लाभ मिळतात. अल्पभुधारक व मजुर यांचे उत्पन्न विशेष मर्यादे पर्यंतच वाढवता येऊ शक्ते. परंतु मोठे भुधारक व श्रीमंत यांना या पाणलोट क्षेत्राचा अधिक फायदा होतो असे वादविवाद पाणलोट क्षेत्र विकासामध्ये निर्माण झालेले आपणांस दिसतात. त्यामुळे या वादविवांदावर प्रकाश टाकणे अनिवार्य ठरते व हे गरिब व श्रीमंत वर्गातील जी उत्पन्न बदलातील दरि निर्माण होते व त्यामुळे जे आर्थिक व सामाजिक असंतुलन निर्माण होते व वादास कारणीभुत ठरते त्यांची पडताळणी करणे गरजेचे ठरते. त्यामुळे या पडताळणी हेतुन पाणलोट क्षेत्र विकास, गरिब व श्रीमंत यांच्या उत्पन्न बदलातील दरिचा आर्थिक व सामाजिक अभ्यास हा विषय निवडला आहे.

१.३ **उद्दिष्टये** :-

प्रस्तुत संशोधनासाठी विषयाच्या अनुषंगाने अभ्यासासाठी अनुमान व निष्कर्ष काढण्याहेतुने विषयाचे उद्दिष्टये ठरविणे अतिशय गरजेचे ठरते.

१) पाणलोट क्षेत्र विकास धानोरे, ता. आष्टी, जि.बीड या गावाचे अध्ययन करणे.

२) पाणलोट क्षेत्र विकासामुळे गावामधील जे जलसिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे ती मोजणे.

३) पाणलोट क्षेत्र विकासामुळे गावातील पाणी प्रश्नांची सोडवणुक झाली आहे का ते अभ्यासणे.

४) गावातील एकूण बदललेल्या पिकरचनेचा अभ्यास करणे.

५) गावामधील जलसिंचनाचे स्वरुप, व्याप्ती व जलसाठयात झालेली वाढ तपासणे.

६) पाणलोट क्षेत्रामुळे जी पाण्याची पातळी वाढली आहे त्यामुळे होणारे फायदे अभ्यासणे.

७) पाणलोट क्षेत्र विकासामुळे जे उत्पन्नामध्ये बदल होतात किंवा फायदे होतात ते शोधणे.

८) पाणलोट क्षेत्रामधिल गरिब आणि श्रीमंत यांना जे लाभ होतात ते किती प्रमाणात होतात ते मोजणे व गरिब आणि श्रीमंत वर्णातील दरि शोधणे.

९) पाणलोट क्षेत्र विकासामुळे लोकांच्या उत्पन्नमध्ये होणा-या वाढीची कारणे शोधणे.

१०) पाणलोट क्षेत्रामधील शेतक-यांच्या असणा-या समस्या, प्रश्न अभ्यासणे व त्यावर उपाययोजना कोणत्या सुचविल्या जाता ते अभ्यासणे.

११) गरिबांचे असणारी उत्पन्नाची साधने व उत्पन्न विचारात घेणे.

१२) श्रीमंताचे असणारी उत्पन्नाची साधने व उत्पन्न विचारात घेणे.

१३) पाणलोट क्षेत्रामधील उत्पन्न विषमतेचे प्रमाण व त्यांची कारणे शोधणे

१४) पाणलोट क्षेत्र विकासामधील लोकांनी पाणलोट क्षेत्राबद्दलची असणारी मते विचारात घेणे.

१.४ संशोधनाचे स्वरुप :-

कुठल्याही संशोधकास संशोधन प्रकल्पचा अभ्यास करतांना तयाचे स्वरुप ठरविणे अत्यंत गरजेचे असते. कारण सभोवताली असणारे राजकीय, सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, भौगोलिक, वैज्ञानिक इ. सर्व घटकांचा विचार करावा लागतो. त्यामुळे संशोधकास एखादी संकल्पना मजबुत करावी लागते. त्यासाठी त्या संकल्पनेची मांडणी तिची उद्दिष्टये ती निवडीची कारणीमीमांसा करणे गरजेचे ठरते. संशोधनाच्या स्वरुपामध्ये विषय निवडीपासून ते अनुमान व निष्कर्ष मांडणीपर्यंतच्या विविध टप्प्यामध्ये विषयास अनुसरुन विविध अंगांचा अभ्यास करावा लागतो. विविध ठिकाणावरुन वेगवेगळी माहिती संकलीत करावी लागते.संकलित माहितीद्वारे अचूक सारांक्ष लेखन होणे गरजेचे ठरते. संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचे उद्दिष्टांवरुन संशोधनाचे स्वरुप ठरते.

पाणलोट क्षेत्र विकास-गरिब व श्रीमंत यांच्या उत्पन्न बदलातील दरिचा आर्थिक व सामाजिक अभ्यास या संशोधनाचे स्वरुप या विषयाच्या उद्दिष्टांवर केंद्रीत आहे. निसर्गातील व समाजातील विविध बदलत्या घटकांचा प्रभाव विषयावर व उद्दिष्टांवर पडू शकतो.त्यामुळे अनुमान चुकीची ठरु शकतात. अशा विविध घटकांवर लक्ष ठेवून व उद्दिष्टये व गृहीतकांना अनुसरुन संशोधनाचे स्वरुप असावयास हवे.

१.५ माहितीचे संकलन :-

संशोधकास विषयाच्या अभ्यासाठी विविध घटकांची माहिती संकलित करण्याची आवश्यकता असते. विविध ठिकांवरुन जी माहिती संकलित केली जावु शकते. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी माहितीचे संकलन पुढिल दोन स्त्रोताद्वारे करण्यात आलेले आहे.

प्राथमिक स्त्रोत :-

१.५.१ पाणलोट क्षेत्र विकास गरीब व श्रीमंत-

यातील आर्थिक व सामाजिक अभ्यास या विषयाच्या माहिती संकलनामधील प्राथमिक स्त्रोताद्वारे धानोरे येथील प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे माहिती संकलनांचा समावेश होतो. प्राथमिक स्त्रोतात निर्धारीत लोकांच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणादरम्यान माहिती संकलित करण्यात आली.व्यक्तीगत मुलाखतीद्वारे लोकांची मते, विचार जाणून सत्यता अभ्यासण्याचे कार्य करण्यात आलेले आहे. उददीकरणास अनुसरून प्रश्नावली तयार केली व त्याद्वारे एकूण सर्वेक्षणाचे प्रमाण ठरवून गावातील लोकांच्या विविध आर्थिक, सामाजिक अंगाची पाहणी प्राथमिक माहिती संकलनाद्वारे करण्यात आली.

दुय्यम स्त्रोत :-

स्वतः तथ्य संकलन न करता इतरांनी केलेल्या किंवा लिहलेल्या संदर्भग्रंथाचा सामावेश होतो. द्वितीय माहितीद्वारे विषयाच्या अभ्यासासाठी धानोरे ग्रामपंचायती , कृषीविभाग आष्टी, बॉस्को ग्रामीण विकास येथून माहिती संकलित केली. त्याबरोबर विविध ग्रंथ, इंटरनेटद्वारे विविध पाणलोट क्षेत्रावर आधारीत वेबसाईटमधून माहिती संकलनाचे व अभ्यासाचे कार्य करण्यात आले आहे.

संशोधन आराखडा व प्रकरण रचना :-

प्राथमिक व द्वितीय संकलनाद्वारे जी माहिती व अभ्यास केला जातो तिचे सादरीकरण व योग्य रचना करणे गरजेचे ठरते. त्यामुळे विषयाची विविध प्रकरणराद्वारे मांडणी व संशोधनास मूर्तस्वरूप देणे, माहितीचे योग्य व अचूक स्पष्टीकरण व रचना होणे गरजेचे असते. त्यामुळे विषयास अनुसरून माहितीचे विविध प्रकरणाद्वारे माहितीचे प्रकटीकरण करण्यात आलेले आहे.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"महाविद्यालयन विद्यार्थ्यामधील रहदारी विषयक जाणीवेचा अभ्यास"

संशोधक

खिलारे संध्या दत्तात्रय

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that **खिलारे संध्या दत्तात्रय** of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: **"महाविद्यालयन विद्यार्थ्यामधील रहदारी विषयक जाणीवेचा अभ्यास"** as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022.

Paper No.	XII & XVI	Oral	Total
Out of	80	20	100
Mark obtained	65	17	82

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/5/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्याम सांगळे आणि श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. वाघ सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा. भास्कर चव्हाण, प्रा.रणदिवे बी.ए., डॉ. शैलजा कुचेकर यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक / / २०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
खिलारे संध्या दत्तात्रय

अनुक्रमणिका

१.१ प्रास्ताविक
१.२ संशोधनाची गरज
१.३ संशोधनाचे महत्त्व
१.४ शीर्षक
१.५ कार्यात्मक व्याख्या
१.६ उद्दिष्टे
१.७ गृहितके
१.८ परिकल्पना
१.९ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
१.१० समारोप

२.१ प्रस्तावना
२.२ जनसंख्या
२.३ न्यादर्श
२.४ संशोधनाचे प्रकार
२.५ संशोधन पध्दती
२.६ अभिकल्प
२.७ चले
२.८ संशोधनाची साधने
२.९ संख्याशास्त्रीय साधने
२.१० प्रत्यक्ष कार्यवाही

३.१ प्रस्तावना
३.२ माहितीचे संकलन
३.३ माहितीचे विश्लेषण

४.१ सारांश
४.२ निष्कर्ष
४.३ शिफारशी
४.५ निष्कर्षाचे सामान्यीकरण

प्रश्नावली

प्रकरण पहिले
संशोधन विषयाची ओळख

१.१ प्रास्ताविक :-

आज भारत देश विकसनशील देशांच्या रांगेतुन विकसित देश होण्याच्या प्रगतीपथावर आहे. ही प्रगती पूर्वकाळापासून म्हणजेच मानवाच्या उत्क्रांती पासूनच सुरु झाली.

अश्मयुगात मानवाने खुप प्रगती केली, गारगोटी एकावर एक घासल्यानंतर त्यातून ठिणगी निर्माण होते, यावरुन अग्निचा शोध लागला. स्वतःचे अन्न मिळवणे यासाठी शिकार करु लागला, तसेच विविध हत्यारे बनवून संरक्षण करणे व एकोप्याने राहणे यासारखे एकामागून एक शोध घेत याच काळात चाकाचा शोध लागला. या चाकाचा उपयोग करुन सुरुवातीला हातगाडी मग प्राण्यांच्या साहाय्याने गाडी ओढणे मग त्यासाठी बैल व घोडा इ. प्राण्यांचा वापर करुन बैलगाडी व घोडागाडी म्हणजेच 'टांगा' तयार करण्यात आले. दिवसेंदिवस मानवाची प्रगती होत गेली. मग त्याने सायकल तयार केली. त्यामुळे एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी जाणे जास्त सुलभ झाले.त्यानंतर मानवास मोटारसायकलचा शोध लागला यामुळे कमी वेळात ठिकठिकाणी पोहचणे शक्य झाले.

आज विविध प्रकारची वाहने उपलब्ध आहेत. दूचाकी, चारचाकी, रिक्षा इ. आज प्रत्येकाला वाहन हवे असते. वाहनामुळे वेळेचे नियोजन सुलभपणे करता येत व त्यामुळे एखाद्या ठिकाणी लवकरात लवकर पोहोचता येते. वाहनांमुळे कोणतेही काम लवकर व वेळेत करता येते.म्हणजेच एखाद्या कामासाठी वेळेत कामाच्या ठिकाणी पोहचता येते.वाहनांमुळे मानव गतिशिल बनला आहे.

आज लहान मूलदेखील म्हणजेच बाल्यावस्थेतील नुकतेच कळायला लागलेले मूलदेखील रस्त्यावरील किंवा दूकानातील छोटया खेळण्यातल्या सायकल किंवा स्कुटरकडे बोट दाखवून मला ते हवे आहे असे हट्ट करते. एकुणच सर्वांमध्ये आज वाहनांविषयी खूप 'क्रेझ ' आढळते.

आजकल कुमारवयीन मुलांचाही वाहनांकडे कल वाढला आहे. स्वतःचे वाहन हवे म्हणून प्रत्येकजण आपल्या पालकांकडे हट्ट करतात. माझ्या मित्र मैत्रिणींकडे वाहन आहे मग मला का नाही. मला देखील वाहन हवे आहे अशा मागण्या मुले पालकांकडे करतात.

पालकही मुलांच्या सोयीसाठी व प्रेमापोटी त्यांना वाहन घेऊन देतात यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा वाहनांकडे जास्त ओढा आढळतो. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जाण्यासाठी व त्यांनतर विविध विषयांसाठी वेगवेगळया शिकवण्यांना जायचे असते. एका शिकवणीनंतर दुसऱ्या शिकवणीची वेळ असते तसेच दुसऱ्या शिकवण्या वेगवेगळया ठिकाणी असतील तर त्यांच्यातील अंतर जास्त असेल तर वेळेत त्या ठिकाणी पोहोचणे गरजेचे असल्याने ते वाहनांचा वापर करतात व वेळेचे नियोजन करण्यासाठी भरधाव वेगाने वाहने चालवितात व अशाप्रकारे वाहन चालविताना त्यांच्याकडून अनेक चुका घडतात. कित्येकांकडे तर वाहनाचा परवानाही नसतो. वाहन कसे हाताळायचे ? कसे चालवायचे ? याचे प्रशिक्षणही घेतलेले नसते.वाहतुकीच्या नियमांकडे सर्रासपणे दूर्लक्ष केले जाते व त्यामुळे अपघाताला सामोरे जावे लागते.

आज दळणवळणामध्ये विज्ञान तंत्रज्ञानामुळे झपाटयाने विकास झाला आहे. पण या विकासाबरोबरच अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. जसे की, लोकसंख्या, विस्फोट, सुशिक्षित बेकारांची वाढती संख्या, गरिबी, उपासमार, कुपोषण दारिद्रय, अत्याचार, स्त्री-भ्रुणहत्या, बालगुन्हेगारी, बालमजूर, जेष्ठ व कनिष्ठ या दोन वर्गांमधील दिवसेंदिवस वाढणारी दरी व यापैकीच प्रकर्षाने जाणवणारी व आपल्या दैनंदिन आयुष्यांशी जोडलेली एक समस्या म्हणजेच रहदारीची समस्या, रहदारीच्या समस्येमुळे शहरात वाहतुकींची कोंडी होते. परिणामी वाहतुक ठप्प होते. त्यामुळे शहरांचे नियोजन बिघडून व्यवस्थापनावर ताण येतो.

अहमदनगर शहरामध्येही दिवसेंदिवस वाहनांचे प्रमाण जास्त वाढत आहे. त्यातच रस्त्यांची तर फारच दुर्दशा झाली आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टिने महाराष्ट्र राज्यात अहमदनगर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो. पण विकासाच्या बाबतीत शहर अजूनही मागासलेला आहे. रस्त्यांवर फार खड्डे आहे असे म्हणण्यापेक्षा खडयांचा रस्ता असेच म्हणणे योग्य ठरेल. सर्वजण रहदारीच्या समस्येविषयी चर्चा करतात. रस्त्यांच्या दुर्दशेबद्दल चर्चा करतात. मंत्री, अधिकारी रस्ते व्यवस्थित करण्याचे आश्वासन देतात, परंतु यापैकी ठोस पाऊले कोणीच उचलत नाही. यामुळे शहरांमध्येही वाहतुकीची कोंडी होते.या कोंडीतून सुटका करण्यासाठी शहराला रिंग रोडची अत्यंत आवश्यकता आहे. मोठया शहरांना जोडणारे वाहतुक मार्ग शहराच्या मध्यवर्ती ठिकाणाहून जातात. त्यामुळे सर्व अवजड

सामानांची ने आण करणारे मालट्रक, ट्रेलर, कंटेनर हे याच मार्गाचा वापर करतात. त्यामुळे शहरातल्या वाहनांच्या वाहतुकीची कोंडी होते. यामध्ये सायकल चालवणारी शाळकरी मुले व दुचाकीस्वारी,पादचारी या सर्वांचाच समावेश असतो.या मोठया अवजड वाहनांमुळे शहरात अपघात घडून येतात व मोठया प्रमाणावर जिवितहानीही होते. यासाठी शहराबाहेरुन वाहतूक मार्गाची सोय केली गेली पाहिजे व उड्डाणपूलही उभारले गेले पाहिजेत. जेणेकरुन या मोठया वाहनांचा शहरातून प्रवेश न होता शहराच्या बाहेरच्या मार्गाने त्याची वाहतुक होईल.व पर्यायाने शहरात होणाऱ्या अपघाताला आळा बसण्यास मदत होईल.

शहरामध्ये वाहतुकीच्या नियमांकडेही सतत दूर्लक्ष केले जाते. वाहतूक नियंत्रण शाखा व प्रशासन यांच्याकडूनही फारशी कठोर कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे नियमांचे पालन न करणे, विनापरवाना वाहन चालविणे, वेगाने वाहन चालविणे असे प्रकार दिसून येतात.

वाहतुकीच्या नियमांकडे सर्रास होणारे दूर्लक्ष व त्यामुळे निर्माण होणारी रहदारीच्या समस्या कमी करण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावरच विद्यार्थ्यांना रहदारीविषयक नियमांची व स्वतःच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करुन दिली तर अपघाताचे प्रमाण निश्चित कमी कसा येईल व त्यादृष्टिने हे संशोधन हाती घेणे संशोधकास आवश्यक वाटते.

१.२ संशोधनाची गरज :-

दररोज रस्त्याने जात असताना संशोधकास रस्त्यावर बरीच वर्दळ दिसून येते. यामध्ये विविध प्रकारच्या अनेक गाडया भरधाव वेगाने रस्त्यावरुन जाताना दिसतात. यामध्ये अधिक प्रमाण लक्षात घेतले तर महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी जास्त प्रमाणात आढळून येतात. ही मुले अगदी भरधाव वेगाने एखादा गड जिंकायचा आहे या आविर्भावात गाडी चालवताना आढळून येतात.

महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनींचा गट हा कुमारवयीन असतो. व कुमारवयीन असल्याने या अवस्थेत विद्यार्थ्यांचा शारिरीक व भावनिक विकास झपाटयाने होत असतो. त्यांच्या शरीररचनेत दिसून येतील असे बदल होत असतात.विविध अंतःस्त्रावी ग्रंथी स्त्रवू लागतात. यामुळे विद्यार्थी गोंधळून जातात. कुमारवयीन अवस्था ही

गोंधळाची अवस्था असते. या अवस्थेत विद्यार्थ्यांमध्ये चंचलता दिसून येते. धडाडीने कार्य करण्याची वृत्ती असते. इतरांपेक्षा मी काहीतरी वेगळे केले पाहिजे म्हणजे माझी छाप इतरांवर पडेल. तसेच विविध प्रकारचे स्टंट करण्याकडे या वर्गाचा जास्त ओढा असतो. यामध्ये दोन्ही हात मोकळे सोडून गाडी चालविणे, पुढचे चाक हवेत उचलून फक्त मागच्या एका चाकावर गाडी चालवणे, वेगात गाडी आणून करकचून ब्रेक लावून जागच्या जागी गाडी फिरवणे. ॲक्सेलेटर उगीचच जोरात फिरवून गाडीचा विशिष्ट आवाज करणे, वेगाने गाडी चालवून डिस्क ब्रेक लावून गाडी पुढच्या चाकावर उभी करुन मागचे चाक हवेत ठेवणे अशाप्रकारे स्टंट करण्याने इतरांचे लक्ष त्यांच्याकडे वेधून त्यांच्यावर छाप पाडण्याचा प्रयत्न केला जातो. तरुणाईचं सळसळतं रक्त असे यामुळेच म्हटले जाते.

वडीलधाऱ्यांनी जर हिताच्या दृष्टिने दोन गोष्टी सांगितल्या तर या विद्यार्थ्यांना हा त्यांचा अपमान वाटतो. आम्हाला सर्व समजते सांगण्याची काहीएक गरज नाही या आविर्भावात ते वागतात व या वडिलधाऱ्यामंडळीच्या बोलण्याकडे सर्रास दूर्लक्ष करण्याची प्रवृत्ती जास्त असते.

नियम हे मोडण्यासाठी व कायदे हे तोडण्यासाठीच असतात.अशी त्यांची धारणा दिसून येते. यामुळे या वयोगटातील विद्यार्थी सुसाट, भरधाव वेगाने गाडया चालवतात व अपघात घडतात.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रहदारीविषयक नियमांची जाणीव झाली तर अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. या विद्यार्थ्यांमध्ये रहदारीविषयक नियमांची अभिवृत्ती विकसित व्हावी म्हणून हे संशोधन गरजेचे आहे.

१.३ संशोधनाचे महत्त्व :-

अहमदनगर हे शहर तसे आता बरेच गजबजलेले असते व अशा शहरात प्रवास करणे, मग ते स्वतःच्या मालकीच्या वाहनाने असो किंवा सार्वजनिक वाहतुकीच्या माध्यमातून पण हा प्रवास फारसा आनंददायक राहिलेला नाही, वाहतुकीच्या नियमांचे सर्रास होणारे उल्लंघन, चुकीच्या पध्दतीने उभी केलेली वाहने, वाहने उभी करण्यापूर्वी - वळविण्यापूर्वी योग्य ते संकेत न देणे अशा अनेक स्वरुपांच्या तक्रारी आपण वाहतुकीच्या संदर्भात अनुभवत असतो.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अधिक प्रमाणात वाहनांबद्दल असणारा कल लक्षात घेता या विद्यार्थ्यांना रहदारीविषयक नियमांची व्यवस्थित माहिती देणे आवश्यक आहे.यामध्ये परवान्याचे महत्त्व, वाहन चालविताना अपघात झाल्यास प्राथमिक उपचार कसे करावेत ? त्यासाठी वाहनाच्या प्रथमोपचार संचामध्ये काय -काय साहित्य कायमस्वरुपी ठेवावे?

वाहनविषयक कोणती कागदपत्रे नेहमी बरोबर बाळगावीत ? विविध नियम व चिन्हे यांचा अर्थ काय ? त्याचा वापर इ.बद्दल माहिती देऊन या विद्यार्थ्यांमध्ये रहदारी विषयक नियमांची माहिती देता येईल.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये परिवहनविषयक सकारात्मक अभिवृत्तीची जाणीवजागृती होईल.

या विद्यार्थ्यांना वाहने देताना या विद्यार्थ्यांच्या पालकांनाही पूर्णपणे जागरुक राहून, विद्यार्थ्यांना वाहन परवाना काढून देऊन मग वाहन चालवायला द्यावे. अशाप्रकारे पालकांमध्येही परिवहन विषयक अभिवृत्तीची जाणीव जागृती होईल.या विद्यार्थ्यांनी रहदारी विषयक नियमांचे पालन केल्याने तसेच इतरांनाही या नियमांचे पालन करण्यास प्रवृत्त केल्याने अपघाताला आळा बसण्यास मदत होईल व शहरामध्ये होणारी वाहतुकीच्या कोंडीची अडचण बऱ्याच प्रमाण कमी करता येईल.

१.४ शीर्षक :-

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील रहदारीविषयक
जाणिवेचा अभ्यास.

१.५ कार्यात्मक व्याख्या :-

शैक्षणिक संशोधनामध्ये एखाद्या चलाचा, संज्ञेचा सर्वसामान्य अर्थ न घेता, त्या विशिष्ट संशोधन प्रक्रियेत एखादा निश्चित अर्थ घेतला जातो. या निश्चित केलेल्या अर्थास, शब्दांकित करावे, व या अर्थास त्या चलाची संशोधन प्रक्रियेतील कार्यात्मक व्याख्या असे म्हणतात.

कार्यात्मक व्याख्यांमुळे संशोधन प्रक्रियेत संशोधकाला एखाद्या विशिष्ट चलासंबंधी जो निश्चित अर्थ अभिप्रेत आहे तो इतरांना समजतो.

1) महाविद्यालयीन विद्यार्थी

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि- बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"माध्यमिक शाळेमध्ये शिक्षणाऱ्या ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या सामाजिक गरजांचा तौलनिक अभ्यास"

संशोधक

खोमणे सोमनाथ दत्तात्रय

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that **खोमणे सोमनाथ दत्तात्रय** of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: "माध्यमिक शाळेमध्ये शिक्षणाऱ्या ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या सामाजिक गरजांचा तौलनिक अभ्यास" as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022

Paper No.	XII & XVI		
Out of	80	20	100
Mark obtained	65	15	80

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/8/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्याम सांगळे आणि श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. वाघ सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. गायकवाड एस.डी. डॉ.शैलजा कुचेकर यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक / / २०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
खोमणे सोमनाथ दत्तात्रय

प्रकरण पहिले
विषय प्रवेश

१.१ प्रस्तावना -

शाळा व कुटुंब या सामाजिक शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. या औपचारिक व अनौपचारिक संस्थामुळे मुलांचे सामाजिकरण होते. मुलांच्या सामाजिक गरजा ओळखून त्यांना शालेय व परिसरातील जीवनात सुरक्षितता मिळवून देणे महत्त्वाचे आहे. त्याला प्रेममय वातावरणाची गरज असते. सुरक्षिततेची भावना व प्रेम, माया वात्सल्ये या त्यांच्या मूलभूत मानसिक व भावनिक गरजा होय. "आईच्या दुधाइतकीच" त्याला जिव्हाळयाची व सुरक्षिततेची आवश्यकता असते. कुटुंबाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास आज आई, वडील दोघांनाही नोकरीची व ग्रामीण भागात मजूरीची गरज भासते. त्यामुळे मुलांना त्यांचा पुरेसा सहवास मिळू शकत नाही. त्याचप्रमाणे आर्थिक विषमता मुलांच्या शिक्षणावर कसा परिणाम करते हाही मुद्दा विचारात घेणे आवश्यक आहे. आर्थिक परिस्थिती उत्तम असलेल्या व्यक्तीच्या मुलांना विकासाच्या शिक्षणाच्या ज्या सोयी व साधने उपलब्ध असतात ती गोरगरिबांच्या मुलांना नसतात. भारतातील बहुसंख्य जनता दारिद्रयात खितपत पडली आहे. अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या जीवनाच्या प्राथमिक व अत्यावश्यक गरजा भागविण्याचे सामर्थ्य तिच्यात नाही या परिस्थितीत मुलांच्या विकासाकडे लक्ष देण्यास कोणास फुरसद आहे? पैसा, शैक्षणिक वातावरण व प्रोत्साहन यांच्या अभावी जन्मत: बुद्धिमान असलेल्या अनेक मुलांची बुद्धी गंजून जात असलेली पाहावयास मिळते. ग्रामीण भागातील राहणाऱ्या मुलांचे अनुभवविश्व तेथील जीवन व व्यवसाय यांच्या पुरतेच मर्यादित असते. वृत्तपत्रे, वाचनालये, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, मोठमोठया कचेऱ्या, कारखाने, रस्ते, वाहने दवाखाने, व्याख्याने करमणूकीची साधने खेडयामध्ये नसतात. त्यामुळे तेथील मुलांच्या ज्ञानाचेही क्षेत्र सीमित होते. त्याच प्रमाणे अनेक बरीच कारणे असतात. त्यामुळे आज शाळेवरची जबाबदारी आणखी वाढते. मुलांच्या सामाजिक गरजा कोणत्या हे समजले तर शिक्षकांना याबाबतीत उपाययोजना करणे शक्य होईल. त्या दृष्टिकोनातून हा प्रकल्प महत्वाचा आहे.

१.२ संशोधनाची गरज

मूलभूत गरजा, शैक्षणिक गरजा पूर्ण होतात का? वातावरण कसे आहे. आर्थिक परिस्थिती कशी आहे. अध्ययन अनुभव कसा आहे? तो पुरेसा आहे का? पुढील शिक्षणाची व्यवस्था समाज किंवा कुटुंब पूर्ण करेल काय? समाजमान्येतीची गरज कशा प्रकारे पूर्ण होते आहे. हुशार विदयार्थ्यांची दखल समाज घेतो काय? त्यांची भावनिकता, मानसिकता जपण्यासाठी आई वडील काळजी घेतात का? मुलांना इतर कामे करावी लागतात का? त्याचप्रमाणे या मुलांना शाळा कशा प्रकारे मार्गदर्शन करतात. बदलत्या कुंटुब व समाज व्यवस्थेमुळे मुलांच्या भावनिक व सामाजिक गरजा भागत नाहीत ही एक मोठी शोकांतिका आहे. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. तो जर प्रतिकूल परिस्थितीत वाढल असेल तर त्यांचा सामाजिक विकास होणार नाही. बालकांच्या सामाजिक गरजांची पूर्तता झाली तर त्यांचा चांगल्या प्रकारे विकास होऊ शकतो. त्यासाठी कुटुंब, शाळा व समाज यांनी जाणीवपूर्वक हातभार लावणे गरजेचे आहे. वरील गोष्टीची पूर्तता कशा प्रकारे होते हे जाणून घेण्याची जिद्द मनामध्ये होती तसेच त्यादृष्टीने विषयाबद्दल जाणीव जागृती करणे. व सामाजिक गरजांची शोध घेणे या दृष्टिने प्रस्तुत संशोधन हाती घेण्याची गरज आहे असे वाटले.

१.३ संशोधनाचे महत्त्व

साधारपणे माध्यमिक विद्यालयातील विदयार्थ्यांचा वयाचा कालखंड १४ ते १६ असतो. म्हणजेच "कौमार्यावस्थेचा कालखंड होय." या कालखंडातील विदयार्थ्यांच्या "सामाजिक गरजा" कोणत्या आहेत हे जर समजले तर शाळा, समाज व कुटुंब यांच्याकडून सामाजिक गरजांची दरी भरून निघेल. त्याच प्रमाणे हे संशोधन खालील घटकांसाठी फायदेशीर होईल.

शिक्षक :- १४ ते १६ या वयाच्या कालखंडातील विदयार्थ्यांच्या सामजिक गरजा कोणत्या हे शिक्षकांना समजेल व त्याप्रमाणे ते विदयार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करतील. त्या कशा सोडविल्या पाहिजेत. याची जाणीव विदयार्थ्यांना करून देतील.
मुख्याध्यापक – मुख्याध्यापकाला विदयार्थ्यांच्या सामाजिक गरजा कोणत्या हे जर समजले तर ते आपल्या सहाकारी शिक्षकांना या संदर्भात मार्गदर्शन करतील. पालक

शिक्षक सभेचे आयोजन करतील त्याचप्रमाणे मुख्याध्यापक संस्था चालकांना या बाबतीत माहिती देतील. संस्थेकडून या गरजा सोडविण्यासाठी मदत मिळवू शकतील, अशा प्रकारे मुख्याध्यापक शाळेचा मुख्य केंद्रबिंदू असल्याने अनेक समस्या शाळेमध्ये सोडविण्यास कर्तव्यदक्ष होतील.

पालक – त्याचप्रमाणे अनेक पालकांना आपल्या मुलांच्या गरजा कोणत्या याची जाणीव नसते. प्रस्तुत संशोधनामुळे आपल्या पाल्याच्या कोणत्या गरजा आहेत. त्यांना कशा प्रकारे मार्गदर्शन करावे हे समजून येईल. व तशी उपययोजना करण्यास प्रवृत्त होतील.

इतर घटक :– त्याचप्रमाणे समाजामध्ये अनेक सेवाभावी संस्था असतात. आर्थिक दृष्टया दुर्बलांना मदत करतात. त्यांनाही सामाजिक गरजा विषयी जाणीव होईल व सढळ हाताने हुशारांना मदत करता येईल.

एकूणच शिक्षण प्रणालीशी निगडीत घटकांना व सामाजिक संस्थांना या समस्यांचे सापेक्ष महत्व प्रस्तुत संशोधनामुळे कळेल.

१.४ संशोधन शीर्षक / समस्या

" माध्यमिक विद्यालयामध्ये शिकणा–या विद्यार्थ्यांच्या सामाजिक गरजांचा तौलनिक अभ्यास ."

१.४.१. कार्यात्मक व्याख्या

सामाजिक गरजा –

१. "ज्या गरजांची समाजाकडून पूर्तता होणे अपेक्षित असते. अशा गरजा म्हणजे सामाजिक गरजा होय."

२. "समाजामध्ये जीवन जगत असताना अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा बरोबरच शैक्षणिक, भावनिक, मानसिक, समायोजन, आर्थिक, सुरक्षितता, कौटुंबिक, समाजमान्येता, संस्कार या बाबीची पूर्तता होणे (समाजाकडून) अपेक्षित असते. अशा गरजा म्हणजे सामाजिक गरजा होय."

१.५ उद्दिष्टे

१. ग्रामीण भागातील मुलांच्या सामाजिक गरजांचे वर्गीकरण करणे.

२. माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या सामाजिक गरजांचा शोध घेणे.

३. माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या सामाजिक गरजांच्या संदर्भात शिक्षकांच्या कार्यवाहीचा अभ्यास करणे.

४. माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या सामाजिक गरजांच्या बाबतीत पालकांच्या भूमिकांचा शोध घेणे.

५. सामाजिक गरजांची पूर्तता अधिकाधिक होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

१.६ गृहीतके

१. माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांना सामाजिक गरजा असतात.

२. माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या सामाजिक गरजांच्या पूर्ततेत शिक्षक सहभागी असतात.

३. मुलांच्या सामाजिक गरजांच्या संदर्भात पालकांचा सहभाग असतो.

१.७ नमुना निवड

१. सामाजिक गरजांचा अभ्यास करण्यासाठी माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या चारही शाळेतील विद्यार्थ्यांची यादृच्छिकीकरण पध्दतीने एकूण ८० विद्यार्थ्यांची निवड केली.

२. प्रत्येक शाळेतील ५ अशा २० शिक्षकांना पद्‌निश्चियन श्रेणी दिली.

१.८ संशोधन पध्दती

सर्वेक्षण पध्दती – आष्टी तालुक्यातील माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या शहर व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक गरजांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने उपयुक्त अशा सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला.

१.९ माहिती संकलनासाठी वापरलेली साधने

१. माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या विदयार्थ्यांसाठी– संशोधनासाठी विदयार्थ्यांकडून माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली भरून घेतली.

२. माध्यमिक शाळेमध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी वर्णनात्मक पदनिश्चयन श्रेणी दिली.

३. माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या विदयार्थ्यांच्या पालकाची मुलाखत घेतली.

१.१० संख्याशास्त्रीय साधने

मुलांच्या सामाजिक गरजांची पूर्तता किती प्रमाणात होते, याची टक्केवारी काढली व त्याची तुलना केली.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"शाहू महाराजांची सामाजिक कार्य"

संशोधक

मोरे सुशांत अशोक

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that मोरे सुशांत अशोक of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: "शाहू महाराजांची सामाजिक कार्य" as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022.

Paper No.	XII & XVI		
Out of	80	20	100
Mark obtained	55	15	70

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/5/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्याम सांगळे आणि श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. वाघ सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा. भास्कर चव्हाण, यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक ०१/ २०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
मोरे सुशांत अशोक

शाहू राजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव व आईचे नाव राधाबाई होते. शाहूंचे बालपणीचे नाव यशवंतराव होते. १७ मार्च १८८४ रोजी शाहूंचे दत्तकविधान व राज्यारोहण झाले. यशवंतरावाचे दत्तकविधानानंतर 'शाहू महाराज' असे नामकरण झाले. शाहूंनी आपल्या आयुष्यात जातीभेद निर्मुलन. अस्पृश्यता निवारण. स्त्रियांचा उद्धार. बहुजनांचा शैक्षणिक विकास. औद्योगिक प्रगती. शेतीचा विकास. धरणे. रस्ते ई. क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली. आपली राजसत्ता खऱ्या अर्थाने उपेक्षित. वंचित समाजासाठी वापरली. त्यामुळे शाहू हे लोकांचे राजे झाले.

कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी 17 मार्च 1884 रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले. व शाहू हे नाव ठेवले.
28 वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे
1891- श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब यांच्याशी विवाह

महाराजांचे शिक्षण

- 1985 ते 1894 या काळात शैक्षणिक कार्य पूर्ण केले
- 1894 सर फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली धारवाड येथे शिक्षण घेतले
  1898 पर्यंत राजकोट येथे Principal McNoton यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण
  2 एप्रिल 1894 रोजी राज्याभिषेक समारंभ झाला.
  1894 - राजे झालेनंतर लगेचंच त्यांनी बहुजन समाजातून तलाठ्याच्या नेमणुका करण्याचा अध्यादेश काढला
  व वेठबिगाराची पद्धत बंद केली.
  1895 साली मोतीबाग तालीम सुरु केली. शाहू महाराजांना कुस्ती हा खेळ आवडत असे.
  याच वर्षी शाहूपुरी गुळाची व्यापार पेठ सुरु केली.
  27 मार्च 1895 - पुणे येथील फर्गुसन महाविद्यालयाच्या नव्या इमारतीचे उद्घाटन केले.
- 1887 - आळते महार स्कूल ची स्थापना केली, दुष्काळ पिडीत शेतकऱ्यांना कर्ज दिले.
  1899 - वेदोक्त प्रकरण याच वर्षी घडले. तेंव्हापासून ब्राम्हणांच्या मक्तेदारीस शह देण्यासाठी आणि त्यांच्याकडून बहुजनांची होणारी गळचेपी थांबवण्यासाठी बहुजन उद्धाराचे कार्य हाती घेतले. वेदोक्त प्रकरणात ब्राम्हणांचे समर्थन केले.
  1901 साली मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग' या बोर्डिंग ची स्थापना कोल्हापुरात केली. याच वर्षी नाशिक येथे उदोजी विद्यार्थी वसतीगृहाची स्थापना केली. तसेच गोवध बंदी कायदा केला.
  20 जुलै 1902 रोजी संस्थानामध्ये नोकरी मध्ये 50% आरक्षण देण्याचा आदेश काढला.
  9 नोव्हेंबर 1906 रोजी किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटी ची स्थापना कोल्हापूर येथे केली. तसेच शाहू मिल तथा 'शाहू स्पिनिंग अण्ड विव्हिंग मिल' ची सुरुवात केली.

1907 सहकारी तत्वावर कापड गिरणी सुरु केली. अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांसाठी 'मिस क्लार्क बोर्डिंग हाउसची' स्थापना केली.

1908 बॉबस्फोट घडवून महाराजांना मारण्याचा अयशस्वी प्रयत्न समाजकंटकांकडून केला गेला.

1910 जहागीरदारांचे अधिकार कमी केले

11 जानेवारी 1911 साली कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. अध्यक्ष म्हणून परशुराम घोसटवाडकर तर प्रमुख म्हणून भास्करराव जाधव हे काम पाहत. याच वर्षी विद्यार्थ्यांना 15% नादारी देण्याची घोषणा केली.

शिक्षकांसाठी प्रशिक्षण देण्याची योजना व गुणवत्तेनुसार पदोन्नती देण्याची योजना सुरु केली.

कोल्हापुरात राधानगरी तालुक्यात भोगावती नदीवर राधानगरी धरण बांधले.

सत्यशोधक समाजाचे अधिवेशन पुणे येथे

1912 - खासबाग मैदान या कुस्ती मैदानाची सुरुवात कोल्हापूर येथे केली. (याला 2012 साली 100 वर्षे पूर्ण झाली).

सहकारी कायदा केला व सहकार चळवळीला प्रोत्साहन दिले.

सत्यशोधक समाजाचे अधिवेशन नाशिक येथे भरवले

1913 गाव तिथे शाळा असावी असा अध्यादेश काढला. पाटील शाळांची सुरुवात केली.

कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची शाळा सुरु केली.

1916 साली संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले

बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी 'डेक्कन रयत शिक्षण संस्थे'ची स्थापना निपाणी या ठिकाणी केली.

आर्य समाजाची तत्त्वे याच वर्षी स्वीकारली.

1917 विधवांच्या पुनर्विवाहास कायद्याने मान्यता दिली

25- जुलै पासून संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.

1918 आंतरजातीय विवाहास कायद्याने मान्यता दिली

कुलकर्णी व महार वतने रद्द केली.

जमिनी रयतवारीने कसण्यास दिल्या

आर्य समाजाची शाखा कोल्हापुरात सुरु करून राजाराम कॉलेज या संस्थेकडे चालवण्यास दिले.

गुन्हे गारी जमातीच्या लोकांची पोलीस हजेरी बंद केली.

तलाठी शाळा सुरु केल्या.

1919 - स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायांविरुद्ध कठोर कायदा केला.

एप्रिल 1919 - कानपूर - "अखिल भारत वर्षीय कुर्मी क्षत्रिय महासभा" या संस्थेच्या 13 व्या अधिवेशनात त्यांच्या अतुल्य कार्याबद्दल "राजर्षी" पदवी बहाल करण्यात आली.

शाळेत अस्पृश्यता पाळण्यास मनाई करणारा कायदा केला.
1920 - घटस्फोटाचा कायदा करण्यात आला
देवदाशी प्रथा कायद्याने बंद करण्यात आली
हुबळी - "ब्राम्हणेतर सामाजिक परिषद" चे अध्यक्षपद भूषवले
पूजाअर्चा शिकाऊ उमेदवाराकडून करावी असा आदेश काढला
- 6 मे 1922 रोजी मुंबई येथे निधन.

आरक्षणाचे प्रणेते

मागासलेल्या वर्गाना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. अशी कल्पना महात्मा जोतिबा फुले यांनी मांडली.राजर्षी शाहूंनी आपल्या अधिकारांचा वापर करून ही कल्पना प्रत्यक्षात उतरवली. ६ जुलै १९०२ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० % जागा राखीव राहतील अशी घोषणा केली. त्याची त्वरित अंमलबजावणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून रिपोर्ट मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेव्हा सामाजिक कार्यकर्ते म्हणवणाऱ्या अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. शाहुंवर अनेक प्रकारचे आरोप केले. परंतु वंचितांच्या विकासाचे व्रत घेतलेल्या शाहूंनी कशाचीही पर्वा न करता आपले धोरण चालू ठेवले.

तथाकथित गुन्हेगार जातींविषयी भूमिका

जातव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गाचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला. परिणामी त्यांची सर्वच क्षेत्रात अधोगती झाली. त्यांचा सामाजिक दर्जा खालावला. समाजाकडून मिळणारी अन्याय्य वागणूक व उत्पन्नाचे काहीच साधन नाही अशा दुहेरी संकटात सापडलेल्या मागास, भटक्या जमातीतील अनेक लोकांनी पोटापाण्यासाठी चोऱ्या, दरोडे अशा गोष्टींचा आधार घेतला. तत्कालीन ब्रिटीश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहुराजांना या लोकांची कणव होती. शाहू खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी ही हजेरी पद्धत बंद केली. या जाती-जमातीतील लोकांना संघटीत करून गुन्हेगारी कृत्यांपासून परावृत्त केले. त्यांना नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार नेमले, रथावर वाहक नेमले. त्यांना घरे बांधून दिली. राहण्याची व पोटापाण्याची सोय झाली. शाहुराजांचे प्रेम मिळाले. त्यामुळे या लोकांनी गुन्हेगारी कारवाया सोडून देवून 'माणूस' म्हणून जगायला सुरुवात केली. गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करून समान सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच.

राजर्षी शाहू आणि स्त्रियांची स्थिती

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"महात्मा जोतीबा फुले यांचा जीवनक्रम"

संशोधक

पाचारणे अनिल साहेबराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that **पाचारणे अनिल साहेबराव** of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: "महात्मा जोतीबा फुले यांचा जीवनक्रम" as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022.

Paper No.	XII & XVI		
Out of	80	20	100
Mark obtained	66	17	83

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/5/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. केतन सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ.शैलजा कुचेकर यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक ०५ २०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
पाचारणे अनिल साहेबराव

बालपण आणि शिक्षण

जोतिबा फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी महात्मा फुल्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते, त्यामुळे गोऱ्हे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले व तेच नाव पुढे रूढ झाले. कटगुणहून त्यांचा परिवार पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आला. तेथे त्यांचे घर असून, त्यांच्या नावे सातबाराचा उतारा आहे. खानवडी येथे फुले आडनावाची बरीच कुटुंबे आहेत.

जोतीराव केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी सावित्रीबाई यांचेशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स. १८४२ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला.

शैक्षणिक कार्य[

महात्मा फुल्यांच्या कवितेतल्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत.

> विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।
>
> नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून ते अतिशय अस्वस्थ होत असत. ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा त्यांनी निश्चय केला. त्याप्रमाणे त्यांनी इ.स. १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली. तसेच अस्पृश्य मुलांसाठी त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत इ.स.१८५२ मध्ये शाळा स्थापन केली. त्यांच्या या कार्याला सनातन्यांकडून सतत विरोध होत असे. पण जोतीराव आपल्या भूमिकेवर ठाम असत. समाज सुधारण्याच्या कार्याला गती दिली. जोतीरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षणकार्यास प्रवृत्त केले. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे

सावित्रीबाई. त्याचप्रमाणे स्वतंत्रपणे फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे महात्मा फुले हे पहिले (?) भारतीय होत.

सामाजिक कार्य

मानवी हक्कावर इ.स.१७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींचे शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्‍चित मत आणि अनुमान होते.

'कोणताही धर्म ईश्‍वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे' असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्‍वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे अशी त्यांची (अस्तिक्यवादी) विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्‌ऱ्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्‌वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणून ही जोतीरावांचे दर्शन होते. 'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे' हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते.

मुलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारचे वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे हे ज्योतीराव फुलेंनी आपल्या ' सार्वजनिक सत्यधर्म ' संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडली आहे.त्यातील काही महत्वाची वचने पुधीलप्रमाणे आहेत .

- स्त्री अथवा पुरुष एकंदर सर्व गावाचे , प्रांताचे , देशाचे , खंडाचे संबंधात अथवा कोणत्याही धर्मातील स्वताच्या संबंधात , स्त्री आणि पुरुष या उभयतांनी आठवा सर्व स्त्रियांनी अथवा एकमेकात एकमेकांनी कोणत्याही प्रकारची आवडनिवड (भेदभाव) न करता या भूखंडावर आपले एक कुटंब समजून एकमताने सत्यवर्तन करून राहावे .
- आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांना उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मता स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यास आपापसात सार्या हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे .
- आपणा सर्वांच्या निर्माणकर्त्याने सर्व मानवी स्त्री - पुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे . जो आपल्यापासून दुसर्या एखाद्‌या व्यक्तीस कोणत्याही तऱ्हेचे नुकसान देत नाही , अथवा जो कोणी

आपल्यावरून दुसर्या मानवांचे हक्क समजून इतरांना पीडा देत नाही त्याला 'सत्य्वर्तन' करणारा म्हणावे .

- आपल्या सर्वांच्या निर्मिकाचे एकंदर सर्व स्त्री - पुरुषांस एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहे . त्यातून एखादा मानव आथवा काही मानवांची टोळी एखाद्या व्यक्तिवर जबरी करू शकत नाही , त्याप्रमाणे जबरी न करणारास सत्यवर्तन करणारे म्हणावे .

- स्त्री अथवा पुरुष जे आपल्या कुटुंबासह , आपल्या भाऊबंदास , आपल्या सोयर्याधायर्यास आणि आपल्या इष्टमित्र साथींना मोठ्या तोर्याने पिढीजात श्रेष्ठ मानून आपल्यास पवित्र मानीत नाहीत आणि एकंदर सर्व मानवी प्राण्यास पिढीजात कपटाने अपवित्र मानून त्यास नीच मानीत नाहीत , त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे .
- स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यास श्रेष्ठ मानतात , परंतु शेतकरी वगैरे यांना मदत करणार्यांचा आदरसत्कार करतात त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे .

महात्मा फुले यांनी मानवास सत्यधार्माचा जो बोध केला त्यातील हि काही वचने आपण वाचली कि लक्ष्यात येते , ज्योतीरावाचा आवाका किती मोठ्ठा होता . त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणार्या माणसाला माणूस म्हनून प्रतिष्टा देणारा धर्म साकार करायचा होता . त्यासाटी मानवी वर्तनात, म्हणजेच व्यवहारात आमूलाग्र बदल घडऊन आणायचा होता .त्यासाटी मानवी स्वभाव आणि मानसिकता यात काय बदल केले पाहिजेत याबाबतही ज्योतीरावांनी विपुल लेखन केले आहे . 'अखंड' या काव्यप्रकारात त्यांनी 'मानवाचा धर्म' , 'आत्मपरीक्षण' , 'नीती' , ' समाधान' , 'सहिष्णूता' , सदसदविवेक , उद्योग , स्वच्छता , गृहकार्यदक्षता , इत्यादी गोष्टींवरही भाष्य केले आहे . ज्योतीरावांनी वेगवेगळ्या अखंडातून जे विचार मांडले , मानवी जीवनाला दिशा देणारा जो उपदेश केला , त्यातील काही निवडक भाग येथे विचारात घेतला पाहिजे . ज्योतीराव आपल्या अखंडात म्हणतात ,

सर्वांचा निर्मिक आहे एक धनी || त्याचे भय मनी || धरा सर्व ||१||

न्यायाने वस्तूंचा उपयोग घ्यावा || आनंद करावा || भांडू नये ||२||

धर्म राज्य भेद मानवा नसावे || सत्याने वर्तावे || ईशासाटी ||३||

सर्व सुखी व्हावे भिक्षा जी मागतो || आर्यास सांगतो || जोती म्हणे ||४||

दरिद्री मुलांनी विद्येस शिकावे || भिक्षान्न मागावे || पोतापुर्ते ||१||

विद्वान वृद्धांनी विद्यादान द्यावे || भिक्षेकरी व्हावे || गावांमध्ये ||२||

स्त्री - पुरुषांसाठी शाळा त्या घालाव्या || विद्या शिकवाव्या ||

भेद नाही || ३ || स्वतः हितासाठी खर्च जे करती ||

अधोगती जाती || जोती म्हणे || ४ ||

निर्मल निर्धोशी निव्वळ विचारी || सदा सात्याचारी || प्रपंचात ||१||

सूर्यापरी सत्यप्रकाश पेरिता || शांती सर्वा देतो || चंद्र जैसा |||२||

होईना भूदेव जती मारवाडी || मानवा न पीडी || सर्ववत ||३||

अशा सज्जनास मानव म्हणावे || त्यांचे गुण घावे || जोती म्हणे ||४||

क्रोधाचा विटाळ सत्यधर्म पाळी | तो खरा बळी || मानवात ||१||

सर्वांभूती द्या हृदयी कोमल || घालितो अगळ || इंद्रियांस ||२||

जगात वर्ततो सद्गुणी मवाळ || वासनेस मूळ || डाग नाही ||३||

सत्यशोध होता , धिक्कारी तो कवी || तोच सत्यवादी ||

जोती म्हणे ||४||

निर्मिले बांधव स्त्री पुरुष प्राणी || त्यात गोरे कोणी || रंगवर्ण ||१||

त्यांचे हितासाठी बुद्धिमान केले || स्वातंत्र्य ठेविले || ज्या त्या कामी ||२||

कोणास न पीडी कमावले खाई || सर्वा सुख देई || आनंदात ||३||

खरी हीच नीती मानवाचा धर्म || बाकीचे अधर्म || जोती म्हणे ||४||

सत्याविन नाही धर्म तो रोकडा || जनांशी वाकडा || मतभेद ||१||

सत्य सोडू जाता वादामध्ये पडे | बुद्धीस वाकडे || जन्मभर ||२||

सत्य तोच धर्म करावा कायम || मानवा आराम || सर्व ठायी ||३||

मानवांचा धर्म सत्य हीच नीती || बाकीची कुनीती || जोती म्हणे ||४||

सत्याचा जिव्हाळा मनाची स्वच्छता || चित्तास स्वस्थता ||

जेथे आहे ||१|| जेथे जागा धीर सदा हृदयात ||

सत्य वर्तनात | खर्ची द्यावा ||२||

पिडा दु:खे सोशी संकटे निवारी || गांजल्यास तारी || जगामागी ||३||

धीर धरूनिया सर्वा सुख देती || यशवंत होती || जोती म्हणे ||४||

सत्यशोधक समाज

२४ सप्टेंबर इ.स.१८७३ रोजी महात्मा जोतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.सत्यशोधक समाज सोसायटीचे ते पहिले अध्यक्ष आणि खजिनदार होते. वेदांना झुगारून त्यांनी हे कार्य करण्यास सुरवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरवात केली. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू केले. त्याचवेळी त्या कन्याशाळेच्या शिक्षिका म्हणूनही कार्य करीत होत्या. दीनबंधू प्रकाशनाने सत्यशोधक चळवळीच्यावेळी लेखन प्रकाशनचे कार्य केले. महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत चळवळ पोचली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला.[१]तथाकथित उच्चवर्णीयांकडून होणाऱ्या अन्यायापासून, अत्याचारापासून व गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली.

समारोप

विद्याध्यायनासाठी ज्यांचा सतत असे प्रयास,

त्यांचे अखंड जीवन म्हणजे, जणू एक खडतर प्रवास.

परि स्त्री शिक्षण; हा एकची असे ध्यास, हा एकची असे ध्यास,

या उक्तीप्रमाणे महात्मा जोतीराव फुले यांनी आपले व्यक्तिमत्व स्वयंप्रेरणेने व स्वतःच्या प्रयत्नांनी घडविले होते. त्यांचा पिंड हा कृतीशील क्रांतिकारकाचा होता. महाराष्ट्राच्या समाजसेवेसाठी ध्येयाने भरून जाऊन आपले सर्व जीवन समर्पित करणारे ते थोर पुरुष होते. आधुनिक भारतातले पहिले समाजक्रांतिकारक म्हणून त्यांना ओळखले जाते. कारण ते सामान्यांतील असले तरी विचाराने व कर्तृत्वाने असामान्य होते. सामाजिक विषमतेविरुद्ध ज्योतीबांनी बंड पुकारले. 'शिक्षण व समता' या दोन शब्दांतच त्यांच्या या कार्याचे यथोचित वर्णन करता येईल. महाराष्ट्रातील सर्वसामान्यांसाठी रात्रंदिवस झटणारे ते सेवक होते.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"प्लॅस्टिक कचरा एक सामाजिक समस्या "

संशोधक

सय्यद अजीज नशीर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that सय्यद अजीज नशीर of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: "प्लॅस्टिक कचरा एक सामाजिक समस्या" as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022.

Paper No.	XII & XVI	[illegible]	Total
Out of	80	20	100
Mark obtained	65	15	80

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/8/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्याम सांगळे आणि श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. वाघ सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा. भास्कर चव्हाण, प्रा.रणदिवे बी.ए. डॉ.शैलजा कुचेकर यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक ३०/८ २०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
सय्यद अजीज नशीर

प्रकरण पहिले
प्रास्ताविक

१.१ प्रास्तविक -

कचरा व्यवस्थापन करताना अगोदर कचरा म्हणजे काय ? कच-यामध्ये कोणकोणत्या गोष्टीचा समावेश होतो. कच-याचे प्रकार, वर्गीकरण, साठा, एकत्रीकरण, वाहतूक प्रक्रिया, अंतिम विल्हेवाट हया सर्व गोष्टी समजून घेणे आवश्यक असते. कारण निसर्गातील कोणतीही वस्तू टाकाऊ किंवा निरुपयोगी नाही. कारण निसर्गात असणा-या प्रत्येक गोष्टीचा निसर्ग पुरेपूर वापर करीत असतो. त्यामुळे निसर्ग कचरा करीत नाही. माणसाने त्याच्या दृष्टीने टाकाऊ झालेल्या वस्तूंना कचरा म्हटले आहे. एखादया वस्तूचा आपला उपयोग संपला की ती वस्तू आपल्या दृष्टीने कचरा होते. पूर्वी पुडीला बांधलेला दोरासुध्दा जपून ठेवून त्याचा वापर केला जात असे. पण आता एकदा वापरली की वस्तू टाकून दिली जाते.

आज घराच्या बाहेर पडले की, घरापासूनच कच-याची जी सुरुवात होती ती इतरत्र कोठेही गेले तरी कचरा दिसत नाही असे होत नाही. रस्त्याच्या कडेला कचरा, दवाखान्याच्या आजुबाजूला कचरा, शाळेच्या व शाळेच्या आजूबाजूला, भाजी मार्केटमध्ये, झोपडपट्टयांमध्ये कचरा, दुकानांच्या बाहेर कचरा, नदयांचे काठ व समुद्राचे काठ या ठिकाणी कचरा, मोठमोठया कारखान्यामध्ये रासायनिक व इलेक्ट्रॉनिक कचरा, रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टॅडच्या ठिकाणी कचरा अशा प्रकारे कच-याचे साम्राज्य मानवाच्या भोवती पसरलेले असूनही त्याच्या डोळयांना ते दिसत नाही. कधी कधी असे वाटते मानवाला कच-याचे भयंकर स्वरुप दिसून ही त्याने आंधळयाचे सोंग घेतले आहे. मानवाने चंद्रावर पाऊल ठेवून चंद्रालाही सोडलेले दिसत नाही. कारण मानवाने मंगळ व चंद्रावर ज्या वस्तु पाठवल्या होत्या त्यापासून तेथे कचरा प्रदूषण झालेले आहे.

विज्ञानाने मानवाच्या जीवनात क्रांती घडवून वेगवेगळया आधुनिक यंत्रसामुग्री, इलेक्ट्रॉनिक वस्तु जरी उपलब्ध करु दिल्या असल्या तरी त्याबरोबर इलेक्ट्रॉनिक कचरा, आण्विक कचरा, वैद्यकिय कचरा या सारख्या समस्या मानवाच्या पुढे उभ्या करुन व पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासासाठी नवीन संकल्पना देऊन त्या विषयाचा विस्तार वाढवलेला आहे.

१.१.१ कचरा व्यवस्थापनाशी संबंधित संज्ञा -

कचरा -

"कचरा म्हणजे असा पदार्थ की जो कुठल्याही कामाचा नसून त्याचे ब-याच काळपर्यंत विघटनही होत नाही."

"कचरा म्हणजे असा पदार्थ की जो कायमस्वरुपी पृथ्वीवर संचयित झालेला असतो."

कचरा व्यवस्थापन -

कच-याचे वर्गीकरण, साठा, एकत्रीकरण, वाहतूक प्रक्रिया, अंतिम विल्हेवाट.

ओला कचरा- पालेभाज्यांचे देठे व फळभाज्यांच्या साली, फळांच्या साली, उरलेले व खराब झालेले अन्नपदार्थ खरकटे अन्न, बुरशी व कीड लागलेले धान्य मानव व जनावरांची विष्ठा इत्यादी.

सुका कचरा - प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या, वस्तू, बंद पडलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू बॅट-या, रबर, धातू, काच, कागद, वर्तमानपत्राचे तुकडे, वहयाचे पुठ्ठे, विविध वस्तूंचे खोके, लाकडी फर्निचर इत्यादी.

विघटनशील कचरा (कुजणारा कचरा) -

"सूक्ष्मजीवांमुळे कुजणा-या कच-यास विघटनशील कचरा असे म्हणतात."

अविघटनशिल कचरा -

"प्लॅस्टिक, काच, रबर आणि थर्मोकोल सारखे पदार्थ कुजत नाही. अशा न कुजणा-या कच-याला अविघटनशिल कचरा असे म्हणतात."

विघटक -

"प्रत्येक वनस्पती व प्राणी यांच्या मृत अवशेषांवर जिवाणू व बुरशी, कवक यासारखे सुस्क्षजीव, मृत प्राणी व वनस्पती यांचे अपघटन किंवा विघटन करतात त्यांना विघटक असे म्हणतात."

नायट्रोजनयुक्त पदार्थ [हिरवे पदार्थ] -

भाज्यांची साली व देठे, खराब पाने, किडकी फळे, निर्माल्य, पुष्पगुच्छातील फुले, भात, भाकरी, चपाती सारखे कोरडे अन्न, झाडांची पाने, रोगट फांद्या, खराब धान्य, कडधान्य इ.

कार्बनयुक्त पदार्थ :- [काळे पदार्थ] -

कार्डबोर्ड, खाद्यपदार्थाची खोके, वाया गेलेले कागद, भेटकार्ड, पत्रिका, चुलीतील राख, केस, नखे, चिंध्या, लाकडाचे तुकडे इ.

ओल्या कच-याचा उपयोग -

सेंद्रीय खते-गांडूळ खत, कंपोस्ट खत, शेण खत, सोन खत, बायोगॅस, वीजनिर्मिती.

सुक्या कच-याचा उपयोग -

टाकाऊ पदार्थापासून टिकाऊ वस्तू तयार करणे

कच-याचे स्त्रोत :-

१. प्लॅस्टिक कचरा -

प्लॅस्टिक पिशव्या पर्यावरणाला धोका -

प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरामुळे निर्माण होणारी समस्या ही मुख्यत्वे कचरा व्यवस्थापनात येणा-या अडचणीमुळे निर्माण होते. प्लॅस्टिकमधील विघटन न होणा-या रसायनांमुळे पर्यावरणाला मुख्य धोका निर्माण होतो. यामध्ये सांडपाणी निचरा करणा-या व्यवस्थेत अडथळे निर्माण होणे, भूगर्भजल प्रदूषित होणे असे धोके समाविष्ट आहेत.

प्लॅस्टिक -

प्लॅस्टिक हे पॉलिमर्स असतात. म्हणजे ते मोनोमर्स नावाच्या पुनरावृत्ती झालेल्या मोठ्या रेणुंपासून बनलेले असतात. प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये पुनरावृत्ती होणारे घटक इथिलिन असतात. इथिलिनचे रेणु जेव्हा पॉलिमराईझ्ड केले जातात. तेव्हा त्यापासून पॉलिथिलिन तयार होते आणि ते कार्बन अणुंची खूप मोठी साखळी तयार करतात ज्यामध्ये एक कार्बन अणु दोन हायड्रोजन अणुंशी जोडलेला असतो.

प्लॅस्टिकच्या पिशव्याची निर्मिती -

प्लॅस्टिक पिशव्या पॉलिमर्स- पॉलिथिलिनच्या तीन मुलभूत प्रकारांपैकी एका प्रकाराने बनविल्या जातात.

१) उच्च घनतेचे पॉलिथिलिन (एचडीपीई)

२) कमी घनतेचे पॉलिथिलिन (एलडीपीई)

३) रेषीय कमी घनतेचे पॉलिथिलिन (एलएलडीपीई)

भाज्यांसाठी वापरल्या जाणा-या पिशव्या मुख्यत्वे एचडीपीई पासून बनलेल्या असतात. तर ड्रायक्लीनरपासून बनलेल्या पिशव्या एलडीपीईपासून बनलेल्या असतात. या दोन पदार्थामधील मुख्य फरक हा आहे की, त्यांच्यातील पॉलिमर साखळीच्या फाट्यांचे प्रमाण वेगवेगळे असते. एचडीपीई आणि एलएलडीपीई रेषीय अशाखीय साखळयांपासून बनलेले असतात तर एलडीपीईतील साखळयांना शाखा असतात.

प्लॅस्टिक आरोग्याला अपायकारक -

प्लॅस्टिक नेहमीच आरोग्याला अपायकारक असते असे नाही. मात्र रासायनिक रंग, प्लॅस्टिकसायझर्स, ऍन्टीऑक्सिडण्ट्स, स्टॅबिलायझर्स आणि धातू असे जैविक आणि अजैविक घटक वापरुन बनवलेलया प्लॅस्टिकच्या पिशव्या घातक असतात.

रासायनिक रंग हे औद्योगिक अझोडाय असतात जे प्लॅस्टिकच्या पिशव्यांना निरनिराळे रंग देण्यासाठी वापरले जातात. यातील काही घटकांमुळे अन्न प्रदुषित होण्याची आणि कर्करोगास आमंत्रण मिळण्याची शक्यता असते. या रसायनांमध्ये आढळणारे कॅडमियम देखील आरोग्यास अत्यंत अपायकारक असते.

प्लॅस्टिसायझर्स हे कमी अस्थिर असणारे जैविक आणि इस्टार्स असतात. ते अन्नपदार्थमध्ये झिरपू शकतात. हे पदार्थदेखील कर्करोगास कारणीभूत ठरतात.

- ऍन्टीऑक्सिडण्ट्स आणि स्टॅबिलाझर्स ही जैविक आणि अजैविक रसायने असतात. जी उत्पादन प्रक्रियेमध्ये औष्णिक विघटनापासून बचाव करतात.

प्लॅस्टिक पिशव्या तयार करताना जर कॅडमिअम किंवा शिसासारखे घटक वापरले असतील तर ते देखील अन्नपदार्थांमध्ये झिरपून अन्न दुषित करतात अणि आरोग्यास अपाय करु शकतात. कॅडमिअम अल्प प्रमाणात जरी शरीरात गेले तरी त्यामुळे उलटया होतात आणि हृदयाचे ठोके वाढू शकतात. शिश्याशी जास्त संपर्क आल्यास मेंदूच्या ऊतींना अपाय होतो.

प्लॅस्टिकच्या पिशव्यामध्ये निर्माण होणा-या समस्या -

प्लॅस्टिक पिशव्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली गेली नाही तर त्या सांडपाण्याच्या मार्गात अडकुन पाणी निचरा करण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करतात.

त्यामुळे परिसर अस्वच्छ होतो आणि पाण्यातून पसरणारे आजार वाढतात. रिसायकल केलेल्या किंवा रंगीत प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये काही रसायने असतात जी जमिनीमध्ये झिरपतात आणि माती व जमिनीतील पाणी दुषित करतात. ज्या युनिट्समध्ये रिसायकलिंगची पर्यावरण स्नेही यंत्रणा नसेल तेथे देखिल या प्रक्रिये दरम्यान तयार होणा-या विषारी धूरामुळे पर्यावरणीय समस्या उभी राहते. ज्या प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये अन्न असते. अशा पिशव्या कच-यात टाकल्यास अनेक प्राणी त्यातील अन्न खाण्याच्या नादात पिशव्या देखील खातात आणि त्यामुळे एक वेगळीच समस्या उभी राहते. प्लॅस्टिकचे जैविक पध्दतीने विघटन होत नाही. शिवाय ते सच्छिद्र नसते. त्यामुळे ते जमिनीत गाडले गेल्यास भुजलस्त्रोतांना पाणी मिळण्यास अडथळा निर्माण होतो. तसेच प्लॅस्टिकची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि त्याच्या विघटनास मदत व्हावी यासाठी प्लॅस्टिकसायझर्स, फिलर्स, फ्लेम रिटार्डटस असे घटक ब-याचदा वापरले जातात. ज्यांचा आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो.

प्लॅस्टिकच्या कचरा व्यवस्थापनासाठी योजना -

प्लॅस्टिकच्या पातळ पिशव्यांना कमी किंमत असते. त्यामुळे त्यांना वेगळे करणे कठीण असते. जर या पिशव्यांची जाडी वाढवली गेली तर त्यांची किंमत वाढेल आणि त्यांच्या वापरावर मर्यादा येईल. प्लॅस्टिक उत्पादन संघटना आणि भंगार वेचणा-या व्यक्ती यांना देखील यामध्ये सहभागी करुन घेता येईल.

महानगरपालिका घन कचरा व्यवस्थापनासाठी इतस्ततः पसरलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, पाकिटे ही खूप मोठी समस्या आहे. अनेक पर्यटन राज्यांनी (जम्मू-काश्मीर, सिक्किम, पश्चिम बंगाल) पर्यटन स्थळांवर प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घातली आहे. हिमाचल प्रदेश राज्याचे कॅबिनेट बैठकीद्वारे एचपी **जैवविघटन न होणारा कचरा (नियमन) कायदा १९९५ च्या अंतर्गत १५/८/२००९ पासून** सा-या राज्यात प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी आणली आहे.

केंद्रसरकारने देखील समित्या आणि टास्क फोर्सची स्थापना करुन देशामध्ये प्लॅस्टिक कच-यामुळे पर्यावरणाला झालेल्या हानीचे मुल्यांकन केले आहे. या समित्या आणि टास्क फोर्सेसनी या मुद्दयावर अभ्यास करुन सुचना केलेल्या आहेत.

पर्यावरण आणि वन मंत्रालयाने रिसायकन्ड प्लॅस्टिक उत्पादन आणि वापर नियमावली, १९९९ तयार केली आणि २००३ मध्ये प्लॅस्टिक पिशव्या आणि डब्यांच्या वापरावर नियत्रंण आणण्यासाठी पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या अंतर्गत त्यामध्ये सुधारणा देखील केल्या आहेत. भारतीय मानक महामंडळाने (ब्युरो ऑफ इंडियन स्टॅण्डर्डस) बायोडिग्रेडेबल (जैविकरित्या विघटन होणा-या) प्लॅस्टिकची १० दर्जामध्ये विभागणी केली आहे.

प्लॅस्टिकला पर्याय -

लोकोपयोगी उपक्रमांद्वारे प्लॅस्टिक किंवा कागदी पिशव्या वापरण्यापेक्षा कापडी किंवा तागाच्या पिशव्यांच्या वापर लोकांमध्ये लोकप्रिय केला पाहिजे. कागदी पिशव्या बनविण्यासाठी झाडे तोडावी लागतात. आणि त्यामुळे त्याचांही वापर एका मर्यादेपर्यंतच करता येतो. वास्तविक केवळ बायोडिग्रेडेबल प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरास अनुमती दिली पाहिजे आणि अशा पिशव्या बनविण्यासाठी संशोधन सुरु आहे.

२. नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील कचरा -

नगरपालिकेतील कचरा हा त्या शहारतील जीवन पध्दती, वस्तीची रचना, औदयोगिक रचना, कचरा संकलन पध्दती यावर अवलंबून असतो. घरातील केरकचरा, सार्वजनिक ठिकाणातील कचरा, बाजारपेठेतील कचरा हे सर्व पदार्थ नगरपालिका किंवा महानगरपालिकांच्या साहाय्याने विशिष्ट ठिकाणी संचयित केलेले असतात. तेथून हे टाकाऊ पदार्थ त्या शहराच्या बाहेरील मोकळया जागेत टाकले जातात. मात्र शहाराच्या बाहेरील मोकळया जागेत गोळा केलेला कचरा ब-याच कालावधीपर्यंत तसाच शिल्लक राहतो किंवा त्याचे विघटनही लवकर होत नाही.

शहरात बहुतांशी रस्त्याच्या कडेला कच-याचे ढीग लागलेले असतात. तसेच शहारातील कचरा कुंडयात नासलेले पदार्थ, टाकाऊ पदार्थ, अन्नघटक केर, त्याज्य पदार्थ, कागद, बाटल्या, चिंध्या असतात हा कचरा वेळच्या वेळी नेला जात नाही. त्यामुळे दुर्गंधी, अनारोग्य, रोगराई, जीवजंतूचा फैलाव होतो. या कचरा कुंडीच्या सान्निध्यात कागद व प्लॅस्टिक गोळा करणारे गरीब लोक, जनावरे, शेळया, कुत्री, डुकरे असतात. शहरात जेवढा कचरा निर्माण होतो तेवढया कच-याची विल्हेवाट प्रशासन लावू शकत नसल्यामुळे गल्लीतील कचरा कुंडयातून दुर्गंधी व रोगराई पसरते.

३. शेतातील कचरा -

शेतातून विविध प्रकारची पिके घेतली जातात या पिकामधील अन्न काढून उरलेल्या भागाचा समावेश कचऱ्यात केला जातो. ज्वारी, बाजरी, ऊस, कडधान्याची पिके, कापूस, तांदूळ, केळी यासारख्या पिकांची पाने, मुळे, खोड, तोटया इत्यादीमुळे शेतात कचरा प्रदूषण घडून येते.शेतातील ब-याच कच-याचे जमिनीत काही ठराविक कालावधीत विघटन होते. पंरतु उसाची खोडे, पाने आणि केळीची खोडं व पाने यांचे मात्र ब-याच दिवसांपर्यत विघटन होत नाही. त्यामुळे शेतात त्याचा अडथळा निर्माण होतो.अन्नधान्य उत्पादनातील टाकाऊ पदार्थ, भूसकट, कूस, काड, कोंडा, मृत जनावरे, खते व पिकांचे अवशेष यांचा समावेश शेतीतील कच-यात होतो. शेतीतील त्याज्य पदार्थ व इतर क्षेत्रातील त्याज्य पदार्थ यामध्ये फरक असतो. शेतीमालावर प्रक्रिया करणारे उदयोगधंदे, गिरण्या, साखर कारखाने, चहा, तंबाखू, उत्पादक कारखाने इत्यादी मधून भारतात सुमारे ६० कोटी टन टाकाऊ पदार्थ निर्माण होतात.

४. कारखान्यातील कचरा -

वाढत्या औदयोगिकरणामुळे विविध उदयोगधंदयांतून वेगवेगळया प्रकारचे टाकाऊ पदार्थ निर्माण होत आहेत. कारखान्यातील कच-यामध्ये अनेक विषारी घटक असतात. शिसे, तांबे, जस्त, निकेल, आर्सेनिक, कॅडमिअम असे जड धातूही असतात. त्यांचा जमिनीवर दूषित परिणाम होतो. कारखान्यातील कच्च्या मालावर प्रक्रिया करताना त्या वस्तूचे उत्पादन, माल व पॅकिंग या टप्प्यामध्ये टाकाऊ पदार्थाची निर्मिती होते. प्रत्येक कारखान्यामधून वेगवेगळया टाकाऊ पदार्थाचा कचरा निर्माण होते असतो. धातूच्या कारखान्यातून धातू, रसायने निर्माण होतात. त्यामध्ये विषारी व त्याज्य घटकही असू शकतात.

उदयोगधंदयातील घन कच-यामध्ये धातू, रसायने, राख, वेष्टने, इ. चा समावेश होतो. द्रवरुप कच-यामध्ये विविध तेले, रंग, सांडपाणी, रसायनासारखे द्रवरुप टाकाऊ पदार्थ व अनेक प्रकारची इंधने यांचा समावेश होतो. तर वायुरुप कच-यामध्ये

रसायनांच्या वाफा, कणरुप टाकाऊ पदार्थ, ज्वलनशील पदार्थाच्या ज्वलनामुळे कोळसा आणि इतर वायुरुप टाकाऊ पदार्थाचा समावेश होतो.

५. जीववैद्यकीय कचरा -

जीववैद्यकीय क्षेत्रामुळे निर्माण होणारा कचरा फारच धोकादायक असतो. पेशन्टचा जीव वाचवताना निर्माण झालेला कचरा इतरांसाठी मात्र जीवघेणा ठरु शकतो. वैद्यकीय कचरा हा बायोहजार्ड्स या कॅटेगिरीतला, अतिसंवेदनशील किंवा सर्वांसाठीच कटकटीची गोष्ट आहे. हा बायोमेडिकल वेस्ट कचरा टाकायचा कोठे ? हा कळीचा प्रश्न पूर्वी प्रत्येक डॉक्टरांपुढे आ वासून उभा असायचा.प्रत्येक डॉक्टरांकडे दिवसभरात कितीतरी पेशन्ट उपचार घेण्यासाठी येत असतात अशा वेळी एकदाच वापरुन टाकून दिलेल्या निडल्स, इंजेक्शनच्या सिरिजेस, सलाईनच्या बाटल्या व नळया, स्कॉलपेल्स, इन्ट्राकॅथेर, सुया, बॅंडेज, जखमा साफ केल्यानंतर साचलेले कापसाचे बोळे, जुन्या ड्रेसिंगच्या पट्टया, चादरी, हातमोजे तसेच धातू, काच, रबर व प्लॅस्टिकच्या वस्तू याशिवाय जुनी औषधे, फिनाईल व इतर जंतुनाशके आणि त्यांची पात्रे या सर्वांचा समावेश जीववैद्यकीय कच-यामध्ये होतो.

६. ई- कचरा-

ई- कच-याला इलेक्ट्रॉनिक कचरा असेही म्हणतात. सध्या ई-कचरा ही एक मोठी समस्या निर्माण झाली असून संपूर्ण देशाचा विचार केला तर महाराष्ट्रात सर्वाधिक भयानक स्थिती आहे. कारण महाराष्ट्रात प्रत्येक मिनिटाला पर्यावरणासाठी घातक ठरणा-या ई-कच-याची मोठया प्रमाणात भर पडत आहे. राज्यात दरवर्षी २० हजार २७० टन ई-कचरा तयार होतो. त्यापैकी सर्वात जास्त म्हणजेच ११ हजार १७ टन कच-याची निर्मिती केवळ मुंबईत होते.

ई-कच-यामध्ये निरुपयोगी असलेली इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे, कम्प्युटर, किबोड्स, पिंटर्स, मोबाईल, त्यांचे सुटे भाग, वीज जोडणीसाठी वापरण्यात येणारी उपकरणे, सर्व प्रकारची इलेक्ट्रीकल व वैद्यकीय उपकरणे, बॅटरीवर चालणारी खेळणी, टाकाऊ घरगुती उपकरणे या सगळयांचा समावेश होतो.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"आष्टी तालुक्यातील शिराळ गावातील सामाजिक समस्यांचा अभ्यास"

संशोधक

शिंदे ऋषिकेश महेंद्र

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that shri. **शिंदे ऋषिकेश महेंद्र** of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: "आष्टी तालुक्यातील शिराळ गावातील सामाजिक समस्यांचा अभ्यास" as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022.

Paper No.	XII & XVI	Oral	Total
Out of	80	20	100
Mark obtained	63	15	78

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/5/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. कांडेकर सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा. भास्कर चव्हाण, प्रा. यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक 30/11 २०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
शिंदे ऋषिकेश महेंद्र

प्रकरण पहिले

प्रस्तावना

1) प्रस्तावना :-

शिराळ, ता. आष्टी, जि. बीड या गावातील सामाजिक समस्यांचा अभ्यास संशोधकाने केला आहे. मौजे शिराळ या गावाची सद्यस्थिती, रुढी, परंरपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा, पाणी, शेती, आरोग्य, शिक्षण तसेच इतर सर्व मुलभूत गोष्टीचा अभ्यास संशोधकाने केला आहे. शिराळ गावाला सांस्कृतीक वारसा लाभल्यामुळे गावामध्ये सर्व प्रकारचे सण समारंभ साजरे केले जातात. त्यामध्ये राष्ट्रीय सण देखील साजरे केले जातात. शिराळ गाव हे सर्व बाजुने सुसज्ज असल्याचे दिसून येते. गावामध्ये जुन्या विचारांना चांगले महत्व दिले जाते.

2) शिराळ गावचा परिचयः-

शिराळ गाव आष्टी शहरापासुन 15 की.मी. अंतरावर आहे. हे गाव ता. आष्टी, जि. बीड मध्ये आहे. गावची स्थिती आगदी चांगल्या प्रकारची आहे.

3) शिराळ गावची एकुण संख्याः- ह्या गावाची लोकसंख्या ही साधारणतः 6000 पर्यंत आहे.

4) सद्यस्थितीः-

या गावामध्ये लोकांचा व्यवसाय हा शेती आहे. तरी लोकांचे आर्थिक जीवन स्थिती चांगल्या प्रकारची आहे. लोकांनमध्ये स्वच्छते विषयी गैरसमज की अज्ञानता किंवा आवश्यकता तेथील लोक मानत नाहीत. संशोधन कर्त्यांनी ज्यावेळेस गावाची पाहाणी केली त्यावेळेस त्याला त्या गावातील समस्या दिसुन आल्या तसे पाहिले तर गावामध्ये आनेक प्रकारच्या समस्या आसल्याचे दिसुन आले.

5) गावातील समस्याः-

खया आर्थाने गावामध्ये आनेक प्रकारच्या समस्या आहेत. त्या पुढील अपंग व्यक्तींच्या समस्या, वृध्दांच्या समस्या, शेतकयांच्या समस्या, बालकांच्या समस्या,

महिलांच्या आरोग्यविषयक समस्या, गावातील लहान मुलांच्या शिक्षणा बद्दलच्या समस्य, गावातील स्वच्छतागृहाच्या समस्या, गावातील राजकिय समस्या, गावातील पीण्याच्या पाण्याच्या समस्या, गावातील जनावरांच्या तपासणी आणि चारा व पाण्याच्या समस्या, गावातील दलित वस्तींच्या समस्या, गावातील रस्त्या विषयीच्या समस्या ,गावातील कामगारांच्या समस्या ,गावातील सुशिक्षीत बेकारांच्या समस्या, गावामध्ये चोया करण्याचे प्रमाण खुपच मोठ्याप्रमाणात आहे. ही देखिल गावाची समस्याच आहे. अशा गावाच्या एकना आनेक समस्या आपणाला सांगता येतील.

6) गावातील व्यक्तीच्या आरोग्य विषयक माहिती :-

गावातील व्यक्तीचे आरोग्य चांगल्या प्रकारे सदृढ आसल्याने दिसुन येते कारण गावाचा सर्वांगीण विकास चांगल्याप्रकारे आसल्याने गावामध्ये काही प्रमाणातच आजारी व्यक्तींची समस्या दिसुन येते तेही पाण्या पासुनच झालेल्या रोगांचे रुग्ण आढळुन येतात त्यामध्ये कावीळ डायरी या, सर्व काही दुषित पाण्याच्या प्रभावामुळेच महिला, लहान मुलांचे प्रमाण काही प्रमाणात रुग्ण आढळतात. गावालील हे आजार देखील कमी होतांना दिसुन येतात. कारण गावामध्ये महिण्यातुन पंधरा दिवसाला आरोग्य विभागाकडुन मोबाईल व्हॅन गावातील व्यक्तींचे आजार आटोक्यात आल्याचे दिसुन येते.

7) शैक्षणीक माहिती:-

गावामध्ये इत्ता पहिली ते चौथी पर्यंत वर्ग आसुन त्यामध्ये अंगणवाडीचा देखील सहभाग आहे.

8) गावातील महिलांच्या विकासात येणारे आडथळे:-

ग्रामिण भागातील महिला ही अज्ञानी असल्याने तीचा विकास कमी झाल्याचे दिसुन येते ग्रामिण भागातील महिला ही फक्त मुले आणि चुल याकडेच लक्ष देताना आपणाला पहावयास दिसुन यायचे. पण आता काळ बददला आहे. महिला देखील

पुरुषांच्या खांदयाला खांदा लावून काम करत असतांना आपणाला दिसुन येतात. पण ते फक्त सुशिक्षित महिलांचे प्रमाण आहे. आणि ग्रामिण भागातील महिला ही शेतीचे काम करते. आणि भारतीय संस्कृती पुरुषप्रधान असल्याकारणाने ग्रामिण भागातील महिला ही पुरुषांच्या दबावाखाली असल्याची दिसून येते. ग्रामिण भागातील महिला कुटीरोदयोग, शिवणकाम, साडी डिझाईन, शोभेच्या वस्तू बनवून शहरात नेऊन विकतात. पण पैशाचा कारभार सर्व पुरुषांकडे असल्यामुळे महिलेला स्वतःचा विकास करण्यात अडथळा आलेला आपणाला पहावयास येतो. ग्रामिण भागात आज महिला बचत गटामार्फत अनेक प्रकारचे लहान सहान व्यवसाय चालवतांना आपणाला पहावयास मिळतात.

9) गावातील राजकारण परिस्थितीः-

प्रत्येक गावातील राजकारण खेळी खेळण्याची पध्दत हे वेगळया पध्दतीची असते. शिराळ गावामध्ये देखील अगदी तसाच प्रकार आहे. गावामध्ये राजकारणावरुन वेगवेगळे गट पडलेले आपणाला पहावयास येतात. गावामध्ये राजकारणामुळे एकात्मतेची भावना कुठेतरी लोप पावत असताना आपणाला पहावयास दिसून येते. गावाची महिला सरपंच असली तरीदेखील गावचे सर्व कारभार पुरुष व्यक्तीच पहातो. संविधानाने महिला आणि पुरुषांना समान अधिकार दिला असुनदेखली तो अधिकार सत्यात उतरवतांना दिसून येत नाही. हया सर्वाला जबाबदार कोण समाज, महिला, पुरुष, कि पिढयानंपिढया चालत आलेली पुरुषप्रधान संस्कृती हे अजुन देखील कळु शकले नाही.

10) गावातील धार्मिक स्थितीः-

गावातील जनता ही अज्ञानी आणि भोळी असल्याने धर्मासारखी संकल्पना मानतांना आपणाला पहावयास दिसून येतात. तसे पाहिले तर गावात जातीयता हे प्रमाण खुपच कमी प्रमाणात दिसून येते. गावातील सर्व जनता गुण्यागोविंदाने राहते

सर्व धर्म समभाव ही संकल्पना गावामध्ये जास्त प्रमाणात दिसून येते, खरे पाहिले तर धर्म कोणता का असेना जागामध्ये फक्त दोनच जाती अस्तित्वात दिसून येतात त्या म्हणजे एक पुरुष तर दुसरी स्त्री होय.

11) गावातील अंधश्रध्दाः-

गावामध्ये धर्मभोळे लोक आढळून येतात. असे म्हणतात की श्रध्दा असावी पण अंधश्रध्दा नसावी. संतांनी सांगितलेले आहे की अंधश्रध्देपासून दूर राहिले पाहिले जे पण आपणाला सर्व हयाच्या उलटच झाल्याचे दिसून येते ग्रामिण भागातील महिलांमध्ये अंधश्रध्देचे प्रमाण खूपच मोठया प्रमाणात व्रत वैकल्या करते. मुलगा व्हावा म्हणुन देवाला नवस करते. आणि नवस जर पुर्ण झाला तर पशुंची बळी देतांना दिसून येते. यावरुन संत कबीर असे म्हणतात की जर देवाला नवस करुन जर पुत्र होत असते तर मग पतीचे काय काम आहे. महिला अज्ञानी व भोळी असल्याने अशा अंधश्रध्देच्या कल्पनेला बळी पडतांना आपणाला दिसून येते. घरामध्ये कोणती व्यक्ती आजारी असेल किंवा लहानपणा पासून मुल आजारी पडत असेल तर स्वतःच्या मनशांतीसाठी त्या लहान मुलाला लहानपणीच देवीला पोतराज म्हणून सोडण्यात येते. आता जरी काळ बदललेला असला तरी आताच्या स्थितीला सुशिक्षित व्यक्तीमध्ये देखील अंधश्रध्देचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात दिसून येते. सुशिक्षित लोकदेखील बुवाच्या भविष्यवाणीवर विश्वास ठेवतांना आपणाला पहावयास मिळतात. तसेच राजकियनेते मंडळींचा देखील कल बुवाच्या भविष्यवाणीवर असल्याचे दिसुन येते. हया अंधश्रध्देमुळे समाज विकासाच्या मार्गाने न जाता आधोगती कडे जाताना दिसून येतो.

12) गावातील दलित वस्तींच्या समस्याः-

दलित वस्तीमध्ये अनेक प्रकारच्या समस्या असल्याचे दिसून येते. त्यामध्ये अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची समस्या, स्वच्छता गृहाची समस्या, राहण्यास

चांगल्याप्रकारचे घर नसणे, गावामध्ये पक्या रोडचे प्रमाण काही प्रमाणात आहे तर काही प्रमाणात नाही, त्या सोबतच दलित वस्तीमध्ये आरोग्याच्या समस्या मोठया प्रमाणात आहेत. दलित वस्तीमध्ये धर्म भोळे आणि अंधश्रध्दाळू लोक मोठया प्रमाणात दिसून येतात. कारण दलित वस्ती मधील महिलांचे निरक्षरतेचे प्रमाण खूपच मोठया प्रमाणात आहे. अशा एक ना अनेक दलित वस्तीच्या समस्या आपणाला पहावयास मिळतात.

13) गावातील व्यक्तींचा मुख्य आणि जोड व्यवसाय :-

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने ग्रामिण भागातील व्यक्तींचा मुख्य व्यवसाय हा शेती असून शेतीला जोड व्यवसाय म्हणून अनेक प्रकारचे जोड व्यवसाय केले जातात. त्यामध्ये प्रमुख दुग्ध व्यवसाय आणि कुक्कुट पालन (पोलट्री) हया सोबतच लहान सहान उदयोग ग्राणिम भागातील लोक करतांना आपणाला दिसून येतात. त्या सोबतच महिलांचा देखील कुटुंबाला चांगला हातभार लागतो. महिला देखील लहान सहान उदयोग करतात. शोभेच्या वस्तु बनवणे शिलाईकाम, खडू बनवणे, पापड तयार करणे, अशा अनेक प्रकारचे जोड व्यवसाय करतांना दिसून येतात.

14) गावातील व्यक्तींची आर्थिक स्थिती :-

गावातील व्यक्तींची आर्थिक परिस्थिती एकंदरीतच चांगल्या प्रकारची असतांना दिसून येते कारण गावाचा मुख्य व्यवसाय शेती असून त्याला जोड व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय आणि कुक्कुट पालन करत असल्याने आणि महिलांच्या हाताला देखील लहान सहान व्यवसाय असल्याने त्यांची देखील मदत कुटुंबाला चांगल्याप्रकारे होतांना आपणाला दिसून येते. त्यामुळे गावातील व्यक्तींची आर्थिक स्थिती चांगल्याप्रकारची आहे.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"शेतकरी आत्महत्या एक सामाजिक समस्या"

संशोधक

शिंदे सुप्रिया संतराम

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that शिंदे सुप्रिया संतराम of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: "शेतकरी आत्महत्या एक सामाजिक समस्या" as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022.

Paper No.	XII & XVI	Oral	Total
Out of	80	20	100
Mark obtained	55	15	70

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/8/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्याम सांगळे आणि श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. वाघ सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. पटेल एम.आर., डॉ.शैलजा कुचेकर यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक ३०/११/२०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
शिंदे सुप्रिया संतराम

प्रकरण पहिले
प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

भारतातील शेतीक्षेत्राचा अभ्यास करत असतांना शेती क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे म्हटले असुन भारतातील ७०% लोक शेती क्षेत्रात गुंतलेले असुन शेती हा प्रमुख व्यवसाय करतात म्हणुन महात्मा गांधीजींच्या शब्दात भारतीय शेती ही लोकांच्या उपजिविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ५७% इतका आहे.म्हणुन असे ही म्हणटले जाते की, भारतातील शेती हा अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे.शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र, सेवा क्षेत्र ही भारतीय अर्थव्यवस्थेची अनुक्रमे प्राथमिक, द्वितीय, तृतीय क्षेत्र अशी प्रमुख क्षेत्रे आहेत. औद्योगिक विकास आणि शेती विकास परस्परांवर अवलंबित गोष्टी असतात. शेती क्षेत्रानुसार पुरवठा होणा-या विविध वस्तुंमुळे उद्योगसंस्था विकसीत होत असतात.ऊस, कापुस, तेलबिया, औषधी वनस्पती, तंबाखु, रबर, ताग, जलसंपत्ती, बांबू, इ. कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर साखर, कापड, औषधी उद्योग, रबरी वस्तु कारखाने, विशिष्ट, तागाच्या पिशव्या अशा अनेक कारखाण्यांची प्रमती या कच्च्या मालाच्या पुरवठ्यांवर अवलंबून असते म्हणुन मोठमोठ्या उद्योगधंद्यासाठी शेती क्षेत्र अत्यंत महत्वाचे क्षेत्र मानले जाते.अविकसीत देशांच्या बाबतीत शेती क्षेत्रात मिळणा-या उत्पादनाचे महत्व हे आंतराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने महत्वाचे आहे.अन्नधान्याची निर्यात करुन देशाला परकीय चलपन मिळवता येते.या परकीय चलनाचा उपयोग यंत्रसामग्री तंत्रज्ञान यांच्या खरेदीसाठी केला जातो. चहा, साखर, तेलबिया, कापुस, तंबाखु, यांच्या निर्यात, करण्याचे प्रमाण आजही चांगल्या प्रकारचे आहे. मुळ शेतमाल आणि त्यांच्यापासुन बनवलेली उत्पादने यांचा निर्यातीत ७०% इतका आहे.

देशाच्या आर्थिक नियोजन करतांनाही शेती क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे.शेती क्षेत्राची प्रगती होण्यावर वाहतुक व्यवस्था, साठवणगृहे, यांच्या

विकासावर यांची प्रगती अवलंबुन असते.देशाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करत असतांना देशाची अर्थव्यवस्था विकसनशील अवस्थेतून विकसीत अर्थव्यवस्थेकडे चालली आहे. परंतू देशाच्या अर्थव्यवस्थेच्या अभ्यासानंतर खरेतर प्रत्येक राज्यांचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते. परंतु प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यास करत असतांना शेतकरी आत्महत्या या विषयाचा अभ्यास करावयाचा आहे.संपुर्ण देशाचा अभ्यास करत असतांना सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या कोणत्या राज्यात झालेल्या आहेत. त्यानंतर कोणत्या राज्यांचा नंबर लागतो याचा सविस्तर अभ्यास करायचा आहे. म्हणुन प्रथम क्रमांकावर आत्महत्या झालेल्या राज्यांच्या बाबतीत आंधप्रदेश या राज्यात सर्वाधिक आत्महत्या झालेल्या आहेत. तसेच दुस-या क्रमांकावर तामिळनाडु या राज्याचा नंबर लागतो.आणि त्यानंतर तिस-या क्रमाकांवर आपल्या महाराष्ट्राचा आत्महत्येच्या बाबत नंबर लागतो. महाराष्ट्राचा अभ्यास करत असतांना सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या यवतमाळ (विदर्भ) या भागात झालेल्या आहेत. कारण या भागात पुर्णपणे शेतकऱ्यांच्या सुख सोईचा विकास झालेला नाही. या भागात पावसाचे प्रमाणे कमी आहे. त्यानंतर महाराष्ट्राचा या विषयाचा अभ्यास करत असतांना बीड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत.

१.२ विषय निवडीचा हेतुः-

प्रस्तुत संशोधन विषयासाठी संशोधनासाठी विषय निवडण्यासाठी शेतकरी आत्महत्या हा विषय डोळ्यांसमोर आला. नंतर मी खेडेगावातील रहिवासी असुन त्या शेतकऱ्यांच्या वेदना मनातील गोष्टी ह्या समाजापर्यंत पोहचविण्यासाठी व कॉलेज पातळीवर पोहचविण्यासाठी मी बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या हा विषयाचा अभ्यास संशोधनसाठी चालु केला. मग मी स्वतः शेतक-यांचा घरी जावुन स्वतः मुलाखती घेऊन त्यांच्या परिस्थितीचा अभ्यास करुन ह्या संशोधन प्रबंधात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. खरे तर शेतकरी आत्महत्या होण्याचे नेमके कारण

कर्ज बाजारीपणाच आहे का? हा प्रश्न मला पडल्यानंतर मी संपुर्ण शेतकरी आत्महत्या यांचा अभ्यास करत असतांना माझ्या माहितीप्रमाणे बीड जिल्ह्यातील शेतकरी आात्महत्येचे प्रमाण म्हणजेच शेतकरी आत्महत्या होण्याचे प्रमाण म्हणजे अनैतीक संबंध २८% व कौटुंबिक कलह तर २०% शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कर्ज बाजारीपणा ४७% व समाज्याकडून होणारा ५% त्रास या गोष्टींमुळे आत्महत्या झालेल्या आहेत असे मी माझ्या मुलाखतीच्या अभ्यासकरुन निष्कर्ष काढले आहेत. म्हणुन हा विषय संशोधनासाठी निवडून ३०% आत्महत्याचा अभ्यास केला आहे.

१.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये/हेतुः-

१. बीड जिल्ह्यातील शेतीची रचना व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांचा अभ्यास करणे.

२. शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज आणि आत्महत्या यांचा तुलनात्मक अभ्यास करणे

३. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडुन निधी मिळालेला आहे किंवा नाही यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

४. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

अशाप्रकारे वरील उद्दिष्ट्ये समोर ठेवुन प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

१.४ संशोधनाची गृहितकेः-

प्रस्तुत संशोधनसाठी बीड जिल्ह्याचा अभ्यास करत असतांना या जिल्ह्यात शेतकरी मोठ्या प्रमाणात आहेत म्हणुन शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणुन या बीड जिल्ह्याची ओळख आहे आणि याच जिल्ह्यात आत्महत्या झालेल्या आहेत.

१. शेती क्षेत्रात केलेल्या उत्पादनात सातत्यता नाही.

२. बीड जिल्ह्यातील शेतक-यांवर कर्जबाजारीपणाचा डोंगर मोठ्या प्रमाणात आहे.

३. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडत असल्यामुळे शेतकरी कर्ज परतफेड करण्यास असमर्थ ठरला आहे.

४. अहमदनगर जिल्ह्यातील शेतक-यांनी आत्महत्या मोठ्या प्रमाणावर केलेल्या आहेत.

१.५ माहितीचे संकलनः-

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी आकडेवारी प्राथमिक व द्वितीयक माहिती स्त्रोताच्या आधारे संकलीत केली आहे. प्राथमिक माहितीमध्ये बीड जिल्ह्यातील एकुण शेतकरी आत्महत्यापैकी २०% इतक्या आत्महत्याग्रस्त (कुटुंबाची माहिती) प्रश्नावलीच्या आधारे व प्रत्येक मुलाखती घेऊन गोळा करण्यात आलेली आहे तसेच द्वितीयक माहितीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची शेती आणि शेतकरी आत्महत्या संदर्भातील पुस्तके, मासिके वर्तमानपत्रे, लेखांचा आधार घेऊन विषय पुर्ण करण्यात आलेला आहे. तसेच जिल्हा प्रशासकीय कार्यालयातुन त्या संदर्भातील विविध प्रकारची माहितीचे व शेतकरी आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीची यादी घेऊन प्रस्तुत संशोधन विषय पुर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे आणि काही सद्यस्थितीतील माहिती व आकडेवारी इंटरनेटद्वारे उपलब्ध करुन अभ्यास केला आहे.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य"

संशोधक

सुद्रिक वैभव बाबासाहेब

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that Shri. सुद्रिक वैभव बाबासाहेब of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: "महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य" as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022.

Paper No.	XII & XVI	Oral	Total
Out of	80	20	100
Mark obtained	64	15	79

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/5/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्याम सांगळे आणि श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. वाघ सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा.वाघुले एस.एन., प्रा. यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक ३/५/२०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
सुद्रिक वैभव बाबासाहेब

!! अनुक्रमणिका !!

अ. क्र.	आशय	पृष्ठ क्रमांक
१	प्रास्तावना (Introduction)	१
२	जन्म व शिक्षण	५
३	जनसेवेची शपथ	६
४	मुलींची पहिली शाळा	९
५	अस्पृश्यांची पहिली शाळा	११
६	विधवाविवाह व अनाथ बालकाश्रम	१२
७	परशुरामाची फजीती	१३
८	सत्यशोधक समाजाची स्थापना	१५
९	चिपळूणकर आणि फुले	१७
१०	शेतकरी मजुर चळवळी	२०
११	कै टिळकांना दिलेली मदत	२३
१२	सक्तीचे प्राथमिक शिक्षण	२५
१३	सन १८७७ चा भयंकर दुष्काळ	२७
१४	जोतीरावांचे राजकिय क्षेत्रातील कार्य	२८
१५	बडोदा नरेश आणि फुले	२९
१६	महात्मा पदवी अर्पण	३२
१७	सार्वजनिक सत्यधर्म	३३
१८	अखेरचा अध्याय	३४
१९	समारोप	३६

प्रस्तावना

महाराष्ट्रातील समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाजसुधारक आणि विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत. सावता माळी समाजातील गोविंदराव शेटिबा फुले आणि चिमणाबाई या दांपत्याचे जोतीराव हे दुसरे अपत्य. मूळचे गोऱ्हे हे उपनाव बदलून फुलांच्या धंद्यामुळे फुले हे नाव पडले.

जोतीरावांच्या लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांच्या पालनपोषणाचा सर्व भार वडिलांवरच पडला. जोतीरावांना इंग्रजी शिक्षणाचा वेध लागला होता. त्यात अनेक अडचणी आल्या, तरी शालान्त परीक्षेइतके इंग्रजी शिक्षण त्यांनी पुरे केले. इंग्रजीतील उच्च दर्जाचे ग्रंथ समजण्याची पात्रता तसेच इंग्रजीत लेखन करण्याची क्षमताही त्यांनी प्राप्त करून घेतली. बौद्धिक शिक्षणाबरोबरच शरीरशिक्षणही घेतले.

लहूजीबुवा मांग यांच्यापाशी दांडपट्टा शिकले, मल्लविद्या संपादन केली. शिक्षण पुरे केल्यावर १८४० मध्ये जोतीरावांचा विवाह सातारा जिल्ह्यातील शिरवळपासून ५ किमी.वर असलेल्या नायगाव येथील खंडोजी नेवसे पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला.

सावित्रीबाईचे शिक्षण जोतीरावांनीच पुरे केले. त्या स्वयंस्फूर्तीने जोतीरावांच्या समाजसुधारणेच्या आणि लोकशिक्षणाच्या कार्यात जन्मभर सहभागी झाल्या. शालेय शिक्षण चालू असतानाजोतीरावांनी अनेक मित्र मिळविले.सदाशिव बल्लाळ गोवंडे, सखाराम यशवंत परांजपे, मोरोपंत विठ्ठल वाळवेकर इ. मित्र शेवटपर्यंत जोतीरावांना सामाजिक सुधारणेच्या चळवळीतही सहकारी म्हणून चिकटून राहिले. जगाचा, पश्चिमी देशांचा व विशेषतः भारताचा प्राचीन, अर्वाचीन इतिहास त्यांनी इंग्रजीमधून वाचला आणि सखोलपणे त्यावर मनन केले. अमेरिकन राज्यक्रांतीच्या इतिहासाची त्यांच्या मनावर खोल छाप पडली.*द राइट्स ऑफ मॅन* (१७९१-९२) या टॉमस पेन (१७३७-१८०९) याच्या ग्रंथाची त्यांनी अनेक पारायणे केली; मानवी समतेचा आणि स्वातंत्र्याचा ध्येयवाद आत्मसात केला. या तत्त्वांच्या आधारे ते भारतीय समाजाचे, विशेषतः हिंदू समाजाचे, उत्कृष्ट चिंतन करू शकले. संस्कृत ग्रंथही त्यांनी वाचले.

वेद, स्मृती, पुराणे यांच्यातील कथांचा अभ्यास केला. अश्वघोषाच्या नावावर प्रसिद्ध असलेले *वज्रसूची* हे उपनिषद त्यांना फार आवडले. त्यात अनेक ब्राह्मण ऋषिमुनींचे कूळ हे ब्राह्मण नव्हते असे सांगितले आहे. जातिभेद हा खोटा आहे, हे तत्त्व स्पष्ट रीतीने मांडले आहे. कबीराच्या *बीजक* ग्रंथातील 'विप्रमति' या प्रकरणाचा त्यांच्या विचारसरणीवर प्रभाव पडला. त्यांनी एका ठिकाणी स्वतःचा'कबीर साधूच्या पंथाचा' असा निर्देश केला आहे. अशा चिंतन मननाने त्यांची भारतीय समाजक्रांतीची विचारसरणी तयार झाली. जगातील क्रांतिकारकांच्या नेत्यांमध्ये शोषित समाजातून पुढे आलेले यांच्यासारखे नेते फार थोडे, कार्ल मार्क्स, लेनिन इ. मध्यमवर्गीय नेते कामगारक्रांतीचे पुरस्कर्ते झाले. फुले, आंबेडकर हे शोषित समाजातून निर्माण झाले. हे त्यांचे वैशिष्ट्य होय.

जोतीरावांनी आपल्या विचारांचा एक सुबोध व सुंदर, सूत्रबद्ध सारांश सांगितला आहे - ''विद्येविना मति गेली; मतीविना नीति गेली;नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेले वित्ताविना शूद्र खचले;इतके अनर्थ एका अविद्येने केले.'' त्यांनी हा निष्कर्ष शेतकऱ्याचा आसूड (१८८३) मध्ये प्रारंभी सांगितला आहे. त्यांच्या सगळ्या सत्यशोधक चळवळीचा भावार्थ यात आला आहे. प्रचलित हिंदू धर्मसंस्था, त्यावर आधारलेली हिंदूंची समाजरचना व ब्रिटिशांची शासनसंस्था व सर्वांचा समुच्चित

परिणाम म्हणजे शूद्र शेतकऱ्यांचे आणि दलितांचे सध्या दिसणारे अपार दैन्य होय; या दैन्यावस्थेतून बाहेर पडण्याकरिता त्यांनी लोकशिक्षण हाच मुख्य उपाय होय, असे ठरविले. अज्ञानग्रस्त शूद्र, अतिशूद्र जसे ब्राह्मणादी वरिष्ठ वर्गाच्या दास्यात खितपत पडले आहेत त्याचप्रमाणे स्त्री जातदेखील पुरूष वर्गाच्या दास्यात युगानुयुगे सापडली आहे; हे लक्षात घेऊन जोतीरावांनी मुलींसाठी एक शाळा स्थापन केली (१८४८). त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांनी याच शाळेत अध्यापनाचे कार्य सुरू केले. ब्राह्मण समाजासह सर्वच समाज स्त्री शिक्षणाच्या विरोधी होता. जातिभेदाची आणि पवित्र रूढींची बंधने अंधश्रद्धेने पाळीत होता. त्यास फार थोडे अपवाद होते.

सुधारकांना स्वतःचे कुटुंब, स्वतःची जात-जमात आणि एकंदरीत सर्व समाज विरोध करीत आणि वाळीत टाकीत. जातिबहिष्काराचे असहाय असे दडपण क्रियावान सुधारकांना सोसावे लागले; जिवलग नातेवाईकांचा विरोध होत असे. उदा., जोतीरावांचे वडील गोविंदराव यांनी मुलगा व सून यांना घराबाहेर काढले आणि खुद्द माळी समाजाने नाना प्रकारे अवहेलना चालू केली. या सर्व प्रतिकूल परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन जोतीराव व सावित्रीबाई यांची समाजसुधारणेच्या क्षेत्रात आगेकूच सुरूच राहिली. नंतर रास्ता पेठेत व वेताळ पेठेत आणखी दोन शाळा काढल्या (१८५१).

अस्पृश्यांसाठी शाळा काढली. या त्यांच्या प्रयत्नांना तत्कालीन मोठमोठ्या विचारवंत समाजसुधारकांचा आणि राज्यकर्त्यांचाही पाठिंबा मिळत राहिला. १८५२ मध्ये सरकारी विद्या खात्याकडून मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली जोतीरावांच्या शिक्षणकार्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

त्यावेळचे सर्वच भारतीय समाजसुधारक हे स्त्रियांची दास्यातून आणि दुःस्थितीतून सोडवणूक करण्याकरता प्रयत्नशील झाले होते. हिंदूंच्या उच्च जातींमध्ये विधवाविवाह निषिद्ध मानला होता. बालपणी आणि वारंवार उद्भवणाऱ्या प्राणघातक साथींच्या रोगांमुळे पतिनिधन होऊन तरूणपणीच वैधव्य आलेल्यांची संख्या मोठी होती. केशवपन केल्याशिवाय विधवा ही अपवित्र मानली जात होती. समाजाची आणि कुटुंबाची त्यांच्यावर करडी नजर असे.

बाल व तरुण विधवांचा प्रश्न सोडविण्याकरिता पुनर्विवाहाची चळवळ सुधारकांनी सुरू केली. या चळवळीला जोतीरावांचा पूर्ण सक्रिय पाठिंबा होता. तारुण्यकाली स्वाभाविकपणे वासनेला बळी पडलेल्याविधवांची फार विटंबना होत होती. गर्भपाताचे प्रयत्न होत, जन्मलेल्या बालकांची हत्याही होई. त्यांना संरक्षण देण्यासाठी फुल्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली (१८६३). या गृहात अशा स्त्रियांच्या बाळंतपणाचीही सोय केली होती. जोतीरावांनी पुढे जो यशवंत नावाचा मुलगा दत्तक म्हणून घेतला तो काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेचा मुलगा होता. विधवांच्या केशवपनाची चाल बंद व्हावी म्हणून त्यांनी चळवळ उभी केली व त्याकरता न्हाव्यांचा संपही घडवून आणला.

अस्पृश्य व दलितांच्या प्रश्नालाही त्यांनी तितक्याच मनस्वीपणेचालना दिली. अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ही एक अत्यंत गंभीर अशी कायमची समस्या लक्षात घेऊन आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला केला.

महाराष्ट्रातील तत्कालीन भिन्न मतांच्या व विचारसरणींच्या समाजसुधारकांच्या विविध कार्यक्रमांमध्ये जोतीरावांचा सहभाग नेहमीच असे. उदा., ⇨*आर्य समाजा*चे संस्थापक स्वामी ⇨ *दयानंद सरस्वती* (१८२४-८३) यांची पुणे येथे ⇨ *महादेव गोविंद रानडे* (१८४२-१९१०) प्रभृती सुधारकांनी मिरवणूक काढली. त्याचे पुढारीपण जोतीरावांनी केले. उलट जीर्ण मतवादी रूढीनिष्ठांनी या मिरवणुकीची थट्टा व विडंबन करण्याकरिता गर्दभानंदांची दिंडी सुरू केली (१८७५).

फुले हे १८७६-८२ या कालावधीत पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. समाजाच्या मौलिक परिवर्तनाकरिता समाजरचनेतील धर्मभेदमूलक विद्वेष, जातिभेदमूलक उच्च-नीच भाव, स्त्रीदास्य, हिंदू धर्मसंस्थेतील मूर्तिपूजा, संस्कृत भाषेतील कर्मकांड इ. गोष्टींचे उच्चाटन करून समताप्रधान समाज निर्माण करण्याकरिता व अंधश्रद्धेचे निर्मूलन करून वैचारिक क्रांती करण्याकरिता ⇨ *सत्यशोधक समाजाची* स्थापना १८७३ मध्ये फुले यांनी केली.

या सत्यशोधक समाजाचे सर्व धर्मांचे व जातींचे नागरिक सदस्य व्हावेत, अशी योजना केली होती. फुले यांनी मौलिक आणि प्रासंगिक असे दोन्ही प्रकारचे लेखन करून पुस्तके आणि पुस्तिका प्रसिद्ध केल्या. त्यावेळच्या महाराष्ट्राच्या ग्रामीण व नागरी अशा दोन्ही प्रकारच्या सामाजिक जीवनात ब्राह्मणांचे धार्मिक आणि प्रशासकीय वर्चस्व होते.

धार्मिक आणि प्रशासकीय वर्चस्वाच्या मार्गाने बहुजन समाजाची पिळवणूक चालली होती. परंपरागत हिंदू धर्माच्या चौकटीच्या पकडीत सर्व समाज सापडला होता. या हिंदू धर्माच्या पारलौकिक विचारसरणीचा प्रवर्तक व समर्थक वर्ग म्हणजे ब्राह्मण वर्ग होय. बहुजन समाजावर ब्राह्मणांनी लादलेली ही मानसिक गुलामगिरी स्पष्ट करण्याकरिता *ब्राह्मणांचे कसब* (१८६९), *गुलामगिरी* (१८७३), *सत्सार* (अंक १ व २, १८८७) इ. निबंध लिहिले. या निबंधांमधून पुराणातील अवतारांच्या कथांचा ऐतिहासिक दृष्टीने उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे.

आर्य ब्राह्मण हेमूळचे इराणचे, त्यांनी भारत जिंकला आणि येथल्या तथाकथित शूद्रातिशूद्र शूर जमातींना जिंकून त्यांना धार्मिक कर्मकांडाच्या जाळ्यात अडकवून त्यांचे सामाजिक व आर्थिक शोषण केले व ते आतापर्यंत चालू राहिले, असा भावार्थ काढला आहे. श्रमिक बहुजन समाजाच्या आर्थिक अवनतीचे उत्कृष्ट चित्र *शेतकऱ्याचा आसूड* या विस्तृत निबंधामध्ये फुले यांनी रेखाटले आहे. ही शेतीच्या आर्थिक दुरवस्थेची समस्या अजूनही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ३२ वर्षे होऊन गेली तरी सुटलेली नाही. या निंबधामध्ये भारतीय ग्रामोद्योग किंवा कुटिरोद्योग ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या आर्थिक धोरणाने कसे ढासळले आहेत, याचेही हृदयविदारक वर्णन केलेले आहे. शेतीचा धंदा आधुनिक तंत्रविज्ञानावर उभारावा आणि ग्रामीण उद्योगांना आधुनिक तंत्रविद्येचा आधार द्यावा, अशी उपाययोजना फुले यांनी या निबंधात सुचविली आहे. सुमारे १०० वर्षांपूर्वी लिहिलेला हा विचार आजच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बऱ्याच प्रमाणात लागू पडतो, ही गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे.

सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक या निंबधात (मृत्यूनंतर प्रसिद्ध, १८९१) फुले यांनी आपल्या समग्र विचारांचे सार असलेल्या विश्वकुटुंबवादाची सुसंगत मांडणी केली आहे. हा निबंध लिहीत असताना त्यांना पक्षाघात झाला होता. अशा विकलांग अवस्थेत त्यांनी हा निबंध लिहून पुरा केला. यात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मुलभूत मानवी मूल्यांच्या आधारावर समाजरचना कशी असावी, हे सांगितले आहे. ज्या तत्त्वांच्या आधारावर अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती झाली तीच तत्त्वे या पुस्तकात भारतीय समाजरचनेच्या संदर्भात मांडली आहेत. यात सांगितलेला सत्यधर्म हा 'यूटोपिया'च होय.

जगातल्या मोठमोठ्या सामाजिक व राजकीय क्रांत्या युटोपियन ध्येयवादाने प्रेरित झालेल्या दिसतात. फुले म्हणतात-"स्त्री अथवा पुरूष जे एकंदर सर्व गावच्या, प्रांताच्या, देशाच्या व खंडाच्या संबंधाने अथवा कोणत्याही धर्मातील मताच्या संबंधाने कोणत्याच प्रकारची आवड निवड न करणारे, या सर्व स्त्री पुरूषांनी या भूगोलावर आपले एक कुटुंब समजून एकमताने, एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करून वागावे.

१. जन्म आणि शिक्षण

महात्मा जोतिबा फुले (एप्रिल ११, इ.स. १८२७ - नोव्हेंबर २८, इ.स. १८९०) हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली; शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेऊन पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

जोतिबा फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी महात्मा फुल्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता. त्यामुळे गोऱ्हे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले व तेच नाव पुढे रूढ झाले. कटगुणहून त्यांचा परिवार पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आला.. तेथे त्यांचे घर असून, त्यांच्या नावे सातबाराचा उतारा आहे. खानवडी येथे फुले व होले आडनावाची बरीच कुटुंबे आहेत.

प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. १८४२ ला माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला.

आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय,कडा.
ता. आष्टी, जि. बीड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत समाजशास्त्र विषयातील बी. ए. तृतीय वर्षासाठी सादर करावयाचा प्रकल्प अहवाल

शिर्षक

"अंधश्रध्देला बळी पडलेल्या कुटुंबातील व्यक्तीच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास"

संशोधक

वाळके किरण बाबासाहेब

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास
समाजशास्त्र विभाग प्रमुख

वर्ष : २०२१- २०२२

Anand Charitable Sansta Ashti's

ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA, KADA.

Tal-Ashti, Dist-Beed. Pin-414202

Certificate

This is to certify that वाळके किरण बाबासाहेब

of class B.A.III Semester V and VI has satisfactorily completed. His Project work in subject of Sociology Entitled: "अंधश्रध्देला बळी पडलेल्या कुटुंबातील व्यक्तीच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास" as laid down in the regulation of the Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad during the academic year 2021-2022.

Paper No.	XII & XVI	Oral	Total
Out of	80	20	100
Mark obtained	65	17	82

Signature
External

Signature
Exam. Head of Department
Date: 30/5/22

ऋणनिर्देश

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. आव्हाड भगवान भानुदास यांनी वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यामुळेच मी हा प्रकल्प अहवाल पूर्ण करू शकलो. त्यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहील.

तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा. ता. आष्टी, जि. बीड महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. श्याम सांगळे आणि श्री. ढोरमारे सर यांनी मला संबंधित साहित्य उपलब्ध करून देऊन जे सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. हा प्रकल्प वेळेत टाईप करून दिल्याबद्दल श्री. कांडेकर सर यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

तसेच मला सदैव प्रेरणा देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर, उपप्राचार्य प्रा. भास्कर चव्हाण, प्रा. यांचे मी ऋण व्यक्त करतो. तसेच ज्यांनी-ज्यांनी मला हा प्रकल्प लिहित असतांना प्रोत्साहन आणि सहकार्य केले त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

दिनांक ७/५ २०२२
ठिकाण: कडा, ता. आष्टी

संशोधक
वाळके किरण बाबासाहेब

प्रकरण पहिले

-प्रस्तावना-

1.1 अंधश्रेध्देचे वाढते सावट-

अंधश्रध्देपासुन दुर रहा, ही महाराष्ट्राच्या मातीतील संतांची शिकवण. मात्र भौतिक सुखा पोटी अंधश्रध्देतुन बळी देण्याचा हा अघोरी प्रकार याच पुरोगामी परंपरा सांगणा-या महाराष्ट्रात घडावा, हे अघोरीराजच म्हणावे लागेल. महाराष्ट्रात अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रमाला तब्बल 300 वर्षाची परंपरा आहे. अनेक संतांनी त्यानंतर महात्मा फुले, संतगाडगे बाबा,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी व गेल्या 25वर्षात तर अंधश्रध्दा निर्मुलन समितीने संघटितपणे यासाठी प्रयत्न केले आहेत. तरी ही अंधश्रध्दा कमी न होता वाढतच चालली आहे. गेल्या वर्षभरात म्हणजे जादुटोणा विरोधी कायदा झाल्या पासुन महाराष्ट्रात सुमारे 12 प्रकार केवळ नर बळीचे झाले आहेत. याचा अर्थ हे प्रमाण दर महिन्याला एक असे आहे व ही अत्यंत गंभीर बाब आहे.असे होण्याची कारणे आपल्या कडच्या सामाजिक परिस्थितीत आहेत, असे गेल्या आनेक वर्षाच्या अनुभवावरुन लक्षात आले आहे.

1.2.विवेक जागवा-

आपल्या भोवताली सुखोपभोगाची अनेक साधने निर्माण झाली आहेत. त्याचा लाभ घेतानाही अनेक जण दिसतात. मात्र ही संख्या मर्यादित आहे. असा लाभ घेणाया लोकांना पाहणारे अनेक आहेत. त्यांना सहज उपलब्ध होत नाहीत. त्यातुन त्यांच्यातील असमाधान त्यांच्यात निर्माण होते.त्यांच्याकडे आहे.आपल्याकडे का नाही, कसे मिळवता येईल, अशी ही भावना आहे.अशी वर्गीय दरी आपल्याकडे फार झपाट्याने वाढत आहे.प्रत्येकाला कोणतीही गोष्ट लगेच तत्काळ हावी आहे.ती मिळेपर्यंत वाट पाहण्याची, थांबण्याची त्यांची तयारी नसते.ती लवकर मिळावी यासाठी काहीही करण्याची त्यांची तयारी असते.त्यातुनच मग नको तो मार्ग निवडला जातो.सुशिक्षित तरुण पिढिही यात मागे नाही.प्रयोग शाळेत प्रयोग करणारी मुले त्या वेळी कार्य कारण भाव विचारात घेऊनच प्रयोग करीत असतात.

1.3 पीडितांमध्ये स्त्रायच जास्त-

आपल्या जगण्यात हा विचार आणणे मात्र त्यांना जमत नाही. नर बळी सारखा प्रकार घडल्यावरच आपल्याला अंधश्रध्देमधील दाहकता लक्षात येते. प्रत्यक्षात रोजच्या जगण्या तही आपण अनेकदा अविवेकाने वागत आसतो.नवस केल्यावर, हात जोडल्यावर काही होईल ही भावना याचेच प्रतीक होईल ही भावना याचेच प्रतीक आहे. कोणत्याही परिस्थितीत कार्य कारण भाव म्हणजे विवेकाची कसोटी लावणे अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र अगतिक स्थितीत हा विवेकच हरवला जातो व त्यातुन असे लहान सहान व नंतर मग गंभीर प्रकार घडतात. आई,बहीण,मावशी,सुन बायको, फार काय शेजारीण सुध्दा अशा प्रकारांमधील बळी असवे. म्हणजे अंधश्रध्देच्या आहारी गेलेली माणसे नाते संबंध सुध्दा मानायला तयार नाहीत. आपण म्हणजे नात्यागोत्यात स्त्रिया सुरक्षित असतात, या समजाला तडा जाईल असेच प्रकार तेही नर बळीचे गेल्या काही वर्षात समोर आले आहेत म्हणजे नात्यात देखील महिलेला सुरक्षितता नाहीच चांगली म्हणवणारी माणसे देखील अशा प्रकारांनी आकर्षित होऊन नर बळी द्यायला तयार होतात. हा सगळा अगतिक झाल्याचाच परिणाम आहे. या अगतिकतेला मांत्रिक व तत्सम प्रकारच्या व्यक्ती खत पाणी घालतात.त्यातून विवेकासमोर अंधार पसरतो व अविवेक जागृत होतो.त्याला आळा घालायचा असेल तर त्यासाठी कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीबरोबरच सामाजिक प्रबोधन देखील होण्याची गरज आहे.हे आपल्याकडे होताना दिसत नाही. जादुटोणा विरोधी कायदा होण्यापुर्वी नरबळी देण्यासाठी तयारी करणे हा गुन्हा समजला जात नव्हता. आता मात्र या कायदयामुळे तो गुन्हा समजला जातो.व सिध्द झाल्यावर त्यासाठी शिक्षादेखील आहे.असे बदल करुन तो कायदा अधिक टोकदार करण्याची गरज आहे. कायदयाची अंमलबजावणी होत नाही. ही सुध्दा खंत वाटावी अशीच गोष्ट आहे.अचानक झालेले मृत्यु शोधुन त्यामागील कारणांचा पोलिसांनी शोध घेतला तर त्यातुन अनेक गंभीर प्रकार सापडु शकतील.असा शोध सुरु आहे. **(मुक्ता दाभोळकर 2015)**

1.4 अंधश्रध्देला बळी पडण्यामध्ये स्त्रियांचे वाढते प्रमाण-

अशी माहिती प्रसिध्द झाली तरीही नरबळी सारखे अनेक प्रकार हदु शकतील. याशिवाय शाळा, महाविदयालये, ग्रामसभा, यातुन प्रबोधन होण्याची गरज आहे. समितीच्या माध्यमातुन असे उपक्रम होतच असतात. मात्र थेट समाजातुन सुरुवातीला विरोध होईल अशी मला खात्री आहे ही सुरुवात मात्र लवकर झाली पाहिजे; कारण शेजारच्या मुलीला, नात्यातील एका महिलेला असे करता करता आता प्रकरण थेट मुलाने आईला बळी देण्या पर्यंत येऊन ठेपले आहे. समाजाचा विवेक जागा व्हावा,या साठी आता समाजानेच प्रयत्न करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. संगणक शिकणारी, तंत्रज्ञान प्रेमी नवी पिढीही अंधश्रध्देच्या मागे लागावी, ही या समाजाची फार मोठी शोकांतिक आहे.चंगळवादाने एका वर्गासमोर सगळी सुखे उभी केली आहेत, तर दुसया वर्गाला त्यापैकी काहीच मिळतनसल्याने एक प्रकारची अगतिकता त्यांच्यात आली आहे.ही वर्गीय दरी सुध्दा अंधश्रध्देला खतपाणी घालत आहे. स्वतःच्या सुखासाठी जन्मदात्या आईस जिवंतपणी बळी देण्याचा उघडकीस आलेला प्रकार अंगावर शहारे आणणार. ही बातमी व त्यासंबंधीचा तपशील वाचल्या नंतर मला पहिल्यांदा प्रकर्षाने जाणवले ते असे की आपल्या समाजातील मुल्यांची घसरण किती घाणेरड्या पातळीपर्यंत झाली आहे.

1.5.प्रबोधनाची भयानक कमतरता-

आजवर जन्मदात्या आईची महंती गाणाऱ्या कथा, कविता ,कादंबऱ्या, नाटके , पुराणे, कीर्तने ऐकुन आई संबधीची जी उदात भावना मनात जागृत होते. तिला मुळा पासुन हादरा बसला. "स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी" ही ओळ आठवली. देवाला आई नाही आणि आम्हाला आई आहे या अति उदात भावना सांगणा-या ओळीचा घटनेने कुचकामी ठरल्या आहेत. तत्त्वज्ञानाचे वर्ग बंद पडत आहेत. प्रगत अतिप्रगत तंत्रज्ञान हेच समाजाचे सर्व प्रश्न सोडवेल असे सिध्दांत मांडले जात आहेत. केंद्रसरकारने नेमलेल्या उच्यशिक्षणात काय शिकवावे, यासंबंधी शिफारस करण्याचा बिर्ला,अंबानीचा दोन नफे खोर भांडवलदारांची कमिटी नेमली होती तिने कोणते ही समाजशास्त्र किंवा मानसशास्त्रे शिकवुच नयेत अशी शिफारस केली. ती माणसाचा सारासार विवेक मारुन हाकणारी आहे. एकदा विचार व विवेक मारला की लोकांना अंधश्रध्दाळु बनविणे सोपे. नुकतीच नाशिक जिल्ह्यात घडलेली घटना ही ऊठसुट पुरोगामित्वाच्या गप्पा मारणाया व सामाजिक न्यायाचा टेंभा मिरवणा-या महाराष्ट्रला एक खणखणीतच चपराक आहे.ही एक प्रतिनिधिक घटना म्हणता येईल या एका वर्षात असे किमान 15 बळी अंधश्रदेतुन गेल्याची माहिती अंनिसला मिळाली आहे. बहुतांश बळी हे स्त्रियांचे आहेत हे प्रकार वेदनादायी व अस्वस्थ करणारे आहेत. एखादी व्यक्ती करणा, भानामती,जादुटोणा करते; डाकीण आहे असे समजुन आजारपणावरील उपचार सुखशांती किंवा गुप्त धनासाठी नरबळी घेतले गेले. **(गोविंद पानसरे 2015)**

1.6 मानसिकता बदला -

महिलांना भुत उतरविण्याच्या बहाण्याने अमानुषमारहाण करण्याच्या तेवढ्यातच घटना समोर आल्या आहेत. या शिवाय वेगळ्या 25 गुन्ह्यांत डाकीण,करणीच्या संशयावरुन अमानुष मारहाण, बलात्कार अथवा अघोरी उपाय करण्यात आले. यातील जवळपास सर्वच महिला आहेत. इतकेच नव्हे तर आजपर्यंत दाखल झालेल्या 110 पेक्षाजास्त गुन्ह्यांत पुरुषांपेक्षा शोषित स्त्रियांच प्रमाण जास्त आहे.डझनभर गुन्ह्यांत स्त्रियांचे शारीरिक शोषण झाले आहे.या निमित्तांने काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. डॉ.नरेंद्र भोलकर व अंधश्रध्दा निर्मुलन समितीने गेली 18 वर्षे संघर्ष करुन यासाठीच जादुटोणा विरोधी कायद्याची लढाई मोठ्या चिकाटीने लढली.राज्यात असे प्रकार होतात. म्हणुनच जादुटोणा विरोधी कायद्यांची गरज अधोरेखित होते. मात्र अशा घटना होऊनयेत यासाठी कायद्याची प्रभावी पणे अंमल बजावणी करण्याची गरज आहे परंतु सध्या या बाबत सरकारचे प्रयत्न फारसे आश्वासक वाटत नाहीत. अंनिसच्या वतीने विविध मोहिमांतुन कायद्याच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी क्षमते नुसार प्रयत्नचालु आहेत परंतु हा कायदा सरकारचा आहे याचीच सरकारला आठवण नसावी. अशी स्थिती आहे. कायद्याच्या मसुद्या प्रमाणे प्रत्येक जिल्हयात दक्षता अधिकारी नेमण्यात येणे आवश्यक होते. मात्र अपवाद न वगळता तशा नेमणुका झाल्या नाहीत. पोलिसांना आजुन कायदा समजलेला नाही; त्यांचेच प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. चंगळवादाने व चंगळ करायला मिळेल या आपेक्षेने मनुष्य किती हीन झाला हे समजल्या वर एक प्रकारची उद्विग्नता आणि हा समाज कसा सावरणार, असे एक प्रचंड मोठे प्रश्न चिंन्ह उभे राहिले. **(गोविंद पानसरे 2015)**

